

KNOWLEDGE IS POWER

# अजिंठा

नियतकालिक

१९९४-९५

संपादक -
प्रा. नंदकुमार भारंबे

KNOWLEDGE IS POWER

# अजिंठा

## नियतकालिक

१९९४-९५

**मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव**

**संपादक**

प्रा.नंदकुमार भारंबे

**विद्यार्थी प्रतिनिधी**

महेंद्र धांडे

विजय किनगे

कु.मल्लिका कलकोंडा

# संपादक मंडळ

**प्राचार्य** - डी.एस.नेमाडे

**उपप्राचार्य** - प्रा.ए.बी.पाटील
प्रा.व्ही.जे.चौधरी
प्रा.पी.एल.कोल्हे

प्रा. नंदकुमार भारंबे
प्रा. डॉ.आर.टी.चौधरी
प्रा. डॉ.के.एम.पाटील
प्रा. डॉ.सौ.वासंती साळवेकर
प्रा. सौ.पी.बी.राणे
प्रा. सौ.सुजाता देशापांडे
प्रा. सौ.यु.एस. मानुधने.

**विद्यार्थी प्रतिनिधी**

महेंद्र धांडे
विजय किनगे
कु.मल्लिका कलकोंडा

# सस्नेह,

१९९४-९५ या शैक्षणिक वर्षाचा अजिंठा आपल्या हाती देण्यात मला आनंद होत आहे. ज्ञान मिळवित असताना विद्यार्थ्यां मधील सुप्त गुणांना संधी मिळावी या हेतुने महाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात येतात.कथा, लेख, काव्य, गझल, ललित लेख, नाट्य इ. लेखन हा त्यातील एक भाग आहे. अजिंठा मधील साहित्य पाहताना याचा आपल्याला अनुभव येईल. तसेच या सर्व लिखाणात तत्कालिन राजकीय, सामाजिक औद्योगिक, आर्थिक धोरण, सांस्कृतीक क्षेत्रातील घडामोडीचे प्रतिबिंब पडलेले आढळते.

आज माणसाने बुध्दीच्या साहाय्याने निसर्गावर विजय मिळवण्यात यश संपादन केले आहे. यांत्रिक सुधारणा कळसाला पोहचल्या, सर्व शास्त्रे पुढे गेलीत. पण यात काहीतरी उणीव आहे असे वाटते.ती म्हणजे माणूस भौतिक सुखाच्या मागे लागून भावनेला, नैतिकतेला विसरला. नुसत्या बुध्दीवर माणसाला जगता येईल या अहंकाराचा सुधारलेल्या माणसाच्या मनावर पगडा आहे. उद्याचे नवे जग सुखी, समाधानी व्हायचे असेल तर बुध्दी, भावना, त्याग, नैतिकता या मूल्यांचा सुंदर मेळ झाला पाहीजे.

हे वर्ष म.गांधीजींचे १२५ वे जन्म वर्ष तसेच विनोबाजींचे जन्मशताब्दी वर्ष आहे. सत्य, अहिंसा, सत्याग्रह हे अन्याय दूर करण्याचे व शांतता निर्माण करण्याचे तंत्र अनुसरून समस्त मानव जातीला एक नवा मार्ग दिला, दिशा दिली. आर्थिक मूल्याप्रमाणे नैतिक मूल्यांचीही व्यक्तीच्या जीवन विकासाला गरज आहे.या श्रध्देने त्यांच्या ह्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे.

या वर्षात आमच्या महाविद्यालयात अखिल भारतीय मानसशास्त्र परिषद आयोजित करण्यात येवून ती यशस्वी रित्या पार पडली.

या वर्षाचे सिंहावलोकन करताना मन खिन्न होते ते इतिहास जमा झालेल्या 'प्लेग' च्या पुनरागमनामुळे, स्वातंत्र्यपूर्व काळात प्लेग मुळे घरदार सोडून गावाबाहेर जावून राहण्याचा प्रसंग आमच्या वडिलधाऱ्या व्यक्तीकडून ऐकतानाचा प्लेग पुनच्च आला. पण सर्वांच्या महत् प्रयत्नाने त्यावर नियंत्रण आणण्यात यश मिळवले.

एक गोष्ट आवर्जून सांगाविशी वाटते, ती म्हणजे आमचे महाविद्यालय स्थापन होवून तब्बल ५० वर्ष पूर्ण होत आहेत. पुढील शैक्षणिक वर्ष हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. पन्नास वर्षापूर्वी लावलेल्या लहानशा रोपट्याचे आज प्रचंड वटवृक्षात रूपांतर झालेले आढळत आहे.

'अजिंठा' च्या मुखपृष्ठावरील चित्राची कल्पना महेंद्र धांडे या टी.वाय.बी.ए. या विद्यार्थ्याची आहे. ज्ञान, साहित्य, संगीत आणि इथल्या परिसरातील मुख्य पीक केळी याचे ते प्रतिक आहे.

याशिवाय 'अजिंठा' सर्व बाजूनीं परिपूर्ण व्हावा यासाठी सर्वांनी केलेली मदत व सहाय्य यास मोल नाही. या सर्वांचा मी ऋणी आहे.

**प्रा.नंदकुमार भारंबे**

## माझ्या नजरेतून.....

महाविद्यालयातील जीवन ..... अगदी मोरपिंशी गोष्ट नाही :उगाच दोनचार वह्या दाखवत दाखवत जाणं, कुठल्याही विषयावर मोठ्या आवेत बोलणं..... खिडकीतनं पाऊस माझ्यावरती पडला म्हणून धुंदावून जाणं - आणि

"कधी कधी येतो अंधाराला
नाजुक वास तुझ्या केसांचा
स्पर्श पापण्यांवरी झुले
धुक्यात बुडालेल्या श्वासांचा !
असं काहीसं मनात घोळत,

थंडीच्या दिवसातल्या गुलाबी उन्हात पडुन राहणं ...... सगळंचं विलक्षण वेड लावणारं!

पण हे जीवन एवढ्यातच सिमीत नसतं. इथं स्वतःला स्वत;च घडवायचं असतं. जिद्द, शिस्त यांचा मुलामा देऊन व्यक्तिमत्व झळाळून काढायचं असतं. इथं मिळतो , फक्त मोलाचा ठेवा. पुढील आयुष्यात त्याचा कसा उपयोग करायचा हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असतं. जो इथे जिंकतो , तो सगळीकडे आपला झेंडा फडकवू शकतो !

स्वप्नांचे पंख लावून आभाळात भरारी मारण्याच्या तयारीत असलेल्यांना अनुभवच सर्व काही शिकवतो. हे महाविद्यालय आपलं आहे.इथली संस्कृती आपली आहे. फक्त पदवीसाठी महाविद्यालय अशी भूमिका असेल तर त्यांच्यासाठी या संस्कृतीचा काऽऽही उपयोग नाही. इथं "एक हात दे - एक हाथ ले" हा न्यायच आहे.

तेजस्वीता - तपस्वीता आणि तत्परता हे तारूण्याचे तीन तकार आहेत. इथे विद्यार्थी विद्यार्थिनीं असा मतभेद नाही. जो निश्चित साध्य समोर ठेवुन, लक्ष्य गाठण्यासाठी उंच भरारी मारतो तोच जिंकतो इथे 'उडणं ' हा शब्द देखील योजता आला असता, परंतु उडणे आणि 'उंच भरारी मारणे' या शब्दामध्ये खुऽऽप अंतर आहे. आणि जो जिंकतो त्याच्या मुकूटात शिरपेच खोवला जातो - तेव्हा सर्वांच्या उज्ज्वल भविष्यासाठी माझ्या मनापासून शुभेच्छा !!

**मल्लिका कलकोंडा**

## दृष्टीक्षेप

विद्यार्थी विद्याधन घेत असताना सामाजिक बांधिलकी मानणे अगत्याचे ठरते. त्यासाठी सामाजिक सेवेचे संस्कार घेणे मी महत्वाचे मानतो. समाजाने माझ्यासाठी काय केलं असे म्हणत असताना मी समाजासाठी काय केलं असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. विद्यार्थी स्वप्न पाहतो ते मोठं होण्याचे, ते सामाजिक बांधिलकी ठेवूनच साकार होवू शकेल. या विषयी माझ्या मनात यत्किंचित शंका नाही.
चला सहगमन करूया.....

**महेंद्र धांडे**

विद्यार्थी मित्रांनो
'अजिंठा' एक अमर शिल्प कलाकृती, एका छोट्या बिंदूपासून झालेली सुरवात. तीच गोष्ट आपल्या 'अजिंठा' ह्या नियतकालिकास लागू पडलेली.

आपण आपल्यातील कलाकार जिवंत ठेवून साहित्यरूपी आकाश व्यापून टाकण्याचे सुरेख प्रयत्नशील काम केलेलेआहे, व करीत आहोत.

आपल्या प्रत्येकाच्या ह्दयाच्या अंतरंगात काही गुण लपलेले असतात. त्यांना वृक्षांचा हिरवेपणा, धरतीचा ओलावा असतो. तो आपण अजिंठाच्या कुशीतून, जेष्ठ आदरणीय प्राध्यापकांच्या सानिध्यातून नेहमी व्यक्त करून आपल्या मनाच्या निरभ्र आकाशातील विचारांचे मेघ, आपली स्वप्ने शब्दरूपात साकार करतात.

अशीच काही स्वप्ने, विचारांचे मेघ शब्दरूपात साकार झाली आहे. तीही आपल्याच लेखणीतून.....

**विजय किनगे**

# उपप्राचार्य म्हणून नियुक्ती
अभिनंदन !!!



प्रा. पी. एल. कोल्हे



प्रा ए. बी. पाटील



प्रा. व्ही. जे. चौधरी

## - अजिंठा संपादक मंडळ -



उभे - कु. मल्लिका कलकोंडा, विजय किनगे, महेंद्र धांडे
बसलेले - डॉ.के.एम. पाटील, डॉ.आर.टी. चौधरी, प्रा.ए.बी. पाटील
प्राचार्य डी. एस. नेमाडे, प्रा. पी. एल. कोल्हे,
प्रा. नंदकुमार भारंबे, डॉ. वासंती साळवेकर

# - अभिनंदन -



१२ वी बोर्डातील मेरिट लिस्ट मधील विद्यार्थी समवेत प्राचार्य
आनंद कुडे, शैलेश जैन, मकरंद चौधरी, ज्ञानेश पाटील, सचिन जैन



राज्यस्तरावरील क्वीझ (औरंगाबाद) स्पर्धेतील यशस्वी ग्रुप

# एन.सी.सी.



नॅशनल इंटीग्रेशन कँपमध्ये
सहभागी विद्यार्थी



एन.सी.सी.
रँक होल्डर



स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे
उद्‌घाटन करताना
प्रा. डॉ. सुलतान अख्तर (अलिगड)

## स्नेह संमेलन



उद्‌घाटक -
डॉ. एस. पी. ननीर
सहसंचालक
उच्चशिक्षण, जळगाव विभाग

नाट्य छटा





बक्षिस वितरण -
डॉ. संभाजी देसाई,
कुलसचिव, उ.म.वि.

# सूरमयी ....!

मल्लीका धनंजय कलकोंडा
टी.वाय.बीएसी.(कॉम्प्युटर)

सुरात सूर गुंफतांना
रातराणी बहरतांना......
चंद्र हसतो रजनीच्या भाळी
-मन मोहूनी गेले या अशा निशांतवेळी.......

रात्र पहुडली आहे आळसावलेल्या अप्सरेसारखी! डोळ्यात न मावणारा काळोख-त्यातही मृदू हास्य करतंयं चांदण...हवाहवासा सुखद गारवा...खिडकीबाहेर जग झोपलय-शांतपणे..... काळ्याकभिन्न रात्रीला जणू चांदण्यांच्या शुभ्र तेजात न्हाऊ घालून कवेत घेतलंय सृष्टीकर्त्यानं...

वारा आत शिरतोयं धसमुसळेपणांनं, अलगदपणे खिडकीतंन उतरलेली चंद्रकिरणे केसांच्या महिरपेवर आरूढ होत असतांना वारा त्यांना त्याच्या नाचा मध्ये फेर धरायला लावतोयं...गुलाबाची अर्धोन्मिलित कळी, जगातल्या सुंदर आशांचा गंध हृदयाशी धरून कशी खुदकन हसतेयं, एखाद्या स्वप्नाळू प्रेयसीसारखी! बाजूला शरंच्चंद्राची कादंबरी आहे. मनात काव्यसरस्वतीची वीणा झंकारतेय... भावनेचे तरंग उठताहेत आरोहाच्या स्वरांसारखे... अशाच काही तरंगांची चंद्रज्योतींच्या साक्षीने गुंफलेली ही मालिका!

सृष्टीचे मधुर भाव, अनेकविध रस, गंध आणि विखुरलेलं चांदण्यांची शितलता घेउन घडवावी मानसमूर्ती! या मूर्तिचं निरिक्षण करता-करता, त्या मूर्तीच्या चेहऱ्यावर कोरलेल माझे भावरूपी चांदण्यांचं काव्याक्षर वाचून, एखादी चंद्रकन्या भावनेचा साज लेउन माझ्याकडे यावी माझी काव्यमूर्ती होण्यासाठी!तिच्या सुंदरतेला मोहून तिची हनुवटी अलगद वर करुन तिला विचाराव, "सांग ! तुझ्या शृंगारासाठी माझ्या खजिन्यातले कुठले हिरेमाणके देऊ?" कांकणांच्या किणकिणाटाची आठवण देत, आपल्या मधुर आवाजात ती लज्जावती उत्तरली "रुपात रुप मोहवंत राधेचं !". ते लाजरे नयन! मनात हरीचे चिंतन! अशी त्या निलरुपात रंगलेली राधा पाहतांना वाटतं

"हे जीवन ..... मधुरस्वररसांचा राग
जणू कान्हाच्या गळ्यात वृंदेची माला
अन् डोळ्यात राधेच्या उमलतो अनुराग!"
तिच्या गीतात ताल धरणारी प्राजक्ताची फुले !
मनातचं कान्हाशी हितगुजं करणारी राधा
"कृष्णे वेधिली, विरहिणी बोले ......"!

तोच यमुनेचे जलतुषारांचा तिच्यावर शिडकावा होतो. आणि भेदरलेल्या हरिणशावका प्रमाणे ती आपल्या सख्यांना हाक मारते.
"हाय दयी! कोई आओ सखी!"
स्वप्नसृष्टीतनं तिला जाग करणारा तो क्षण! आणि समोर तिचा कृष्णसखा! लज्जेची प्रतिमा बनलेल्या, खट्याळपणे विचारतो,"बोलव तुझ्या सख्यांना! मला पाहताच तू का शांत व्हावं? मी आहे तरी कोण?" तिच्या विशाल नेत्रातलं काजळ त्यावर उत्तरतं,"चंद्राची साक्ष! तू माझा निळा!"

मोठमोठ्या डोंगरदऱ्यांच्या कुशीत शांतपणे विसावलेल्या जलाशयासारखं शांत होत जात मन् विसावलेल्या जलाशयासारखं शांत होत जात मन् आणि अकस्मात् -

"अनंतातुनी झरझर येती खट्याळ श्रावणधारा
मनी सुखावतं, क्षणी थांबुनी, डोलडोलवीत मनबावरा!

आणि या अचानकपणे झालेल्या वर्षावाने प्रफुल्लित झालेल्या धरित्रीला क्षणाचीही उसंत न देता वर्षणारा मेघ ! प्रख्यात गायकाने मेघमल्हारातील गायिलेले आलापहीफिके पडावेत असे त्या मेघगर्जना! पानापानांवर टपटप तालदेत नाचणारा अधिरा पाऊस ! शहाऱ्यांवर शहारे उठतात.जाई जुईच्या बहाराला सहस्त्रनेत्रांनी बघायला आसावलेल्या मनाला पापणी मिटून, एक क्षणही वाया घालवणं वृथा वाटतंयं! समुद्र गर्जतो बेभानपणे ! लाटांवरती लाटा किनाऱ्यावर आदळतांना शांत राहणारा तो किनारा! त्याच्या वाळूत ओले पायं उमटवत जांव. पाऊस कोसळतं राहावा अविचलपणे! अशा वेळी न कोणाला आपली स्वप्ने सांगावीत ना कोणाचं जीवनगीत ऐकावं. बस् , सुखाचा प्याला ओठांशी धरून तरंगांवर डोलत जावं, समाधिस्त होऊन!

ना कुणाची साद
ना कशाचा शोध
जायचंयं त्या अनंतापर्यंत.....
तू तुझ्या सख्याविषयी सांगू नकोस
मीही कुणाला दिलेल्या माझ्या अश्रुफुलांची
- आठवण काढणार नाही

कितीही लाटा किनाऱ्यावर आदळल्या तरी जायचंयं खूप दुर......खूप दुर!......

नाचनाचणाऱ्या चांदण्यांच्या पऱ्या घरी परतंत आहेत. आकाश अजून झोपलयं निरागस बाळासारखं. पहाटतारा उगवतोय. ब्राह्ममुहूर्ताची वेळ स्वप्नसृष्टीतून जागं करणारे भक्तीरसाचे वेध.....मनातील ऋचा वेद बनण्याची वेळ ! शुचिर्भूत होऊन त्या एकाकी पहाटताऱ्याला सोबत घेऊन मंदिरात जाणं......किती दिव्य अनुभूती ! मस्तीत चाललेल्या नागिणिसारखी ती पायवाट! शांततेला भंग करणारी पानांची सळसळ. भक्तीस्तोत्र गाणारे भारव्दाज पक्षी ! आणि चांदण्यात पहुडलेलं डोंगरमाथ्यावरचं शिवालय. अगदी प्रत्येक पावलावर ॐकाराचा नाद जाणवतो....

"ॐ भुर्भूवस्वः तत्सवितूरेण्यं, भर्गोदेवस्यधिमही
धियोयनः प्रचोदयात ।।"

मनाची दार खडाखडा उघडणारी मंत्रस्तोत्र! किती वेगळी ही अनुभूती !

पहाट झाली ! आभाळ झोपेतून उठून खुदकन हसले पूर्वेकडे लालरंग उधळला जातोय. रविराजाच्या आगमनाची तयारी होतेय. क्षितिजाशी पोचण्याच्या स्पर्धेत मेघ रंगलेत वारा कमरे एवढ्या उंच पिकांमध्ये खोडकर मुलासारखा उड्या मारत शीळ घालतोय.

आणि धीरगंभीर वातावरणात संगीतसाधना होतेय गुरुशिष्याची-

"रागम् , तानम्, पल्लवी...."

या स्वरगंधारात आपलेही स्वर मिसळू लागतात-

"माझ्या आत्म्याचे गान
माझे पंचप्राण
तुझ्या रागात गुंफतांना....
मनातले भक्तीचे कण
तुझ्या रंगात रंगतांना....
मी तृप्त झाले!!
मन तृप्त होऊनही अतृप्त आहे!

तृप्तीत अतृप्ततेचा गंध कसा ? वाट पाहतेय की पाहता पाहता तरंगरुपी कळ्यांची भावफुले उमलत जावी डोळ्यावरची स्वप्नांची झाक मनाला स्पर्शत रहावी. चांदण्यांची साक्ष ठेवून पुन्हापुन्हा असे तरंग लेऊन रात्र यावी-कशी?

सूरमयी !!....

## कशासाठी...

समुद्र किनारी
वाळू तापते
भरतीच्या
सुखद स्पर्शासाठी!
स्मशानभूमीत
रात्र पेटते
अंतरीच्या
चिरकाल शांतीसाठी !
देव्हाऱ्याशी
उदबत्ती जळते
पापं जळून
पुण्य वाढवण्यासाठी !
चरणचंडी
तोफ गर्जते
शत्रू रक्ताने
राज्याभिषेकासाठी !
नयन कमलात
अश्रू दाटते
उरातील वादळ
शमविण्यासाठी !
जगच्या प्रांगणी
मनुष्य धडपडतो
चिमुकल्या त्या
...पोटासाठी !

**कु.हर्षाली चौधरी**
एस.वाय,बीएसी.

## शापित

माझ्या भावनांच्या झुल्यावर,
तुला कधी झुलताच आले नाही.
माझ्या मनातील भावना,
तुला कधी कळल्याच नाही.
त्या पारंब्या सारख्या लोंबतच गेल्या,
पण त्यांना एकही वृक्ष भेटलाच नाही.
तरी तुला त्याचे वनराज होता आले नाही.
माझ्याच नशिबाचा तो दोष,
माझ्या जीवन कळीला आधार भेटलाच नाही,
आधार भेटणारत नाही, कळी फुललीच नाही,
म्हणूनच जग माझ्याकडे शापित नचरेतून पाही.

**विजय किनगे**
टी.वाय.बीकॉम

# गुंजन मायाभ्रमराचे

**शिल्पा श्रीधर दीक्षित**
टी.वाय.बीएससी.(कॉम्प्युटर)

"मीने, अगं ए मीने ! कुठे जाललीस आता या सांजवेळेला ? आणि ते काय मुलांसारखी शर्टपँट घालून चालतीस बाहेर ? हे शोभत नाही तुला आता. मोठी झाली आहेस तू आता. जरा काही मुलींसारखी वागायला शिक जरा ! आणि हे काय ते केसांचं वाटोळ केलंस अन् काय तो अवतार ! नाही तर आमच्या काळात मुलींना कॉलेजात जायलासुद्धा बंदी होती. काय ही आजची पिढी तरी, अगदी कोपऱ्यापासून नमस्कार करावा अशी !"

मीना - एक उच्चमध्यमवर्गीय कुटुंबातली लाडात वाढलेली मुलगी. परवाच तिची आजी कोकणातून आली होती. आल्या आल्या तिने एक एक सुचनाबर हूकूम देण्यास सुरुवात केली होती, "आणि मोठी असल्याने तिचा तो अधिकारही आहे बोलण्याचा अन् सांगण्याचा " असं मीनाच्या आईवडीलांचं म्हणणं !

पण मीनासाठी मात्र सारख्या सूचनाच सूचना करायच्या आणि माझ्याच सूचना ऐका असं म्हणायचं आणि वरुन तुमच्या भल्यासाठीच आहे हो माझं सांगणं सवरणं' असच काहीसं होतं ते सगळं!

मीनाला जाणवत होती ती अधिकाराच्या भावनेपेक्षा भीतीचीच प्रबळ भावना ! "आपण पूर्विइतकाच अधिकार अन् स्वामित्व गाजवून चालणार नाही " या सत्यपरीस्थितीच्या जाणीवेने कधी अगतीकतेने तर कधी दुराग्रहीपणातून वागणं आणि मग ह्या साऱ्यांतून फक्त निर्माण होतात ते ताणतणाव !

घरात हवस वाटणारं नवीन माणूस आलं की घराचं घरपण काही दिवसांत डळमळू का लागत?सारेच हळूहळू बदलतात. कोणी स्वतःच्या जाळ्यात गुरफटतो ना, तशी मीना अनेक विचारात गुरफटू लागली.

परवाच तिला तिची लग्न झालेली मैत्रीण भेटली होती. "काय कसं काय चाललंय ?" यावर मैत्रीणीच उत्तर, " अग, काय सांगायच ? 'नव्याचे नऊ दिवस' असतात झालं ! आता तर 'सोन्याच्या पिंजऱ्यातली मैना' आहे मी ! काय करणार ? रोजचा स्वयंपाक, भाजी इथपासून तर बाहे जायचंय तर अमूकच साडी नेस. अशीच जा, इथपर्यंत सगळ काही सासूच्या, नवऱ्याच्या मनाप्रमाणे ऐकावे लागते या साऱ्यात माझ्या आवडी निवडीची पाळीच येत नाही. शिवाय हे कर, अमूक करु नको, तमूक करु नको, इकडे जा, तिकडे जाऊ नको, लवकरच ये " अशा नानाविध हूकुमांची अंमलबजावणी करता करता मी मला स्वतःलही काही विचार करता येतो, मला माझे स्वतंत्र व्यक्तिमत्व, भावभावना आहेत, हेच मुळी विसरत चाललेय, मग मनाप्रमाणे वागण तर सोडाच. अस वाटतं हे सगळ सोडून दूर कुठेतरी निघून जावं"

"फक्त खायला, प्यायला अन् ल्यायला मिळाल की भरपूर झालं यातच सुख असतं, अस काही आहे का? माणसाला जगण्यासाठी प्रेमाची, स्वातंत्र्याचीही तितकीच जरुरी असते जितकी खाण्यापिण्याची !

आणि हे तिचे बोलणे पटवून देणारं दुसर उदाहरण मीनाला आठवलं.

मीनाच्या नात्यातील एका भावाने, नीताला घरात सुन म्हणून आणल ते तिच्या मिठ्ठास चेहऱ्यावर अन बोलण्यावर भाळूनच ! नीतालाही माणसांची फार आवड..पण लग्न होऊन घरी येताच हुंडा, देणीघेणी वगैरे सर्व व्यवस्थित करुनही सासू, नणंदा, जावांची बोलणी तिला ऐकावी लागत होती. तरीही ते मानापमान गिळून नीता हसतमुखाने सर्वांचं हव नको बघत होती, साऱ्यांचा 'मूड' सांभाळायचा प्रयत्न करीत होती. पण एवढ करुनही ती आजारी पडली तर केवळ कर्तव्यापोटी कशीबशी सगळेजण तिची विचारपूस करतात. ती उदास, निराश राहते. तिला सासरची माणसे आपली वाटत नाही आणि माहेरच्या माणसांनी घरी आलेलं तिच्या सासरच्या माणसांना आवडत नाही. अगदी मधल्या मध्ये त्रिशंकुसारखी अवस्था झालीय तिची !

आणि अगदी अशाच परिस्थितीत जगतेय रमा, पण या साऱ्यांत तिची विचारशक्तीच हरवलीय. तिला तिची आवडनिवड, पसंत सांगता येत नाही. प्रत्येक गोष्टीसाठी ती दुसऱ्यावर अवलंबून आहे.

खरंच एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाही, विचारआचारांतही काहीसं तसंच ! आचार - विचार स्वातंत्र्य, एकमेकांच्या उपस्थितीमुळे पडणारी अपरिहार्य बंधने , प्रत्येकाला स्वामित्व गाजवण्याची नैसर्गिक ओढ, प्रत्यकाच्याच विभिन्न आवडीनिवडी, आपल्या कर्तृत्वाचा ठसा आपल्या सभोवताली उमटवण्याची चढाओढ, त्यामुळे त्या अनुषंगाने येणारा मत्सर यामुळे कुटुंबात ताणताणाव निर्माण होतात.

मला इथे एका माकडिणीची गोष्ट आठवते. ती माकडीण आपल्या पिलाला पोटाशी बांधून फिरत आसते. पूर आल्यावर ता एका झाडावर चढते, जसजसं पाणी वाढतं, तशी ती वरवर चढते. नंतर पिलाला डोक्यावर घेऊन त्यला वाचवण्याचा प्रयत्न करते. पण जसे पाणी वाढते तशी ती पिलाला खाली टाकते व त्यावर उभी राहते.

माणसाचंही काहीसं असंच ! स्वस्वार्थ आधी पाहिला जातो. एकमेकांसाठी त्याग करुन एकमेकांवर अवलंबून राहून स्वप्न पहात बसण्यामुळेही तणाव निर्माण होतात. दोन व्यक्तींचे स्वार्थ एकत्र आले की संघर्ष निर्माण होतो. त्यामुळे घराचं घरपण, सुख - शांततेचं स्वप्न अर्धवट रहातं.

अशावेळी कधी विभक्त होऊन, कधी कुणीतरी माघार घेऊन तर कधी अन्याय सहन करीत कसेतरी राहणे या मार्गाने हे प्रश्न सोडविले जातात.

पण माझ्या मते, या साऱ्यातून विभक्त राहणे हाच मार्ग आहे. मुल १८ वर्षाची झाली की त्यांना शिक्षणातसाठी होस्टेलवर ठेवावे. तेथेच त्यांना रविवार, सुटीच्या दिवशी कुठलेतरी काम द्यावे. म्हणजे 'कमवा आणि शिका' हे उद्दीष्ट समोर असावे. ह्यामुळे मुलांना कष्टची सवय कमवण्यासाठी लागणारी मनापासूनची इच्छा, त्या इच्छापूर्तीसाठी लागणारी जिद्द निर्माण होईल. त्यातून त्यांचे नवीन व्यक्तिमत्व बहरेल.

आणि घरात सुना आल्या की, सासूने स्वयंपाकघराचा ताबा तिच्याकडे सोपवावा. सामाजिक कार्यात, छंदात स्वतःचे मन गुंतवावे.

मध गोड लागतो, म्हणून भुंगा फुलाभोवता फिरतो. नात्याच्या कौटुंबिक फुलाभोवतीही माया, प्रेम, ममता या साऱ्यांचा भुंगा फिरत असतो. जोपर्यंत हा भ्रमर ह्या फुलाभोवती फिरत असतो तोपर्यंत ते फुलही हळूवारपणे, आनंदाने उमलत डोलत राहते. पण हा भ्रमर दूर जाताच ते म्लान होऊ लागतं.

माणसामाणसाचं मन कुरतडू लागतं.

तेव्हा 'मुलाच्या पायांला आपली चप्पल येऊ लागली की त्याला मित्रासारखं समजून वागावे हेच शहाणपण ! आपल्या विचारांच्या दिशा, त्यांचा नफा - तोटा व परिणाम ज्याने त्याने सहन करावे. प्रत्येकाचे व्यक्तीमत्व त्यामुळे निश्चितच बहरेल व संघर्ष कमी होतील..

या मार्गात अलिप्ततावाद जरुर आहे. पण एकूण परिस्थितीचा वेध घेता हाच मार्ग सोयिस्कर आहे, नाही का ?

## प्रिय

१
प्रिय,
कसे विरुन जात असावे
स्वतःच्या मृत्यूनंतर
स्वतःचे अस्तित्व.
पण.
मी तर अजून जिवंत !
कदाचीत तुझ्यापायीच
स्वतःला हरवून बसलोय !

२
प्रिय,
वाटते,
तुझ्या श्वासांचे गीत होऊन
माझ्या ओठी यावे
नि मी लहरत रहावा
अगदी या जगाच्या अंतापर्यंत
एक इवलासा स्वर बनून!

३
प्रिय.
कितीही, म्हणजे
खूप म्हटलं तरी
मोजता येणार नाही
आकाशाची लांबी - रुंदी - जाडी
- - - तुझ्यामुळेच आजकाल
बनून राहतो मी
एक चिरंतरगर्भी आकाश !

४
प्रिय.
तू सर्वांगान, भरभरुन
कवितेत यावं,
(अगदी लाज टाकूनही!)
माझी कविता
वसुंधरा होवून जाईन - -
रूद्रक्षासारखी गळ्यात
लटकावण्याते स्वप्न घेऊन !

**प्रशांत धांडे**
द्वितीय वर्ष, कला (इंग्रजी )

# आजच्या युवकांपुढील आव्हाने

**किशोर चुडामण कोल्हे.**
एस.वाय.बी.एस.सी.

आजचा युवक हा अनेक समस्यांतून जात असतो किंबहूना समस्यातून नव युग जन्मास येत असते. जीवनाची यशस्वी वाटचाल करणाऱ्यांना नवे आणि जुने तसेच गेल्या पिढीचे आणि विद्यमान पिढीचे संघर्षमय ' प्रसंग उद्‌भवतात.

" आमच्या वेळी असं नव्हतं बुवा " असा सूर धरणारे लोक आपल्याला सर्वत्र आढळतात. जुन्या पिढीला नवी पिढी ही वाया गेल्यासारखी वाटते. उदासीन ध्येयशून्य किंवा आदर्शहीन अशी विशेषणे त्यांना लावली जातात. स्वातंत्र्यकाळातील बलिदान करणारे म्हणतात की," ह्या तरूणांपुढे आज काही आव्हानात्मक कार्यच राहिले नाही,पण तसे नाही. आजचा तरूण जरी स्वतंत्र भारतात जन्माला आलेला आहे. तरी त्याच्यापुढे अनेक आव्हाने उभी आहेत.

स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करणे. वाढती लोकसंख्या थोपवणे, खेडी स्वच्छ करणे, अस्पृशता नष्ट करणे, अज्ञानाचे निर्मुलन, बेकारी, भ्रष्टाचार यांचा भस्मासुर, हुंडा पध्दत, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी तरूणांपुढील ज्वलंत आव्हाने आहेत. आपल्या राष्ट्रापुढील कितीतरी प्रश्न हे आजच्या तरूणापुढील आव्हानेच आहेत.

आपल्या भारत देशापुढे अनेक प्रश्न आहेत. त्यापैकी सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे "वाढती लोकसंख्या" जागतिक दृष्टीने लोकसंख्येचा विचार केला तर प्रथम क्रमांक चीन आणि दुसरा क्रमांक भारताचा लागतो. सन १९८१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या ६८.४ कोटी आहे. तसेच सन १९९१ च्या शिरगणतीनुसार भारताची लोकसंख्या ८२ कोटीच्यावर होती आणि या शतकाच्या शेवटी भारताची लोकसंख्या १०० कोटी पेक्षा जास्त होईल. " दोन लेकरं नक्षत्रावाणी, घर हसतंय फुलावाणी" हे नवे सूत्र लोकसंख्येच्या दृष्टीने पाळावयास हवे.

आजही खेड्यात दारिद्र्य, रोगराई, अस्वच्छतेचं, घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यासाठी तरूणांनी पुढे यावयास हवे. खेडे स्वयंपूर्ण हवे, स्वावलंबी व्हावे, निर्भय व्हावे, स्वच्छ व्हावे, आदर्श व्हावे, तसेच ज्ञानाची गंगा शहरापासून खेड्यात पोहोचली पाहीजे. " खेडी सुखी तर देश सुखी होईल " असे झाले पाहिजे. परंतु आजही खेड्यातील अज्ञानी जनतेस लुबाडले जात आहे.

बेकारी हे आजच्या तरूणांपुढील असेच आव्हान ठरेल. आज युवक मोठ्या आशा आणि आकांक्षांनी पदवी घेतात. पण पदव्या घेवून भाकरीचा प्रश्न सुटत नाही. सुशिक्षित आणि अशिक्षितांना हा प्रश्न विशेषतः भेडसावतो.पण सुशिक्षितांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता आपली गरिबी हटावसाठी स्वतःचे व्यवसाय काढून बेकारींवर मात केली पाहीजे. स्वतःचा व्यवसाय काढल्याने आत्मनिर्भर होता येईल. भारतही जपान सारखे उद्योगप्रधान राष्ट्र बनू शकेल. अडचणी राहणार म्हणून पळून जाऊन चालणार

नाही.कारण " साहसे श्री प्रति वसती।।" हे त्यांनी ध्यानी घेतले पाहिजे. आज जिकडे तिकडे भ्रष्टाचाराचा भस्मासूर संसर्ग रोगासारखा वाढत आहे. या रोगाला वेळीच आळा बसला पाहिजे. यामुळे समाजपुरुष पोखरून निघाला आहे. यासाठी स्वच्छ प्रशासन हाच एकमेव उपाय सुचविता येईल.

"हुंडा पध्दत" ही एक मोठी कीड आपल्या समाजाला ग्रासून बसली आहे. आज हुंडाबळी कायदा झाला आहे. परंतु कायद्याने सर्वच होते असे नव्हे. यासाठी तरूण-तरूणींनी पुढे आले पाहिजे. आचार आणि विचार जेव्हा हातात हात घेऊन चालतील तेव्हा त्यातून चांगले निष्पन्न होते. म्हणुन कोणत्याही कामाची सुरवात प्रथम घरापासून व्हावी, कारण आचरणसंहिता प्रथम गृहापासुन प्रारंभ करता यावा म्हणुन प्रत्येक युवकाने -" मी हुंडा घेणार नाही आणि कुणाला घेऊ देणार नाही" अशी प्रतिज्ञा केली पाहीजे.

" राष्ट्रीय एकात्मता" बाबत देखील प्रत्येक युवकाला आव्हान पेलावे लागेल. राष्ट्रीय एकात्मतेसाठी आपल्या माजी पंतप्रधान इंदिराजी यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. इंदिराजींनी आजच्या युवकाला आदर्श दिला.

" हा जातीभाव विसरूनिया एकहो आम्ही। अस्पृशता समूळ नष्ट हो जगातुनी।।"

राष्ट्रीयतेचे हे शिवधनुष्य आमच्या पिढीने पेलले पाहिजे. मी स्वतः व माझे अन्य ९ मित्रमंडळी आम्ही जळगांव जिल्हा व्यसनमुक्ती अभियानाची सायकल फेरी आणि राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत हिवाळी शिबीरातील सर्वेक्षणातून खेडे यातुनच आम्हाला हा अनुभव आला आहे. म्हणुन आजच्या युवकाला आणखी एक आव्हान देतो की,

मित्रांनो, उठा आणि कामाला लागा, हे जीवन आणखी किती दिवस टिकणार आहे? जन्माला आलाच आहात तेव्हा जगात आपली काहीतरी खूण सोडून जा, काहीतरी महत्वाचे कार्य करून जा. नाहीतर तुमच्यात आणि वृक्षपाषाणात काय भेद आहे? ती देखील अस्तित्वात येतात, झिजतात आणि शेवटी नष्ट होतात.

## आता (गझल)

अतृप्त न्हृदयात स्मृती चोरु नकोस आता
आशांत भावनांना वेदना देऊ नकोस आता.
फोडू नकोस पाझर तू कोरड्या ओठांना माझ्या ?
देऊन शब्द तू मज, बेधुंद करु नकोस आता ?
निघून गेली घडी दूर किती आपल्या मिलनाची
आफाट य सागरी नौका सोडू नकोस आता
विझला मधीचा माझ्या भावनांचा तो निखारा
उडेल राख ही उगीच फुंकर मारु नकोस आता.
साधून डावपेच वेळी, उधळून बाग गेले.
ती म्हणे मज पाकळ्याही वेचू नकोस आता.

**सुरेश उ पाटील**
एफ.वाय.बीए.

## मेडीकल व इंजिनिअरींगला प्रवेश


ज्ञानेश पाटील
मेडीकल


तुषार नेहेते
मेडीकल


चैतन ढाके
मेडीकल


नितीन जैन
मेडीकल


मनिषा शिंपी
मेडीकल


झिनल चौधरी
मेडीकल


सोनाली तळेले
मेडीकल


प्रिती वायकोळे
मेडीकल


स्मिता शिरसाळे
मेडीकल


निशिकांत वानखेडे
मेडीकल


श्रीकांत उपासनी
मेडीकल


सचिन जैन
इंजिनियरींग (बोर्डात आठवा)



इंद्रायणी राणे
इंजिनियरींग



शैलेश जैन
इंजिनियरींग



निरंजन नारखेडे
इंजिनियरींग



आकाश पाटील
एन.डी.ए. प्रवेश

## *राष्ट्रीय सेवा योजना*



महेंद्र धांडे
बेस्ट कॅम्प ऑर्गनायझर



नितीन पाटील
उत्तम संघटन



गणेश पाटील
ग्रुप लिडर



किशोर कोल्हे
ग्रुप लिडर



मनोज तळेले
ग्रुप लिडर



सुदिप राणे
२०० मी. रिले. (कनिष्ठ महा.)



नगरकर कैलास
२०० मी. बटरफ्लाय (कनिष्ठ महा.)

# विद्यापीठ खेळाडू



ललिता हर्डीकर
टेबल टेनिस



कु. माधुरी फालक
खो-खो



संजय कोल्हे
कबड्डी



नितीन वरडे
कबड्डी



जितेंद्रसिंग परदेशी
ॲथलेटिक्स



अतुल भावसार
ॲथलेटिक्स



कमलेश्वर पाटील
बास्केट बॉल



विजय किनगे
कर्णधार क्रिकेट



समीर काणे
बॅडमिंटन



श्रीधर गाडगीळ
बॅडमिंटन, फुटबॉल



सुनिल अडवाणी
लॉन टेनिस



शहा आर. जे.
लॉन टेनिस

# एन.सी.सी.



कु. वैशाली नेरकर
आर. डी. परेड दिल्ली



मनोहर वाघ
आर.डी. परेड दिल्ली



सोनल खंदार
एन.आय.सी. कँप, पुणे



प्रिती नाईक
एन.आय.सी. कँप, पुणे



श्वेता समदानी
बेस्ट फायरर बी.एस.सी. कँप



संगिता कलकोंडा
सी परिक्षा उत्तीर्ण



रोहित शर्मा
सिनी. अंडर ऑफीसर
सी परीक्षा उत्तीर्ण



रविन्द्र ठाकुर
सिनी. अंडर ऑफीसर
सी परीक्षा उत्तीर्ण



संजय चौधरी
बेस्ट सिनी. अंडर ऑफीसर



विलास बोंडे
सिनी. अंडर ऑफीसर



पंकज मालवी
ट्रेकिंग कँपचे नेतृत्व

# डंकेल प्रस्ताव भारतास हितकारक

**जयंत वसंत वानखेडे**
एफ. वाय.बीए.

**भारताला सर्वांगीण विकासाकडे नेणारा मार्ग**

डिसेंबर १९९३ मध्ये डंकेल प्रस्तावावर जगातील ११६ देशांबरोबर भारतानेही सही केली. दुसरी सही पण याच महीन्यात झाली. भारताला हा प्रस्ताव स्विकारावा लागेल. कारण प्रस्ताव स्विकारला नाही तर इतर ११६ देशांबरोबर भारताला व्यापार करता येणार नाही. भारताच्या एकूण निर्याती पैकी ७२% निर्यात पुढारलेल्या देशाकडे होते. शिवाय नवीन तंत्रज्ञान पुढारलेल्या देशांकडूनच घ्यावे लागते. कर्जफेडीसाठीही पुढारलेल्या देशाकडे निर्यात वाढविणे महत्वाचे आहे.

डंकेल प्रस्तावामुळे व त्यात सदस्य देशांना पुढील फायदे मिळतील.

१) खुली बाजारपेठ व त्यात सदस्य देशांना सुलभ प्रवेश -

डंकेल प्रस्तावातील या तरतुदीनुसार आंतरराष्ट्रीय व्यापरातील 'कोटा पध्दत ' बंद होणार. कोटा पध्दतीत सौदेबाजी करुन विकसनशील देशांनी विकसित देशात किती काळात किती माल निर्यात करायचा ते ठरवून घ्यावे लागते. त्यापेक्षा जास्त मालाच्या निर्यातीला वाव असला तरी जास्त निर्यात कराता येत नाही. अशा प्रकारे विकसित देशाच्या मर्जीवर अवलंबून असणारे आणि भेद भाव करणारे 'कोटा धोरण' रद्द होणे हे भारतासाठी योग्यच आहे. भारतात श्रम स्वस्त आहेत. या स्वस्त श्रमशक्तीचा उपयोग करुन कमी किमतीत जागतिक बाजारात आपला माल विकणे भारताला सहज शक्य आहे. त्यामुळे देशात रोजगार वाढेल व दारिद्र्य कमी होईल.

२) व्यापाराशी संबंधित गुंतवणूक उपाय

डंकेल प्रस्तावानुसार गुंतवणूकीवरचे निर्बंध उठवायते आहेत. भारताने नविन औद्योगिक धोरण स्विकारुन अनेक उद्योग . परवानामुक्त केले आहेत. त्यामुळे परवाना मिळविण्यातील भ्रष्टाचार व काळा पैसा कमी होईल. तसेच या तरतुदीमुळे परकीय गुंतवणूक वाढवून अत्याधुनिक तंत्रज्ञांना ते आत्मसात करता येईल. गुंतवणूक वाढीबरोबर रोजगार वाढवून दारिद्र्य कमी होईल. देशाची लोकसंख्या, साधनसामुग्री लक्षात घेता भरपूर गुंतवणूक झाल्या शिवाय रोजगार व दारिद्र्य हे प्रश्न सुटू शकणार नाहीत. म्हणून परकीय गुंतवणूकीस परवानगी देणे आवश्यक आहे.

३) कापड उद्योग -

भारतीय कापडाचा दर्जा व किंमत या दोन्ही बाबतीत जागतिक बाजारात दबदबा आहे. कापड व्यापारातील कोटा पध्दत बंद करुन खुला व्यापार तात्काळ सुरु व्हावा असे भारताला वाटते. परंतु या प्रस्तावानुसार टप्प्याटप्प्याने कापड व्यापार खुला होईल. त्यामुळे नजीकच्या काळात भारताची कापड निर्यात वाढेल व भारतीय कापड उद्योगाची .भरभराट होईल.

४) बुद्धीसंपदा अधिकार -

बुद्धीसंपदेबाबतचे कायदे जगभर एकाच प्रकारची करण्याची तरतुद प्रस्तावात आहे. भारताची सध्याची

सध्याची केवळ प्रक्रियेला पेटंट देण्याची तरतुद संशोधनाला मारक आहे. केवळ प्रक्रिया बदलून थोडाफार फेरबदल करुन वस्तू बनविण्याची पध्दत भारतात चालू आहे. ती बंद होईल. उतपादनाला नवीन कायद्यप्रमाणे पेटंट द्यावा लागणार त्यामुळे खरेखुले संशोधन वाढीस लागेल. रॉयल्टी भरुन नव्यात नवे तंत्रज्ञान भारताला वापरता येईल. बियाण्याच्या एखाद्या नवीन जातीमुळे विशिष्ट धान्याचे उत्पादन दुप्पट- चौपट होणार असेल तर रॉयल्टी देण्यात काय हरकत आहे ?

५) सेवा व्यवसाय -

बँक, विमाव्यवसाय, जहाज वाहतूक, दूरसंचार इ. सेवा खुल्या करण्याची तरतूद डंकेल प्रस्तावात आहे. भारत या क्षेत्रात उत्तम स्पर्धा करु शकतो. व सेवा व्यवसायाच्या निर्यातीत चांगला हिस्सा मिळवू शकतो. तसेच कुशल कामगारांच्या जाण्यायेण्यावरील आजची बंधने कमी झाल्यास भारतीय कामगारांना, तंत्रज्ञांना विदेशात सेवा पुरविण्याची चांगली संधी या प्रस्तावामुळे मिळू शकेल व भारताला याचा भरपुर फायदा होईल.

६) शेती व्यवसाय -

शेतमालाचा आंतराष्ट्रीय व्यापार खुला करण्याची तरतुद या प्रस्तावात आहे. याचे भारतीय शेतीव्यवसायाला पुढील फायदे मिळतील.

अ) जगातील सर्व प्रकारचे हवामान भारतात आहे. त्यामुळे जगात कोठेही पिकू शकणारा भाजीपाला, फळे, अन्नधान्य भारतात पिकू शकतात. त्यामुळे शेतमालाला परदेशात मागणी आहे त्याचे उत्पादन घेऊन आपण निर्यात वाढवू शकतो.

ब)विकसित देशाच्या तुलनेत भारतात मजुरीचे दर कमी आहेत. त्यामुळे निर्यात वस्तूचे उत्पादन वाढेल व शेतीव्यवसायाचा विकास होईल.

क) सबसिडी - विकसित दश शेतीला मोठ्या प्रमाणात सबसिडी देतात. अमेरीकेत २६ %, जपान मध्ये ७२ %, युरोपीयन आर्थिक समूह (EEC) ३७ % तर भारतात २ % एवढे कृषी अर्थसहाय्याचे प्रमाण आहे. सबसिडी कमी केल्यामुळे विकसित देशातील शेतमालाच्या किमती वाढतील त्या मुळे भारतीय शेतमाल विकसीत देशाकडे निर्यात होईल. प्रस्तावाप्रमाणे विकसनशील देशांना १०% पर्यंत सबसिडी देता येते म्हणजे भारताला सबसिडी कमी करण्याचा प्रश्न नाहीं. उलट जास्त सबसिडी देता येईल.

ड) जुन्या बियाणांचा विनीमय- डंकेल प्रस्तावामुळे शेतकऱ्यांना जुन्या बियाणांची देवाण-घेवाण करता येणार नाही. अशी व्यर्थ हाकाटी मारली जाते. कारण एकंतर संकरीत बियाणे नवच वापरावे लागते. परंतु समजा अशी देवघेव झाली तर कोणी कोणाच्या शेतावर कोणते बियाणे पेरले हे कसे तपासणार ? म्हणून ही भीती व्यर्थ आहे.

इ) बहुपक्षीय व्यापार संघटना - गॅट करारात सहभागी झालेले देश एकत्र येऊन एक बहुपक्षीय व्यापार संघटना स्थापन करतील. ही संघटना न्याय निवाडा करण्याचे काम करील. या संघटनेमुळे अमेरिकेला 'सुपर ३०१' सारखी कलम रद्द करवे लागतील.

अशा प्रकारे डंकेल प्रस्तावा मुळे शेतीक्षेत्र, उद्योग क्षेत्र व सेवाक्षेत्र या सर्वांचा भारतात विकास होईल व देशाचे नाव अल्पावधीतच विकसित देशांच्या यादीत सामील होईल. डंकेलला विरोध होत आहे तो केवळ राजकारण भ्रष्टाचार, काळा पैसा यामुळेच. असे नाइलाजाने म्हणावे लागते.

# भ्रष्टासूर

जन्मला एक राक्षस
पुरातन काळी
करुनी तप वरीले
वनमाळी.
देवने दिधले
वरदान तयाला-
जरी सूर्य
पश्चिमेला उगवला,
हिमालय जरी
दक्षिणेला सरकला,
हिन्दी महासागर
वाळवंटात बदलला,
तरीही बदलणार
नाहीस तू,
अजर अमर
राहशील तू,
नष्ट होईल निर्माण होणारी
प्रत्येक वस्तू,
मात्र वाढतच राहशील
सतत तू,
अनंत तुझी ही
पाहूनी माया
मोठेमोठे राजनेते पडतील
तुझ्या पाया,
निर्भत्सना जे तुझी
दिवसा करतील,
रात्री तेच तुझी
आरती ओवाळतील,
कलियुगात कार्य नाही
तुझे लहान,
होणार नाही तुझ्याहून
कोणी महान.
घेऊनी वरदान देवाकडून
तेव्हापासून,
भ्रष्टासूर लागला कामा
मनापासून.
नाही सोडले त्याने
देवा - दानवांना.
मग कसे सोडणार तो
क्षुद्र मानवांना ?

**महेंद्र धांडे**
टी.वा.बीए.(अर्थशास्त्र)

# 'जीवनाचा चहा '

जीवनाच्या रिकाम्या भांड्यात प्रेमाचे पाणी घाला. त्यात मायेची चहा भुकटी, दयेचे बेलदोडे घालुन, वाणी माधुर्याची साखर घाला. नंतर आदर्श वागणुकीची पावडर घालून त्यास ज्ञान संवेदनाची उष्णता द्या. ते मिश्रण उकळू द्या त्यातील अहंकाराची वाफ निघून जाईल. राहील तो शुद्ध चहा !

तो चहा मनाच्या गाळणीतून गाळा त्यातील राग, लोभ, मोह, मद, मत्सर, निराशा, निष्ठुरता हा गाळ गाळून टाका.त्यात प्रेमाचे दुध घाला.

हा चहा आदररुपी किटलीने, नम्रतेच्या कपातून सौजन्याच्या बशीत ओता. त्यावर शांतीची फुंकर घाला मग या सुमधुर चहाची गोडी श्रद्धेने अनुभवा.

सात्विकतेच्या या चहाने तुमच्या जीवनातील दुःखाचा थकवा नाहीसा करील. सुख समाधानाच्या उत्साहाची कारंजी उडवील !

**कविता वि रनाळकर**
एफ.वाय.बीए.

# वळोनी स्मरल्या स्मृती

**वैशाली कुळकर्णी.**
टी.वाय.बी.ए.(अर्थ)

२५ नोव्हेंबर हा दिवस माझ्या जीवनातील एक धाडसी दिवस म्हणूनच भविष्यकाळात मला प्रेरणा देत राहील. कारण त्या दिवशी माझी निवड दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या परेड संचलनासाठी झाली होत. कॉलेज जीवनात कुमार वर्ग निरनिराळ्या क्षेत्रात उज्वल यश संपादन करण्यच्या दृष्टीने प्रयत्नात असतो. याची पहिली पायरी चढण्यात मला यश मिळाले एन.सी.सी. ही संस्था विद्यार्थ्यांच्या अंगच्या साहस. स्वावलंबन, धाडस, शिस्त इ. सुप्त गुणांना वाव देते. व त्यासाठी गिर्यारोहण, सायकलींग, सॅलींग, ट्रेकींग इ. धाडसाचे कार्यक्रम आयोजित करते. त्यासाठी प्रत्येक राज्यातून जास्तीत जास्त लायक विद्यार्थी निवडते. महाराष्ट्रातील अमरावती ग्रुपमधून आम्ही २ मुली व ४ मुले निवडले गेलो.

काहीतरी धाडस करावे या हेतूने मी उन्हाळ्याच्या सुटीतच तयारीला लागले. एन.सी.सी. तर्फे आम्हाला प्रत्येकी १००० रु. शिवाय मुलींना साडी. ब्लेझर, ट्रॅक सूट, बुट, मुलांना शर्ट, ट्राउझर व इतर सर्व देण्यात आले. प्रजासत्ताकदिनानिमित्त शिबीर ४८ दिवसांचे होते. संपूर्ण महाराष्ट्रातून आम्ही १०१ मुले - मुली व ४ एन.सी.सी. ऑफीसर्स १२ डिसेंबरला मुंबईत येऊन १ जानेवारी ९४ ला दिल्लीला पोहोचलो. कँप सुरु झाला.

उगवत्या सुर्याच्या आधीच आमचा दिनक्रम सुरु व्हायचा. रोजच नाविन्याचां अनुभव ! अडचणींवर मात कशी करायची संकटांना सामोरे कसे जायचे. एकमेकांना मदत करणे व समजून घेणे इ. अनमोल गोष्टी आम्ही रोज अनुभवाने शिकत होतो . रोजचा दिनक्रम सुरु होण्यापूर्वी सर्वांच्या मनात आच काही तरी नवीन करायला मिळणार नवा अनुभव येणार म्हणून उत्सुकता असायची. शारीरिक दगदगीकडे दुर्लक्ष करुन आमची धाडसी मने आम्हाला पुढे ढकलायची, वारा, पाऊस, प्रचंड थंडी इ. सर्वांवर मात करीत आम्ही अधिकाधिक यश मिळवित होतो. त्यात कधी घरच्या व मित्र मैत्रीणींच्या आठवणीने मने व्याकुळ व्हायची. अशा वेळी प्रत्येक जण आपआपल्या प्रांतातील आचार विचार रीतीरिवाज सांगून दुसऱ्यांची मने रिझवी. त्यामुळे आमचे ज्ञान चौकसवृत्ती वाढत होती.

आम्ही प्रत्येक स्पर्धा जिंकण्यासाठी कसून केलेली .तयारी अखेर फळास आली. आणि २७ जानेवारी ९४ ला ' भारतातील सर्वोत्कृष्ट एन.सी.सी. संघटक राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याचा गौरव केला. आम्ही सगळ्यांना ते क्षण अतिशय अभिमानाचे वाटले दिल्लीकरांनी आमचे जे कौतुक केले. त्याने आमची मन भरुन आलीत.

दुसऱ्या दिवशी दिल्ली दर्शनाला जायचे समजल्यावर प्राचीन काळापासून भारताची राजधानी- दिल्ली असे स्मरण झाल्याशिवाय कसे राहील? दिल्लीतील भव्य इंडिया गेट, जामा मशिद बिर्ला मंदीर, लोटस टेम्पल, चांदनी चौक हे बघुन आमच्या आनंदाला भरती आली. मित्र- मैत्रीणींसोबत हिंडण्या फिरण्याचा मनसोक्त आनंद आम्ही लुटला.

समाजाच्या सामान्य स्तरातील विद्यार्थ्याला आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे अशा प्रकारचे दुर्मिळ अनुभव मिळणे कठीणच ! पण अंगी धाडस आणि प्रामाणिकपणे काम करण्याची वृत्ती असेल तर अशी अपेक्षा पूर्ण करण्याचे पाठबळ भारत सरकारने एन.सी.सी. द्वारे उपलब्ध करुन दिले आहे. त्यांनी आयोजित केलेल्या अशा कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या धाडस, कर्तबगारी या गुणांचा विकास होऊन राष्ट्रहीत साधण्याचे व सच्चा नागरिक बनवण्याचे सरकारचे ध्येय पूर्ण होते.

अशा प्रकारे सरकारी खर्चाने प्रशिक्षण देणारी एन.सी.सी. ही एकमेव संस्था असून अधिकाधिक कॅडेट्सने पुढे येऊन स्वतःचे हीत साधावे हीच अपेक्षा.

कॅम्पचे हे ४८ दिवस म्हणचे माझ्या जीवनात कधीही न विसरता येणारे दिवस आहेत. म्हणता म्हणता कँप संपला आणि इतके दिवस एकत्र राहिलेल्या आम्ही सर्वांनी भारावलेल्या अंतःकरणाने परस्पराचा निरोप घेतला.

# अतृप्त मनात

आईवाचुन ममतेच्या स्पर्शानं
कोणीही मायेचं सुख दिल नाही.
ममतेसाठी आतुरलेल्या मनाला
कुणीही जवळ केलं नाही.
हिंडून इकडे तिकडे
तुझ्यावाचून सर्वत्र दुःखच मिळाले
दुःख सहन करता करता
सुखाचे दारच बंद झाले.
आई मुलाचे वात्सल्य बघुन
'आई' म्हणण्यासाठी तळमळतात ओठ
इच्छा या अतृप्त मनाची
कुशीत शिरुन मिळावा मायेचा घोट
दाटून आलेल्या कंठाला
तुझ्या आठवणीत मोकळा करतो
स्मृतीत तुझ्या अभिवादन करुन
अतृप्तमनात तुझी मुर्ती साठवतो.

**सुनिल नारायण चौधरी**
एम.ए. (मराठी)

# शास्त्रीय संगीताची तोंडओळख

सोनाली दिनकर वराडे.
एफ.वाय.बी.ए.

*Music is the voice of God*

असे म्हटले जाते की संगीत ही परमेश्वराची वाणी आहे. संगीतामुळे मन प्रसन्न होते. काम करण्यासाठी उत्साह निर्माण होतो. परमेश्वर प्राप्तीचे साधन म्हणजे संगीत. असे हे संगीत माणसासाठी अत्यंत आवश्यक आहे. आज फुफ्फुसाला होणाऱ्या विकारांवर संगीत हे गुणकारी औषध आहे हे शास्त्रज्ञांनी सिद्ध केलं आहे. केवळ मानवासाठीच नाही तर फुले, पाने, फळे यांच्या योग्य वाढीसाठी संगीतशास्त्राचा वापर केलेला दिसुन येतो. पूर्वी श्रीकृष्णाने बासरी वाजवून गावातील गायींना एकत्र एकाठिकाणी जमविले ही गोष्ट आपल्या सर्वांना माहितच आहे। अशा या संगीताने आज सारे विश्व व्यापले आहे आणि सर्वत्र नवचैतन्य निर्माण केले आहे. केवळ संगीत या विषयाचे सखोल ज्ञान असणाऱ्या माणसालाच संगीत ऐकावेसे वाटते असे नाही तर प्रत्येक सजीवाला संगीत ऐकावेसे वाटते. कितीतरी माणसे अशी असताता की ज्यांना काम करतांना संगीत नसल्यास त्यांचे कामात लक्ष लागत नाही. एवढेच काय पण काही विद्यार्थ्यांची गोष्ट अशी की त्यांना अभ्यास करतांना रेडिओ, टेपरेकॉर्डर हवा असतो. याचे कारण एकच आहे की संगीतामधे अशी एक जादू आहे की ज्यामुळे माणसाला कष्टाचा विसर पडतो. आपल्या जीवनाची सकाळच मुळी रेडिओवरील सुश्राव्य अशा भक्ती संगीताने होते आज भारतीय संगीताचा प्रसार भारता बाहेरही मोठ्याप्रमाणात झालेला दिसून येतो. मोठ्या रसिकतेने पाश्चात्य संस्कृतीचे लोक आपल्या शास्त्रीय गायनाचे, वादनाचे धडे घेत आहेत. त्यामधे यश गाजवित आहेत सतार, संतुर, तबला, बासरी, सरोद इ. वाद्यांबरोबर हिंदुस्तानी गायकी त्यांनी चागल्या प्रकारे आत्मसात केली.

भारतीय संगीताच्या उत्तर हिंदुस्तानी संगीत व कर्नाटकी संगीत अशा दोन पद्धती आहे. दाक्षिणात्य म्हणजे कर्नाटकी संगीत पद्धती कर्नाटक, मद्रास ,म्हैसूर, तेलंगाना य प्रांतात प्रचलीत आहे. तर उत्तर हिंदुस्थानी पद्धत मुंबई, गुजरात, पंजाब, राजस्थान ,मध्यभारत, बंगाल, बिहार; या प्रांतात प्रचलित आहे. या दोन्ही पद्धती जवळ जवळ सारख्याच आहेत. फक्त त्यांना प्रस्तुत करण्याची पद्धत थोडी भिन्न आहे. भारतीय संगीतात भावगीते, चित्रपट गीते यांचा समावेश होतो. तर लोकसंगीतामध्ये त्या त्या प्रदेशातील काही वैशिष्ट्य पूर्ण गीतांचा समावेश होतो. जसे महाराष्ट्राच्या मराठमोळ्या सांस्कृतीचं आजोड लेण. लावणी म्हणजे मराठी माणसाच्या तरल, हळव्या भावनांचा फुलोरा. शृंगारप्रधान ह्या विषयाखेरीज सामाजिक विषय असलेल्या लावण्या आज तयार केल्या जातातय स्त्री-मुक्ती,व्यसन मुक्ती साक्षरता यासारखे विषय लोकगीतांच्या माध्यमातून समाजातील सर्व लोकांपर्यंत पोहचविले जातात. कारण लोकगीतांचा ढंग हा ग्रामिण बोलीभाषेचा असतो. त्यामुळे लोकगीते चटकन लोकप्रिय होतात. या गीतप्रकाराला एक ठेका असतो. त्यामुळे अशी लोकगीते जीभेवर वर्षानुवर्षे टिकून राहतात.

भारतातील शास्त्रीय संगीताची तोंड ओळख करुन घेतांना आपणास लक्षात येते की गायन, वादन, नृत्य यांचा सुरेख संगम म्हणजे संगीत या गायनात निरनिराळे राग, त्यांचे आरोह , अवरोह विस्तार, आलाप, ताना, चीज यांचा समावेश होतो. भारतात वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या संगीत तज्ञांनी वेगवेगळे गायन प्रकार निर्माण केले. त्याला त्यांची वैशिष्ट्य पुर्ण गायकी म्हटले जाते. ख्याल गायकी, ध्रुपद गायकी ,धमार गायकी, टप्पा ,ठुमरी, भजन, गझल इ.

'ख्याल' गायकीची सुरवात सुलतान हुसेन शरकी यांनी पंधराव्या शतकात केली असे म्हटले जाते. ख्यालहा पारशी शब्द आहे. त्याचा अर्थ विंचार किंवा कल्पना असा होतो. मुगल बादशाह मुहम्मदशहा यांच्या दरबारातील सदारंग व दारंग या गायकांनी हजारो ख्याल बनविले , जे आजही प्रचलीत आहेत. आज सर्वत्र ख्याल गायकीच गायली जाते.ख्यालचे छोटाख्याल व मोठा ख्याल असे दोन प्रकार पडतात. बंदिश ही ख्याल गायकीचा आत्माच आहे. ख्याल गायकी रंगवण्यासाठी एकाहून एक सुंदर बंदिशी असाव्या लागतात. बंदिशी म्हणजे स्वर, लय, काव्य यांचे समतोल मिश्रण होय. अमिर खुसरो यांनी कव्वलीच्या आधारे अनेक छोटे ख्याल निर्माण केले.

'ध्रुपद' हा भारतातील एक वीररसप्रधान गीत प्रकार मानला जातो. ग्वाल्हेरचे राजा मानसिंग यांनी या गीतप्रकारास खुप लोकप्रिय केले. त्यावेतर संपूर्ण देशात त्याचा प्रसार झाला. अकबर बादशाहाच्या वेळी हा गीतप्रकार अतिउच्च शिखरावर पोहोचला होता. अकबराच्या दरबारातील तानसेन हे प्रसिद्ध गायक ध्रुपद गायकी गात असत. ध्रुपद गीताचे काव्य उच्चप्रतिचे असते. त्यात ईश्वर भक्ती, परमेश्वरलीला, महायुद्धाचे वर्णन केलेले दिसून येते.

'धमार ' गायकीला होली सुध्दा म्हणातात फाल्गून महिन्यात होणाऱ्या उत्सवाचे वर्णन या गीतात असते हे गीत धमार नावाच्या तालात गायले जाते म्हणून ह्या गीत प्रकाराला धमार हे नाव देण्यात आले आहे. या गीत प्रकारात शब्दांना महत्व असते.ध्रुपदा प्रमाणे हा गीत प्रकार गंभीर आहे. या गीत प्रकारात बोल तानेला विशेष महत्व आहे.

नवी शोरी नावाच्या गायकाने टप्पा या गीत प्रकारालाप्रचलित केले. हा गीत प्रकार पंजाब या राज्यात प्रसिध्द आहे. पंजाबी भाषा ही या गीत प्रकारासाठी अधिक उपयुक्त मानून या गीत प्रकाराची रचना केलेली आहे. या गीत प्रकारात शब्द कमी असतात. परंतु प्रत्येक शब्दांच्यामधे ताना बसविलेल्या असतात. हा गीत प्रकार गाणाऱ्या गायकाचा गळा सरावलेला असावा लागतो.आणि हे गीत शृंगाररस प्रधान असते. पूर्वीच्या काळी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे तयार करण्यासाठी प्रथम टप्पा हा गीत प्रकार शिकविला जात असे. आज लखनऊ, बनारस मध्ये टप्पा विशेष प्रचलित आहे.

'ठुमरी' हा एक शृंगाररस प्रधान, भावना प्रधान गीत प्रकार आहे. लखनऊचे शेवटचे नबाब बादशाह आलीशाह यांनी १०० वर्षापूर्वी ठुमरीला प्रोत्साहन देऊन अधिक लोकप्रिय केले. यामधे शब्द फार थोडे असतात पण ते आकर्षक रीतीने गाऊन त्यांच्यामधे भाव निर्माण करणे हे या गीत प्रकाराचे वैशिष्ट्य आहे. विशिष्ट रागातच ठुमरी गायली जावी असे बंधन नाही. फक्त स्वरसमुदाय आकर्षक रीतीने जीभेवर नाचविणे याला महत्व असते. ठुमरी या गीत प्रकारावर आधुनिक काळात पंजाबातील गायकीचा

प्रभाव दिसून येतो.

'भजन' हा गीतप्रकार काव्याला गायनाच्या माध्यमातून गायल्यामुळे आला. पूर्वी मीराबाई, कालीदास, सुरदास, कबीर इ. संतांनी रचलेले काव्य विभिन्न रागात गायल्याने हा गीत प्रकार अस्तित्वात आला. भजन विविध छंदात रचले जाते व विभिन्न तालात गायले जाते. पुष्कळ गायक भजन रागदारीत गातात. जर ठुमरी गायक भजन गाऊ लागला तर त्याला हलक्या संगीताचे रुप प्राप्त होते. भजनाची गायकी कशी असावी याबाबत कोणतेही नियम नाहीत. फक्त परमेश्वर भक्ती संबंधी हे गीत आसावे. म्हणून या गीत प्रकारात गायकीपेक्षा शब्दांना विशेष प्रधान्य आहे.

त्यानंतर शेवटचा गीत प्रकार म्हणजे 'गजल' .'गजल' हा शब्दप्रधान गीत प्रकार आहे. या मध्ये शब्दांना फार महत्व असते. गजल गाण्यासाठी एक आकर्षक धुन पुरेशी असते. प्रमाची हकीकत किंवा प्रेमाचा व्यवहार हा या गीत प्रकाराचा मुख्य विषय असतो. कांही वेळा उडत्या चालीवर देखील गजल गायली जाते.

अशा प्रकारे शास्त्रीय संगीतात गायकीच्या वैशिष्ट्यामुळे काही गीत प्रकार अस्तित्वात आलेले आहेत. आज भारतात हे गीत प्रकार गाणारे अनेक प्रसिद्ध कलावंत आहेत या कलावंतांनी अपयशाने न खचता, आर्थिक परिस्थितिची तमा न बाळगता स्वतःला या क्षेत्रात झोकून दिलेले आहे. आणि संथ वाटणाऱ्या नदीच्या प्रवाहा सारखा स्वर विस्तार मधुर आणि लडिवाळ सरगम, तान घेण्याची सुंदर लकब यामुळे श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलेले आहे. आणि या सुरांच्या खळखळणाऱ्या झऱ्यामधे रसिकांनीही स्वतःला न्हावून घेतले आहे.

अशा या शास्त्रीय संगीताचे धडे घेऊन यशस्वी गायक होण्यासाठी संगीताची साधना, मेहनत करावी सागते. हे सांगतांना पं.जितेंद्र अभिषेकी यांचा मुलगा शौनक अभिषेकी म्हणतात की 'असं म्हटलं जात की संगीतासाठी योग्य प्रकारे गळा तयार करायचा असेल तर त्यासाठी अनेक पथ्य पाळावी लागतात. आंबट, तेलकट, तुपकट न खाणे वगैरे. पण सरस्वतीला त्याग कष्ट, प्रामाणिकपणा हवा आहे. आणि म्हणून तिची तन,मन, धन, लावून सेवा करणे हेच सर्वात मोठं पथ्य आहे."

## विनोद

१) डॉक्टर :- तुला काय झालं, हे मला
बिलकुल समजत नाही. मला वाटतं,
हा जास्त पिण्याचा परिणाम आहे.
पेशंट :- ठीक आहे, तुमची
उतरली की मी परत येईन.

२) सोमणकाकांनी कधी नव्हे ते
लॉटरीचे तिकीट विकत घेतले.
सुदैवाने त्यांना एक लाखाचे बक्षिस लागले.
त्यानी ही शुभवार्ता सोमण काकूंना सांगितली.
त्या नेहमीप्रमाणे ओरडल्या
"बक्षीस गेंल खड्डयात. आधी मला सांगा,
तुम्ही मला न सांगता तिकीट का विकत
घेतल होत ?"

**ऱ्हृषीकेश अ.सकळकळे**
एस.वाय.बी.कॉम

# तडजोड

**सुनिल नारायण चौधरी**
**एम.ए.मराठी (प्रथम वर्ष)**

लग्न होऊन सासरी येण्यास सुनीताला एक महिना झाला होता. सासरचं वातावरण थोडफार वेगळंच. सासुसासऱ्याचा स्वभाव काहीसा अहंम. तीन दुणे पाच म्हणचे पाचच सहा कधीच नाही. सदानंद शहाणे मागच्याच वर्षी पोष्टातून रीटायर्ड झाले. त्याच्या हातून पोस्टात एक पैची सुध्दा गफलत झाली नाही सर्व व्यवहार सुरळीत पार पाडले पण घरातील व्यवहार ते व्यवस्थित चलवू शकल नव्हते. सासू रेशमाबाई काहीश्या चिडचिड्या स्वभावाच्या. थोड्याश्या कारणावरुन भांडण करण्यास लगेच तयार. खर तर सासरे सदानंदराव आणि सासु रेशमाबाई यांच्या या स्वभावाला एक कारण होत ते म्हणजे त्यांच्या लग्नानेतर पाच वर्षांना त्याना पहिला मुलगा झाला आणि तो दोन वर्षाचा असतांना कावीळच्या आजाराने मरण पावला. तेव्हापासून नेहमी घरात असणारे सासु सासरे यांच्या स्वभावात हा बदल झाला. पहिल्या मुलाच्या मृत्युनंतर ३ वर्षांनी त्यांना पुन्हा मुलगा झाला. त्याच नाव सुशील. त्याच सर्व शिक्षण पूर्ण करुन सदानंदरावांनी त्याला जुनियर कॉलेजला लेक्चररची नोकरी मिळवून दिली.

सुशीलच्या आणि सुनीताच्या लग्नास आज एक वर्ष पुर्ण झाल त्या निमित्ताने बाहेर हॉटेलात जाण्याचे त्यांनी ठरवताच रेशमाबाईंनी त्यांच्या आनंदावर पाणी फिरवलं. त्या त्वरीत चढत्या सुरात बोलल्या "आम्ही नव्हते असे आमच्या वेळी रिकामे नाटक केले. तुम्हाला मजाच मारायची तर मग घरी काय कमी आहे.?"

सुशिलला आईच्या या बोलण्याचा राग आला. करणार काय इकडे आड तिकडे विहीर ही त्याची स्थिती. सुनीताला मात्र सासुंच्या या बोलण्याचा खुप राग आला ती लगेचच उत्तरली -

"तुमचा जमाना आणि आताचा जमाना यात फरक आहे. आम्ही फक्त मजा मारण्या साठीच बाहेर जाणार हे तुम्हाला कुणी सांगीतले आम्हालाही आमची मन आहेत. आमच्या आयुष्याबद्दल कधी आम्ही एकांतात विचार करु नये की स्वतः निर्णय घेण्याइतकी आम्हाला मोकळीक असु नये ?" बस सुनेच्या या बोलण्यावरुन सासुबाईंनी फटाफटा फुटाणे फोडण्यास सुरुवात केली त्या संतापाने बोलल्य " तुम्हाला स्वतंत्रपणे निर्णय घ्यायचे ना मग ते या घरात जमणार नाही. नाहीतर तुम्हाला चारही वाटा मोकळ्या आहेत. तुमचा सामान घेऊन तुम्ही कोठेही जाऊ शकता " सुशीलची यावरची भुमिका मात्र ज्याला जस वाटेल त्याने तसं करावं अशी होती. सुशीलची ही भुमिका सुनिताला पसंत पडली नाही. आयुष्यात स्वतः काही निर्णय घेण्याबाबतीत सुशील पूर्णपणे अयशस्वी ठरत होता.थोड्याशा कारणांवरुन सासुबाई सुनीताच्या आईबापा विषयी वाईट उद्गार काढत होत्या. त्यांच्या या बोलण्याला उत्तर देत असतांनाच सासुबाईंनी सुनीताच्या गालफटात एक ठेवून दिली. तिला घरा तिला घरा बाहे काढल. सुशील हे सार पहात होता. त्याने तिला समजावून घरात आणलं.

तितक्यात सासूबाईंनी पुन्हा तिच्या खोड्या काठण्यास सुरुवात केली. आता मात्र सुनीता चिडली. झाल्या प्रकारावर एकच उपाय होता. माहेरी जाणं. यापलीकडे करणार तरी काय? तडजोड करणारं तेथे कुणीही नव्हतं.

जातांना सुनिताने एक चिठ्ठी लिहिली " मी या घरातून संतापाने जात आहे. घरात सुख, शांती नांदावी असं तुम्हाला वाटत असेल तरच मला घ्यायला या. माझी मी एकटी राहून जीवन जाण्यास समर्थ आहे. माणसं म्हातारी झाली की बुद्धीचा लिलाव करतात म्हणे मग ते खोटे की खरे कुणास ठाऊक "

तुमची
सुनीता

माहेरी सुद्धा दादा वहिनी याचं बोलणं. आईबाबा काही बोलत नव्हते. कारण त्यांना त्या घरात रहायच होत. म्हातारपणात तडजोड करुन आपलं आयुष्य तेथे घालवायच होत. म्हणूनच आपल्या मुलीबद्दल दादा वहीनीला ते बोलू शकत नव्हते. सुनीताला सासचं सुख नाही की माहेरच समाधान नाही जीवन कसं कंटाळाला होऊन गेल होत "मी.....मी....काय करावं ? एकटं राहून बघाव " असा विचार करीत असतांनाच बालपणची मैत्रीण रुपाली तिला भेटायला आली. सुनीताने आपली सरी व्यथा तिला सांगितली. मनात असलेल दुःख कुणाला तरी सांगितल्या शिवाय मन हलकं होत नाही. दुःख काहीक्षण दुसऱ्या समोर ओकाव म्हणूनच तिने आपली सारी व्यथा तिला सांगितली. रुपाली ही सुनीताची समवयस्क होती .पण बुद्धीनं मात्र हुशार होती. ती या व्यथेचा विचार करते. ' मानवी मनचं असं आहे की त्यात बदल करण कठीण, पण भूतकाळ आणि भविष्यकाळ यांचा अचूक मेळ घालून वर्तमान घडवावा, हे जर झालं नाही तर जगणं व्यर्थ, सुनीताच्या घरात अशाच परिस्थितीची गरज होती. तेथे तडजोड करणारं कुणीतरी हवं होतं. रूपाली बोलली "लहानतोंडी मोठा घास अस समजत नसशील तर एक उपाय सांगते, तू जर एकटी राहण्याचा विचार करत असशील तर ते वाईट ठरेल. तुझ्या एकट्या राहण्यामुळे समाजाची तुझ्याकडे बघण्याची दृष्टी बदलेल. लोक घोड्यावरही चालू देत नाही आणि पायी सुध्दा चालू देत नाही. कुठेतरी तडजोड आवश्यक आहे."

सुनीता म्हणाली " सासरचं सुख नाही की माहेरच समाधान नाही."

" पण तुझे सासरे जन्मभर टिकणार नाही. त्यांच्या म्हातारपणात त्यांना कुणाच्यातरी आधाराची गरज भासेल, तुला जर तुझा संसार व्यवस्थित सुखासमाधानानं करायचा असेल तर तुला काही प्रमाणात तडजोड करावी लागेल. परिस्थितीच समायोजन करावं लागेल. तुझ्या सासरहुन निरोप, पत्र आल्यावर मला कळव." इतके बोलून रूपाली निघून गेली. रूपालीच्या या तडजोडचा सुनीताला राग आला. मीच कोठपर्यंत तडजोड करावी. त्यांना त्यांच घोडं कुठपर्यंत नाचवू देउ? मलाही काही आत्मसन्मान आहे." पण लगेचच दुसऱ्या मनात विचार आला" का नाही एकदा प्रयत्न करून बघायचा" झालं सासरकडची पत्राची वाट बघत सुनीता तेथे काही दिवस थांबली. आज सुशीलचा निरोप आला होता, तो परवा येणार होता. हा निरोप मात्र सुनीताने रूपालीला कळवला. सुशील आला त्या दिवशी रूपालीही आली. इकडच्या तिकडच्या गप्पानंतर मूळ विषयाकडे रूपालीने वळावयास सुरवात केली. सुशीलची नाराजी होती. रूपालीने एक विनंती केली. मी तुमच्याकडे फक्त पाच दिवस सुनीतासह येउ का?

यावर सुशील लगेचच बोलला.

" पण मी सुनीताला घ्यायला आलो नाही."

" जेव्हा घ्यायला याल तेव्हाची ही गोष्ट " तुम्ही तुमच्या आईबाबांना विचारून आल्यावर मला कळवा."

सुशीलने मात्र आज एक निर्णय घेतला. आईबाबांना न विचारता सुनीताला घेऊन जायचं. सोबत रूपाली सुध्दा येणार होती.

स्वतःच्या घरी येता बरोबरच " आलात लक्ष्मीबाई संताप शांत करून. कुठे गेली तुमची ती चिठ्ठीतील भाषा...... तुझ्या माहेरची पत कळाली किती आहे ते? " स्वागतपर बोलण्यास उत्तर देत असतांनाच रूपालीनं सुनीताला थांबवलं.

दोन दिवसात सुनीताच्या सासुसासऱ्यांचा स्वभाव रूपालीन पुर्णपणे ओळखला, सार वातावरण समजून घेतल. योगायोगाने एके दिवशी सर्व मंडळी जमली असता रूपाली बाबांना म्हणाली " तुम्हाला काहीतरी सांगाचय आहे. उगीचच लहानतोंडी मोठा घास नको असं असेल तरच सांगते. आयुष्यात काहीतरी देता,घेता आलं पाहिजे. आपल्या सुखद बोलण्याने समोरची व्यक्ती काही क्षण जरी आपलं दुःख विसरून आपल्यात सामील होत असेल तर त्या आनंदासारखा दुसरा कोणताच आनंद नाही. माझं ते खरं नसुन , खरं तेच माझ या नियमाने सर्व प्रश्न सुटतात. कुठेतरी तडजोड हवी आहे." ताठरपणा शेवटपर्यंत टिकत नाही. मृत्युसमोर तरी हार मानावीच लागते.

बाबांना रूपालीचा हा उपदेशाचा डोस आवडला नाही." जा-जा मोठी भाषण देतेय, अजून तुझे दुधाचे ओठ सुकले नाही आणि...म्हणे ताठरपणा नको, मृत्युसमोर जर हार मानली तर दोन चार दिवसाची सवलत देइन का तो?"रूपाली क्षणभर खिन्न झाली. आणखी काय समजावू यांना.तरी पण प्रयत्न सोडला नाही."माझे अनुभव तुमच्या अनुभवापेक्षा खूप कमी आहेत. तुमच्या प्रश्नाचं उत्तर आहे, पण तुम्ही समजणार असणार तरच सांगते," मृत्यु हा वेळेवर येतो. सवलत सेकंदाचिही देत नाही. त्याला हसत-हसत सामोरे जाऊन पुढं ढकलणं आपल्या हातात आहे. जेव्हा माणूस आयुष्यात आनंदी,हासरा,सुखी,समाधानी असेल तरच हे सारं शक्य आहे. घरात शांततेन वागल्यास सर्व समस्या सुटतात, तुमच्या म्हातापणची काठी तुमचा मुलगा तुम्हाला आधार म्हणून हवा असेल तर मुलाशी आणि सुनेशी समजूतदारपणानं वागा. त्यांच्या अडीअडचणी समजून घ्या. तुमच्या अडचणी त्यांना सांगा, काही दिवसांनी तुम्हाला नातू होणार तरिही तुम्ही असच करणार. कुठेतरी तडजोड करून शांती निर्माण करा." चार दिवसांनी रूपाली परत निघून जाते.

रूपालीच्या या बोलण्याचा बाबांनी मनात खोलवर विचार केला. "खर आहे. तडजोड हवी आहे." आणि घरांत तस आचरण देखील सुरू झाल. जे काम घरातील व्यक्तींनां जमल नाही ते बाहेरच्या व्यक्तीने करून गेल्याचा पश्चाताप याच बाबांना झाला. आईबाबा, सुशील, सुनीता सारे मिळून मिसळून वागत होते. घरात शांती नांदत होती. माझं तेच खर अस नसून खरं तेच माझ अस वक्तव्य करून आनंदी राहिल्यास जीवन विलासात घालवता येतं. संसाराचा रहाटगाडा समायोजनाने ओढणेच शक्य आहे. हा मनोमन विचार करत असतांनाच आईबाबांच्या कानावर आवाज पडला "आम्हाला नमस्का करू द्या." सुशील आणि सुनीता घराबाहेर पडले. बाबा मात्र नवीन पाहूण्यांची वाट बघत होते.

**सुनिल नारायण चौधरी.**
एम.ए. प्रथम वर्ष मराठी,

## - तुच मला शिकविले -

निराशेच्या अंधारात असतांना
आशेच्या प्रकाशात यायला
ध्येयहीन असतांना
ध्येय गाठायला
पेचात असतांना
शांतपणे विचार करायला
तुच मला शिकविले.
सहकारी लढत असतांना
त्यांना साथ द्यायला
अशक्य गोष्टी पाहतांना
त्या करायला
प्रतिस्पर्धांच्या नजरेला नजर देत
त्याचा बुध्दीभेद करायला
तुच मला शिकविले.
स्वःच्या आगीत जळतांना
आग लावणाऱ्यांच्या कौशल्याचे
कौतुक करायला
अपमानाच्या काट्यांवर
फुल समजून पाय ठेवायला
काट्यांना आव्हान समजून
त्यांची फुलं बनवायला
तुच मला शिकविले.
लोकांच्या शिव्यांना फुल समजून
स्थिरपणे उभ राहायाला
शंकाकुशंकांचे काटे मनाला
टोचत असतांना
फक्त गुलाबाकडे लक्ष द्यायला
तुच मला शिकविले.
पहाडावर डोके आपटून
पहाड फोडायला
आकाशाकडे पाहून
तारे धरायला
दगडांच्या सहवासात बसून
दगडांवर प्रेम करायलाही
तुच मला शिकविलेस.
विष ही अमृत म्हणून पचवायला.

**गणेश डी. पाटील.**
टी.वाय.बीए.
( इंग्रजी )

## -विसर -

अश्रूंचा हा बांध फुटूनी
हृदय येते नित्य भरूनी
जाशील इतक्या लवकर विसरूनी
नव्हते जाणीले कधी कुणी
नाही आता आनंद जीवनी
अंधारल्या दिशा चारही
क्षणोक्षणी तुझी आठवण ताजी
आजन्म मनी व्यापुनच राही.

**सुधीर पी. केने**
एम.ए.(ज्युनी.)

# प्लेगचे पुन्हा आक्रमण...

**नीतीन रामदास बडगुजर**
एफ.वाय.बी.ए.

सकाळचा चहा घेऊन मी सहज पेपर चाळीत बसलो होतो.तोच माझे लक्ष एका दुःखाने ओतप्रोत भरलेल्या बातमीकडे वेधले गेले. ती बातमी वाचता क्षणी मला " उषःकाल होता होता काळरात्र झाली" या सुरेश भटांच्या भावस्पर्शी गीताची आठवण झाली. १९६८ पासून मानवाच्या बुध्दीसामर्थाच्या बंदोबस्तात असलेल्या प्लेगने दि.२२ सप्टेंबर १९९४ ला पुन्हा डोके वर काढले व प्लेगची पुनआक्रमणाची ही दुःखद घटना मनाच्या एका कोपऱ्यात शल्याचा ओलावा सांडून गेली.

तशी मानवजातीला प्लेगची माहिती अतिप्राचीन काळापासून म्हणजे तिसऱ्या शतका-पासूनच होती असा उल्लेख अलबर्ट क्रॉमस यांच्या लिखाणात सापडतो. प्लेगचा पहिलाच रूग्ण सहाव्या शतकात म्हणजे भारतीय भागवत पुराणात इ.स.पूर्व ८०० मधे सापडला. या रोगाला उत्तर भारतात 'महामारी' म्हणत असत. मोगलकालीन जहांगिरच्या काळात आग्रा इथे इ.स. १६६२ साली प्लेगची साथ आली. त्यानंतर १८९४ सालातील हाँगकाँग येथील साथीमुळे संपूर्ण युरोपिअन उपखंडातही प्लेगने मृत्युचे थैमान घातले. जागतिक साथीतून मुंबई बंदरातून भारतात इ.स. १८९५-९६ साली प्लेगची साथ झाली. एखाद्या युध्दात जशी मनुष्यहानी होते. तशी म्हणजे सुमारे ५ लक्ष लोक या महामारीत मेले. १९२८ साली हैद्राबादला प्लेगची साथ आली होती.

१९२८ नंतर औरंगाबादला प्लेगची साथ आली होती असे मराठवाड्याचे ज्येष्ठ स्वातंत्र्य- सेनानी पद्मविभुषण गोविंदभाई श्रॉफ यांनी एका वृत्तपत्रात प्रसिध्दीस दिले. १९६७ नंतर भारतात प्लेगचा एकही रूग्ण आढळून न आल्यामुळे औषधनिर्मितीचे काम बंद करण्यात आले होते. परंतु आता अचानक हा भयानक उद्रेक झाला. या प्लेगमुळे जनतेत प्रचंड भीती पसरली. जवळजवळ २५-३० वर्षापासून बाटलीत बंदिस्त केलेला प्लेगचा हा राक्षस परत बाटलीतून बाहेर येण्याचा प्रयत्न करतांना दिसला. बीड जिल्ह्यातील 'मामला' या गावी प्लेगचे चिन्ह ध्यानी आल्यावर शासन यंत्रणा सज्ज झाली. प्लेगच्या पूर्वीच्या भीतीमुळे क्षणभर सर्व जण हादरले. आणि त्यातच गुजराथच्या प्लेगमुळे पोटात गोळा उठला. पहिल्याच दिवशी सुरत शहरात प्लेगने १०० जणांचा बळी घेतला. लगेचच सुरत शहर प्लेगग्रस्त घोषित करण्यात आले. सुरतहुन दुसरीकडे लोकांचे स्थलांतर होऊ लागले. स्थलांतरामुळे संसर्गाचा प्रसार वाढला. व इतरत्रही प्लेगच्या भीतीचे सावट निर्माण झाले. बीड जिल्ह्यातील ५० गावे प्लेगच्या विळख्यात सापडली. गुजराथमधे बडोदा, अहमदाबाद आणि अमरेली ही तीन जिल्हेही प्लेगच्या विळख्यात सापडली. त्यामुळे ही तीन जिल्हेही प्लेगग्रस्त घोषित करण्यात आली. प्लेगमुळे मृत्युमुखींच्या संख्येत वृध्दी झाली.तर संशयित प्लेगग्रस्त रूग्णांचे अगणित प्रमाण वाढले.

प्लेगच्या या भीतीमुळे मराठवाडा, गुजराथ त्यातल्या त्यात खान्देशातही भीतीचे सावट पसरले. कारण सुरतहून जवळ-जवळ २६ हजार नागरिकांनी एकट्या जळगाव जिल्ह्यात आगमन केले. युध्दपातळीवर सकाळ, दुपार, संध्याकाळ मृतांचा नुस्ता लोंढाचा लोंढा बाहेर पडत होता. संपूर्ण हाहाःकार माजला होता. आक्रोश आणि दुःखाच्या महासागरात जनता बुडत चाललेली होती. नाका-तोंडावर रूमाल बांधून लोक वावरत होते. रूग्णांच्या उपचारासाठी डॉक्टर येण्यास तयार नव्हते प्लेग हा संसंर्गजन्य रोग असल्यामुळे ते सुध्दा घाबरत होते. अशा प्रकारचे विदारक चित्र, जे डोळ्यांना पाहणे शक्य नव्हते. ते मानवाच्या अंत:-पटाला पाहणे कसे बरे शक्य होईल?

शासन व डॉक्टरांच्या योजनाबध्द सेवेच्या यंत्रणेमुळे प्लेग काहीसा आटोक्यात येण्याचे चिन्ह दिसू लागले. अंधारात एक आशेचा किरण चमकू लागल्याचे जाणवले, आणि नव्या दमाने पावले टाकली गेली. ठिकठिकाणी प्लेग विरोधी अभियान उघडले गेले. स्वच्छता मोहिमा राबविण्यात आल्या. संत गाडगेबाबा, महात्मा गांधी यांनी केलेल्या स्वच्छतेबाबतच्या संदेशाची आठवण होऊ लागली. त्याच प्रमाणे घराघरात तसेच इतर सार्वजनिक स्थळी व रस्त्यारस्त्यावर मुषकसंहार मोहीम राबविण्यात आली. शासनाने घराघरात जनतेच्या प्राथमिक उपचारासाठी टेट्रासायक्लीन सारख्या गोळ्या व त्याचप्रमाणे उंदीर मारण्याच्या गोळ्या मोफत वाटून मदतीचा हात पुढे केला. या कार्यवाही सोबतच जनतेला घरोघरी तसेच शाळा न महाविद्यालयाच्या माध्यमातून प्लेग म्हणजे काय? तो कसा होतो ? त्याची कारणे काय? व त्यासाठी कोणते उपाय योजिले पाहिजे या संदंभातील परिपत्रके वाटण्यात आली.

प्रसार माध्यमांच्या साहाय्याने पथनाट्यासारख्या कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले.

प्लेग म्हणजे काय? तर प्लेग म्हणजे हा रोग येर्सिनिया-येस्टिझ या जंतूमुळे होतो. हा आजार प्रथम रानटी उंदरांना होतो. रानटी उंदरांच्या संपर्कात घरगुती उंदीर आले म्हणजे त्याचा प्रसार पिसव्यांमार्फत होतो. रोगग्रस्त उंदीर मेल्यास उंदराच्या शरीरावरील पिसवा ज्या माणसांना चावतात त्यांच्यामार्फत या रोगाचा प्रसार होतो.यासाठी सर्वात महत्वाचा उपाय म्हणजे आपल्या घरात व घराभोवती स्वच्छता राखणे हा होय. स्वच्छतेचे महत्व फार विशाल आहे. ते तंत्र आपण बाळगलेच पाहीजे.

आज आपण प्लेगबद्दल भीती बाळगण्या-ची गरज नाही. किंवा गाफील राहून चालणार नाही. गणपतीचे वाहन उंदीर याचे विर्सजन करण्याची पाळी आता आली आहे. शेक्सपिअरच्या पाईड-पायपरच्या पुनरावृत्तीची आज गरज आहे. या प्लेगला संपूर्ण जगातून घालवला पाहिजे. अशी खंबीर भूमिका घेऊन निर्भयपणे त्याच्या निर्मुलनासाठी एकजूट व्हायला हवे.

# २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावरील आव्हान

भूपेंद्र धांडे
प्रथम वर्ष - कला.

आज " एड्स " ही एखाद्या देशाची किंवा विशिष्ट समाजाची समस्या राहिली नसून तो संपूर्ण जगाला भेडसावणारा प्रश्न आहे. अणुयुध्द आणि पर्यावरणाचा विनाश यापेक्षा महाभयंकर महासंकट या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्यासमोर उभे ठाकले आहे. या रोगाबद्दल आपल्याला वाटणारे भय जितके खरे आहे, तितकेच त्यासंब्धीचे अज्ञानही खरे आहे.

'एड्स' म्हणजे 'अॅक्वायर्ड इम्यूनो डिफेशि-यन्सी सिंड्रोम' म्हणजेच उपर्जित प्रतिक्षमत्रुटी संलक्षण. ( रोग प्रतिकार शक्ती नष्ट करणाऱ्या विषाणूंचा संसंग) या रोगास मुख्यतः तरूण पिढी बळी पडत असल्याने विद्यार्थी, कामगार, झोपडपट्टीत राहणारे, वगैरे समाजातील सर्व थरांमधील सर्वांना या रोगासंबंधी शास्त्रीय माहिती देणे आवश्यक आहे. कारण या रोगावर प्रतिबंधक औषध वा लस उपलब्ध झालेली नाही. हा रोग एच.आय.व्ही. (ह्यूमन इम्यूनो डेफिशियन्सी व्हायरस) या विषाणूमुळे होतो. याचा अधिशयन काळ दीर्घ असल्याने व्यक्ती बाह्यतः निरोगी दिसली तरी नकळत या विषाणूंचा प्रसार करते. या रोगाचा प्रसार विषाणू बाधित रक्त, पुरूषांचे वीर्य, स्त्रियांचे योनिस्त्राव, अश्रू , लाळ यांच्या संपर्कातून येतो.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार जगात २२,२०,००० पेक्षा जास्त लोकांना एच्.आय.ही. ची लागण झाली आहे. एड्स आपल्याला मारत नाही, तर आपली लैंगिक स्वैर वागणूकच आपला स्वैर विनाश घडवत आहे. वास्तविक विनाशाकडे नेणारे हे आचार-विचार बदलवण्यासाठी काहीही चमत्कारांची, काही क्रांतिकारक शोध लागावा अशीही आवश्यकता नाही. तर सर्वांना साध-सुध लैंगिक ज्ञान द्यायला हवे. स्त्री असो वा पुरूष, त्यांना लैंगिक अवयव, त्यांची वाढ, स्वच्छता, त्यांची रचना, कार्ये, लैंगिक सुख, त्यातील धोके, सुखी लैंगिक जीवनासाठी आवश्यक गोष्टी हे सगळ योग्य वयात योग्य पध्दतीन शिकवल पाहिजे.

एड्स वर नियंत्रण करण्यासाठी, त्याला आळा घालण्यासाठी एड्स नियंत्रण कार्यक्रमात एड्स विषयी जनजागृती करणे ही शासन तसेच समाजसेवा करणाऱ्या संस्थांची मोठी जबाबदारी आहे. आज वृत्तपत्र, दूरदर्शन यासारख्या माध्यमातून एड्स विषयी थोडीफार जनजागृती झाली आहे. पण याशिवाय कलापथके, एकपात्री, नाट्यप्रयोग, विविध स्पर्धा, प्रभात फेऱ्या, दिंड्या, प्रदर्शने, चित्रपट इ. माध्यमांचाही मोठ्याप्रमाणावर वापर केला पाहीजे.

एक बाब प्रकर्षाने जाणवते की, एड्स च्या साथीला माणसाची वर्तणूकच जबाबदार आहे. एड्स ला प्रतिबंध घालायचा असेल तर मनुष्याच्या या धोकेदायक वर्तणुकीत बदल घडवून आणला पाहिजे. कोणत्याही वर्तणूकीत बदल हा सहजासहजी होत नसतो. तर त्यासाठी सातत्याने शिक्षण देऊन तरूणांच्या मनावर योग्य संदेश बिंबवणे महत्वाचे आहे.

एड्स च्या साथीचे सामाजिक, आर्थिक दूरगामी परिणाम होत असले तरी दुःख व्यक्तीला व त्याच्या कुटुंबियांना भोगावे लागणार आहे. कणा-कणाने मृत्युला सामोऱ्या जाणाऱ्या एड्स रोगाबरोबर त्याचे नातेवाईकही जिवंतपणे मृत्युचा अनुभव घेतील. अशा परिस्थितीत शासन व स्वयंसेवी संस्था जरी हातात-हात घालून मुकाबला करण्याचे प्रयत्न आणि जागरूकता ही लाख-लाख मोलाची ठरेल.

प्रभावी आरोग्य शिक्षण आणि समाजातील धोकेदायक वागणुकीत बदल हेच एड्सला योग्य प्रतिबंधन ठरेल.

## -शब्द -

शब्द माझे शस्त्र आहे.
शब्द माझे अस्त्र आहे.
शब्दांनीच जिंकेन मी विश्वाला.
शब्दातच मांडेन जिंकलेल्या विश्वाला.
शब्द म्हणजे घाव आहे.
शब्द म्हणजे भाव आहे.
शब्दांनीच वाचविन मी जगाला.
शब्द माझी ढाल आहे.
शब्दाला माझ्या मोल आहे.
शब्दात माझ्या तोल आहे.
शब्दात माझ्या शक्ती आहे.
शब्द माझी भक्ती आहे.

संदीपकुमार चौधरी
प्रथम वर्ष कला शाखा.

## -पश्चात्ताप -

अशी कशी झालीस गं तू
नाही समजू शकली मजला
ना ठाऊक मजला सुटका होईल कशी
कारण होतो मी प्रेमात तुझ्या गुरफटला
मला नाही माहित होतं प्रेम हे होत कसं
पण समजले जेव्हा माझे हे झालं जसं
कारण,
ज्यामुळे झाली माझी
अभिमन्यु सारखीगतं
माहित होतं मला फक्त प्रेम करणं
परंतु-
तुझ्यामुळे समजले मजला फारच
कठीण आहे ते निभवन
ना ठाऊक मजला असे
माझ्यामुळे जीवन तुझे
जाईल रसातळाला असे
कर आता माफ मला
नाही घडणार
माझ्याकडून पुन्हा असे.

वामन जगन्नाथ तेली
१२वी (कला)



कु. वैशाली कुलकर्णी
बेस्ट स्टुडंट
एन.सी.सी. कँप नेतृत्व



कु. प्रिती रडे
गॅदरिंग सेक्रेटरी
एन.एस.एस. ग्रुप लिडर



कु. मीरा लिमये
सचीव, स्टुडंट कौन्सिल

## सर्व प्रथम मानकरी



निकम अविनाश
एम.ए. अर्थशास्त्र
विद्यापीठात द्वितीय



केने सुधीर
बी.ए. अर्थशास्त्र
विद्यापीठात तृतीय



चौधरी प्रशांत
एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र
विद्यापीठात प्रथम



सौ. मुजुमदार रेखा
एम.ए. संस्कृत



कु. कुळकर्णी कामिनी
एम.ए. राज्यशास्त्र



पाटील जयश्री
एम.ए. समाजशास्त्र



राष्ट्रीय सेवा
योजना



युवती सभा



वसतिगृह
मेस कार्यकारीणी

# पत्र

वासंती बोरकर
(एम.ए.) राज्यशास्त्र

"पोस्टमन्" पोस्टमनने आरोळी देताच मी ताडकन उठलो. घाईघाईने दारात पडलेला लिफाफा मी उघडला, आणि वाचू लागलो." प्रिय सागर, माझ्या प्राणसख्या," अशी सुरवात... बापरे ! हे कोणाचं पत्र? म्हणून पत्राच्या शेवटी पाहिले तर-"सर्वस्वी - तुझीच-जान्हवी." अन् मी फूटभर उंच उडालो. म्हणजे परवा कॉलेजसमोरील कॅफेहाऊसमध्ये कॉफी पित बसलेल्या सुंदर पोरीकडे डोळ्यांवर गॉगल लावून -ऊन नसताना- आपण पाहात होतो, तिचं नाव जान्हवी होतं तर... तिला पाहून आपण जी 'हिरोगिरी' केली त्यावर ती बहुदा फिदा झालेली दिसतेय. ती मृगनयनीसुध्दा डोळ्याच्या कोपऱ्यातून आपल्याचकडे पहातेय असं मला सारखं वाटत होत. ते खरं निघालं म्हणायचं... कशावरून? अहो हा काय पुरावा- माझ्या जीवनातलं पहिल-वहिलं गुलाबीपत्र... तशी माझी अनेक 'प्रकरणं' होती. पण जाऊ द्या. आता ग्रीन सिग्नल मिळून गाडी रूळावरून धावतेय ना- मग गेलेल्या स्टेशनांचा कशाला विचार करायचा? मी पत्र पुन्हा पुन्हा वाचले. माझा स्वत:वर विश्वासच बसेना, स्वत:ला चिमटा काढून पाहिला. हो- म्हणजे सगळं सगळं खरं खुर होत तर... असं काय होतं त्या पत्रात?

" प्रिय सागर, माझ्या प्राणसख्या, अरे काल संध्याकाळी तुझं माझ्याकडे लक्ष गेलं म्हणायचं ... कित्ती कित्ती दिवसापासून मी तुझे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करतेय पण आत्ता काय बाई - स्वारी हवेतच चालणार कारण गॅदरींगमध्ये खूप बक्षीस मिळालीयेत ना? तू मला खूप खूप आवडतोस पण माझ्या बाबांना सुध्दा आवडायला हवाय ना. त्याशिवाय मी तुला प्रत्यक्ष भेटू शकत नाही. आणि बाबांना पसंत पडायला तुला ते म्हणतील तसं कराव लागणार-थोडक्यात ' होयबा ' करूनच तू माझ्या बाबांना जिंकू शकशील. तरी तू - - - या पत्त्यावर ये आणि बाबा सांगतील तसं सगळं ऐक. ए.. माझ्यासाठी करशील ना एवढं?

सर्वस्वी तुझीच,
जान्हवी.

मी संध्याकाळी पत्रातल्या पत्त्यावर जायचं ठरवलं. चिमणीच्या विस्कटलेल्या घरट्यासारखे माझे अस्ताव्यस्त केस व्यवस्थित कापले, त्यांना तेल लावून व्यवस्थित विंचरलेत. कपडे इस्त्री केले. होय, पण निघताना शर्ट ' इन ' नाही केला हं ! साधी कोल्हापूरी वहाण घातली. आणि जितका 'सभ्य' दिसता येईल ( जुन्या माणसांच्या भाषेत- आमच्या कॉलेजच्या भाषेत ' ओल्ड गाय' ) तेवढा दिसण्याचा प्रयत्न केला. एरवी अनिल कपूर दिसणारा मी - आज ' रामागड्या' सारखा दिसत होतो. पण काय करता पोरगी गटवण्यासाठी वाट्टेल ते करायलाच हवे. तर माझी स्वारी शेवटी सायकलवर स्वार होऊन गावाच्या बाहेर असलेल्या कॉलनीपर्यंत पोहोचली, आणि घर शोधून काढले. घरासभोवती बाग होती. पुढे व्हरंडा

होता. एक वयस्कर व्यक्ती - बहुधा जान्हवीचे वडील - अस्मादिकांची वाट पहात असल्यासारखे वाटले. त्यांनी मला अपादमस्तक न्याहाळले. ' या बसा' म्हटलं महाशय थोडसे कडक वाटले. नंतर ते म्हणाले " उद्या सकाळपासून संध्याकाळपर्यंत रोज यायचे ! ही कामाची यादी वाचा, पटल तर रोज या." मी नम्रपणे होकार दिला, आणि घरी आलो. सकाळी सात ते संध्याकाळी सातपर्यंत चक्क कामाला बोलावले होते. काम तरी काय असतील इन मीन तीन, पण दुपारी म्हतारा झोपला की जान्हवी बरोबर छान गप्पा मारायला मिळणार. संध्याकाळ झाल्यावर छान तिचा हात हातात घेऊन फिरायला मिळणार या कल्पनेने मी सुखावलो. शिवाय जान्हवीची आणि तिच्या वडीलांची मर्जी राखण्याकरता मला एवढं करणं भाग होतं.

सकाळी गेल्याबरोबर दूध आणाव लागे, झाडांना पाणी घालणे, माडीवर जी तिच्या वडीलांची रुम होती ती झाडून ठेवणे, आलेले फोन घेणे व इतर बरंच काम त्या बाबांबरोबर करावं लागे. नंतर अकरा ते दोन जेवणाची सुटी असे. जेवणानंतर पुन्हा दोन ते संध्याकाळी सातपर्यंत अकाऊंटर म्हणून काम करावं लागे. हे महाशय कुठल्या तरी सेवाभावी संस्थेचं अकाऊँटींग करत असत. काय तर म्हणे निवृत्तीनंतरचा वेळ जात नाही. अहो पण मला वेठीला घरलं होतं त्याचं काय ? हां- तसा मी थोडा आळशीच होतो. आणि मला घर, पुस्तकांचं कपाट व्यवस्थित टापटीप ठेवता येत नाही, मी गबाळा आहे असं आईचे मत होतं. म्हणून मी काहीतरी अधिकाधिक चांगलं शिकावं म्हणून आईने आणि बापूंनी मला शहरातल्या कॉलेजामध्ये घातलं होतं. एक रुम घेऊन दिली होती.

पण आतां जान्हवीकडे रिंगमास्टरच्या हाताखाली व्यवस्थित काम करावे लागणार होतं. हो प्रेमासाठी एवढं नको का करायला दुसऱ्या दिवसापासुन आमची स्वारी कोलूच्या बैलाप्रमाणे राबू लागली. मी मनात रोज चरफडत होतो. कारण आख्खी जान्हवी तर जाऊ द्या तिचं नखही माझ्या दृष्टीस गेल्या पंधरादिवसात पडलं नव्हतं. इतकंच काय. त्या घरात एखादी तरुण मुलगी रहात असल्याचंही चिन्ह दिसत नव्हते. मी सकाळी बागेत पाणी घालताना जेवढी कुंदा, गुलाबाला फुलं असायची तेवढीच दुसऱ्या दिवशीही असायची. घरातील भिंती आणि आरशाला कुठंही वाटेल तशा टिकल्या चिटकवलेल्या दिसत नव्हत्या. तसा माझा वावर बाहेरच्या व्हरांड्यात आणि त्याला लागून असलेल्या जिन्याने वरच्या खोलीत जाण्याइतकाच होता. पण कुठंही तरुण मुलींच्या असतात तशा उंच टाचेच्या चपला, सँडल, व्हरांड्यात नव्हत्या. (तशी मला आधी मुलींच्या चपलांकडे पाहून मगच त्यांच्याशी बोलायची सवय आहे हं !) मला सगळं पाहून जान्हवीच्या वडीलांविषयी संशय येऊ लागला. या म्हाताऱ्याची मुलगी कॅफेहाऊस मधली ती नसावी,किंवा या म्हाताऱ्याला मुलगीच नसावी. किंवा घरात येणाऱ्या भावी जावयाची परीक्षा खुल्या वातावरणात होण्यासाठी त्याने तिला दुसऱ्या नातेवाईकाकडे पाठवून दिली असावी. परीक्षा नाही तर काय ? बहुधा स्वःताच्या मुलीला लग्नानंतर फारस काम कराव लागू नये म्हणून हा म्हातारा मला ट्रेनिंग देत असावा किंवा त्याच्या त्या सुंदर मुलीला कामच करता येत नसल्याने तो माझी सत्वपरीक्षा पहात आसावा. काही म्हणा पण आता तर महिना होत आला. मी रोज त्या बंगल्यात जात येत होतो पण कधीही, कोणतीही मुलगी तेथे रहात असल्याचं चिन्ह मला दिसेना. कॉलेजची परीक्षाही जवळ येत चालली होती. या दिवसभराच्या कामाने माझा अभ्यासही होत नव्हता. शेवटी माझा धीर खचला." अन एका संध्याकाळी मी उद्यापासून येऊ शकणार नाही. क्षमस्व "असे एका कागदावर लिहून तो कागद मी एका टेबलावरच्या पुस्तकात दुसऱ्या दिवशी जान्हवीच्या बाबांना दिसेल अशा तऱ्हेने ठेवला आणि "त्या" घराला कायमचा रामराम ठोकला. त्यानंतर तीन-चार दिवसांनी एक पत्र आले. मी उघडून वाचू लागलो.

'चि.सागर यांस, अनेक आशीर्वाद.

मला वाटलच तू थोड्या दिवसात कंटाळशील आणि माझ्याकडे पुन्हा न येण्याविषयी ठरवशील. तेव्हा तुला खरं सांगायला हरकत नाही.

` मला तरुण मुलगीच काय-सध्या कोणीही नाही. माझी पत्नी काही दिवसांपूर्वीच वारली. आणि आम्हाला मूलबाळ नाहीय, मला म्हाताऱ्याला बंगला खायला उठतो. माझ्या समवयस्क मित्रांमध्ये त्याच त्या म्हणजे दुखण्या-खुपण्याच्या हल्लीच्या नवीन पिढीला नाव ठेवणाऱ्या गोष्टी ऐकून मला कंटाळा यायचा म्हणून मी कॉलेजच्या कॉर्नरवरील कॅफेहाऊस मध्ये कॉलेज कॅम्पसमध्ये येऊ लागलो अन ते मला फारच आवडू लागलं. रंगीबेरंगी कपडे घालणारी नवनवीन फॅशन्स करणारी तुम्ही मुलं मुली म्हणजे काय सळसळतं जीवन असतं नाही ? नकळत माझं मन ताजं प्रफुल्लित राहू लागले. अन एक दिवस तुमच्या कॉलेजचे गॅदरिंग आटोपल्यावर तू तुझ्या मित्रांसह कॉफी प्यायला आलास, तुझ्या टेबलमागील खुर्चीवर मी बसलो होतो. तुमच्या गप्पांमधून तुला सर्वात जास्त बक्षीस मिळालीत,- - इथ कॉलेजजवळच तू रुम घेऊन रहातोस ते कळल. सहज तुझ्यामागोमाग आलो. तुझी रुम असलेल्या कंपाऊडच्या भिंतीवर प्लॉट नं. आणि तुझ्या कॉलनीच नाव होत. ते मी लिहून घेतलं. अन् गंमत म्हणून मी तुला पहिलं पत्र टाकल. अन तू त्याला प्रतिसादही दिलास आणि माझ्याकडे जवळजवळ महिनाभर माझं कामही करु लागलास त्याबद्दल धन्यवाद. अरे हो ! ते कॅफेहाऊस मध्ये एका मुलीने तुझ्याकडे पाहणं वगैरे सगळा योगायोग होता. अरे तुम्ही गोंधळच इतका करत होता की सगळे लोकच अगदी रस्त्यावरचे सुद्धा तुमच्याकडे पहात होते. आणि गॅदरींग मध्ये खूप बक्षीसं मिळवल्यावर असं आपल्यला वाटतंच की सगळेजण आणि सगळ्याजणी आपल्याकडे कौतुकाने, हेव्याने आणि जळफळाटाने पहातात कसं काय आहे माझं मानसशास्त्र ? तर्कशास्त्र ? अं?

तुझा,

एव्हरग्रीन मित्र

बापरे! म्हणजे मी महिनाभर फुकट श्रम केले होते. काय काय स्वप्नं रंगविली होती. अन आत्ता ? अहो या माणसाने महिनाभर माझ्याकडून काम करवून घेऊन फक्त आभार मानावेत म्हणजे काय? अस्सा राग आला अस्स वाटलं जाऊन चांगलं भांडून यावं त्या म्हाताऱ्याशी किंवा काहीतरी करुन चांगली अद्दल घडवावी म्हणे गंमत केली.

पण नंतर मला त्याच्या बुद्धीचं, धाडसाचं, तरुण मुलांच्या मानसिकतेकडे बघण्याचं खूप कौतुक वाटले. त्यामुळे मी त्यांना माफ केलं. शिवाय मला त्यांच्या हाताखाली अकाऊंटींगचही ज्ञान मिळाल होतच. आणि ते ज्या सेवाभावी संस्थेसाठी काम करत होते तिला मी अप्रत्यक्ष सहाय्य केलं होतं म्हणजे मला थोडं पुण्यही मिळालं अन् माझ्या हातून म्हाताऱ्या व्यक्तीची थोडी सेवा झाली होती.माझा वेळ काही प्रमाणात का होईना सत्कारणी लागला होता...जाऊ द्या...

"सागर - ए सागर ऽ ऽ" दाराला लाथेने

लोटत शेखर माझ्याकडे आला. आणि मला मिठी मारुन म्हणाला "हे बघ सागर - मला- मला- जान्हवी नावाच्या मुलीच हे पत्र आलय ".. नि मी खुर्चीत कोसळलो.

मी असे 'आठवण पक्षी ' पाळत नाही.
आठवणींच्या निसरड्या झाडावर आपणहून कधीच चढत नाही.

अनिरुद्ध सकळकळे.
एम.ए. इंग्लिश (ज्यु)

## आठवण पक्षी....

"चिव चिव चिमणी, दाणा खा, पाणी पी, भुऽऽर उडून जा "
असं म्हणतानाही एक अनामिक ओढ.
एक आंतरिक इच्छा, चिमणी उडून जाऊ नये ही.
उदास दिवसाच्या शेवटी एक गूंग कथा,
आजीच्या कुशीत, मऊ दुलईत ऐकलेली,
त्या दिवसाचं सोनं करुन गेलेली.
आठवण अशीच असते...
भुऽऽरकन उडणारी,
कावळ्याच्या शेणाच्या घराशी राहणारी,
चिमणीच्या मेणाच्या दाराशी रडणारी.
गोष्टीतला कावळा म्हणे...रांजणातल
पाणी पिण्यासाठी त्यात खडे टाकत होता,
चूक आहे ते, तो वर झाडावर बसून रडत होता,
डोळ्यातल्या थेंबानी रांजण भरत होता,
रोज एक चिमणी खिडकीच्या गजावर येते,
दुपारच्या उन्हात सावलीचा गारवा शोधते,
चिव चिव करुन पाणी मागते, दाणा मागते,
ओंजळभर पाणी अन् चोचभर दाणा टिपते,
शेजारच्या झाडावर मग झोपायला जाते.
आठवण अशीच असते...
रांजणभर रडणारी,
खिडकीतून डोकावणारी, ओंजळभर रडवून
चोचभर टोचणारी, शेजारच्या झाडावर राहणारी,
म्हणूनच...

## विनोद

दोन गप्पिष्ट मुले बसलेली असतात त्यातला पहिला दुसऱ्याला म्हणतो-तुला माहित आहे काय ? माझ्या आजोबांचे घर या आकाशाएवढे आहे.
हे तर काहीच नाही माझ्या आजोबांजवळ खूप मोठ मोठ्या काठ्या आहेत. इतक्या मोठ्या की त्या आभाळाला टेकतात.
कुठे आहेत त्या काठ्या, मला पण दाखवनां.
असे तू पाहिल्या नाहीत का त्या तुझ्याच आजोबांच्या घरात ठेवल्या आहेत.

एकदा प्रदीप दुःखी होऊन बसलेला होता. तेवढ्यात त्याचा मित्र संदीप तेथे येऊन त्याला म्हणाला-
काय रे! असा निराश होऊन का बसला आहे ?
काय सांगू, अरे शीलानं माझ्याशी लग्न करायला स्पष्ट नकार दिला
मग तू तुझ्या काकांच्या इस्टेटीबद्दल का सांगत नाही तिला. तेच तर सांगितलं म्हणूनच मला सोडून माझ्या काकाशी लग्न तयार झाली.

कु.श्रद्धा युवराज साळुंके
एफ. वाय. बी.ए.

# जाहिरातीचे युग

कु. मानसी मोहन राजे
११ वी कला.

परवाच माझा लहान भाऊ शेजारच्या आपल्या मित्राला कावळ्या - बगळ्याची गोष्ट सांगत होता ती अशी - एकदा कावळा बगळ्याला विचारतो,"काय रे बगळेदादा तू एवढा पांढराशुभ्र कसा? मला माझ्या काळ्या रंगाचा फार कंटाळा आलाय सांग तरी जरा तुझ्या शुभ्रतेच गुपित. " त्यावर बगळा म्हणतो, " सुपर रिन की चमकार.........सुपर रिन ! सुपर रिन! सुपर रिन!" ही गोष्ट ऐकून मी पोट धरुन हसले.माझी खात्री आहे माझ्या बुद्धीवान (!) बंधुराजाने टी.व्ही वरच्या जाहिराती पाहून इसापनीती बदलली!

अहो इसापनीतीच काय पण माणसाची नीती सुद्धा या जाहिरातीनी बिघडली नाही तर नवल ! सकाळी वर्तमानपत्र उघडल की वाचनीय मजकुरापेक्षा जाहिरातीच अधिक असतात. त्या जाहिरातीच्या गर्दीतून अपल्याला हवा तो मजकूर वाचणं म्हणजे कचऱ्याच्या ढिगातून सुई शोधण्यासारखे असतं !

तोच प्रकार आकाशवाणी आणि दूरदर्शनचा! आकाशवाणीवर दोन गाण्यांच्या मधे कमीत कमी पाच ते सहा जाहिराती असतात. त्यामुळे अर्ध्या तासाच्या गीतबहार कार्यक्रमात फक्त चार गाणी आणि किमान पंचवीस तीस जाहिराती आपल्याला ऐकायला मिळतात. दूरदर्शनवर तर जाहिरातबाजीचा बाजारच मांडलाय! कोणत्याही कार्यक्रमापूर्वी सर्वसाधारण जाहिराती तर असतातच शिवाय तो कार्यक्रम ज्या कोणत्या कंपनीने प्रायोजित केला असेल त्या कंपनीच्या उत्पादनांच्या

जाहिराती निराळ्या असतात.

आई बरोबर आम्ही किराणासामानाची यादी टाकायला गेलो की आम्हाला ज्या जाहिराती आवडलेल्या असतील तेच साबण किंवा टूथपेस्ट तेल,आम्ही आईला घ्यायला लावतो. मग आई इतकी चिडते की विचारुच नका ! दुकानदार म्हणतो "बघा जाहिरातीनी आपलं काम चोख बजावल की नाही?" जाहिराती मध्ये प्रत्येक उत्पादक आपल्या उत्पादनाचे गुण तिखट मीठ लावून सांगत असतो. पण त्यात काही वेळा खूपच सुरेख विनोद होतात. अलिकडे दुरदर्शनवर एका टूथपेस्टची जाहिरात असते. दोन टूथब्रशवर दोन वेगवेगळ्या टूथपेस्ट लावलेल्या असतात. अनेक (?) तासांनतर एक ब्रशवरची पेस्ट सुकते व दुसऱ्या ब्रशवरची पेस्ट तशीच मऊ (क्रिमी) राहते असे उत्पादकाचे म्हणणे आहे. पण मला एक कळत नाही की ब्रशला पेस्ट लावून अशी अनेक तास ठेवायची गरज पडते का ? आपण सकाळी दात घासण्यासाठी आदल्या रात्रीपासून ब्रशवर पेस्ट लावून ठेवतो का ? म्हणजे जाहिरात तयार करायला सुद्धा बुद्धी लागते.

सध्याच्या युगात उद्योजकांमध्ये प्रचंड स्पर्धा आहे त्या स्पर्धेत वरच्या क्रमांकावर टिकून रहायच तर आपल्या उत्पादनाची जाहिरात करणं अत्यंत आवश्यक आहे. ह्या जाहिरातीवर प्रचंड खर्च केला जातो. आपणही एखाद्यां जाहिरातीच्या आहारी जावून ती वस्तू खरेदी

करतो. पण आपल्याला हे समजत नाही की तो उत्पादक जाहिरातीसाठी केलेला खर्च आपल्याकडूनच वसूल करीत असतो. - वस्तूची किंमत वाढवून ! आजकाल कोणत्या वस्तूच्या जाहिराती आपण दूरदर्शनवर पहातो.

सध्याच्या युगाला जाहिरातीचं युग म्हटल तर ते मुळीच चुकीचं ठरु नये. कारण सध्या अनेक जाहिरात कंपन्या वेगाने वाढत आहेत. इतकेच नव्हे तर जे.जे.स्कूल ऑफ आर्टस सारख्या मान्यवर संस्थेत जाहिरात कलेला मान्यता मिळालेली आहे.

पण एक मात्र नक्की विचार करण्या सारखी गोष्ट आहे की ह्या जाहिरातींच्या बाजारात नवीन उद्योजकांचा आणि गरिब सर्वसामान्य गिऱ्हाईकाचा निभाव लागणे कठीण आहे !

## आठवण

आठवणी तुझ्या त्या
क्षणिक सुख देतात.
कमळांच्या पाकळ्यांवर
जसे दवबिंदू ओसरतात.
प्रतिमा तुझी जेव्हा
डोळ्यासमोर येते
दुःखाचा डोंगर
ती उभारुनी जाते
होते नंतर तळमळ
तू दिलेल्या धोक्याची
डोळ्यातील आसवांनाही
लाज वाटली त्या क्षणाची.

**किशोर वा, बडगुजर**
एफ.वाय.बी.ए.

## "बंद करा ही हुंडा प्रथा"

आहे एक अशी हुंड्याची प्रथा
ज्याने बिघडते समाज, देश व्यवस्था
जळूनि भस्म होतात निरपराध स्त्रिया
हीच प्रथा चालू आहे पिढ्यानं पिढ्या
होईल का बंद ही, जीवघेणी प्रथा
स्त्रीचं स्त्रीची झाली वैरीण आता
अगणित आहेत त्याच्या व्यथा
धरुन हातास
छळ मांडिला सर्रास
केला बहाणा खोटाच जगास
स्टोव्ह फुटून वहिनी झाली खलास
अशा आपण ऐकतो, वाचतो नेहमीच कथा
मग काय व्हावा शेवट या कथेचा ?
नियतीने रचिला का डाव करणीचा ?
होय,जैसे होते पेटविले वहिनीस,
तसेच घडले तिच्या कन्येस
तिलाही सासरी मिळाला गळफास
टाकला नियतीने असा निःश्वास
परिणामी आणखी घडणार काय ती कथा ?
वहिनी गेली, नणंदही गेली
चालली होती प्रेतांची गाडी
अनर्थ ओढवतो याच प्रथेने
बंद करायची ही प्रथाच
विचार करा जरा साऱ्यांनी
हुंडा घेता देता त्या सर्वांनी
मीच ओरडलो,"बंद करा ही हुंडा प्रथा"

**संजय रामदास बडगुजर**
एस.वाय.बी.ए

# "व्यावसायिक समायोजन"

**कु.सुहास चं.चतुर**
एम.ए.द्वितीय (मानस)

व्यक्तिच्या जीवनातील बरीच वर्ष व्यवसायात जात असतात. व्यक्तिच्या व्यवसायावर व्यक्तिचा समाजिक दर्जा अवलंबून असतो. व्यवसायातील यशावर व्यक्तिच्या जीवनातीन आनंद अवलंबून असतो. अशा तऱ्हेने व्यक्तिच्या आयुष्यात व्यवसायाला बरेच महत्व असते. प्रस्तुत लेखात व्यवसायची निवड, व्यवसाय कसा निवडावा व व्यवसायिक मार्गदर्शनाची पद्धती इ. विषयी विचार केला आहे.

व्यवसाय निवड:-

व्यक्ती आपल्या आवडत्या व्यवसायाची निवड करु शकते पूर्वीच्या काळी व्यक्तीला आपल्या जाती प्रमाणे अगर घराण्याच्या परंपरेप्रमाणे व्यवसाय करावा लागत असे. परंतु आजकाल व्यवसाय जातीवर किंवा घराण्याच्या परंपरेवर अवलबून नसतो. सर्व व्यक्तीना सर्व व्यवसायांचे शिक्षण घेण्यची समान संधी देण्यात येते. प्रत्येक व्यक्तिने आपल्याला योग्य वाटेल तो व्यवसाय निवडावयचा असतो. व्यक्ती स्त्री आहे की पुरुष आहे यावरही व्यक्तिने कोणता वयवसाय करावयाचा हे अवलंबून नसते. आजकाल स्त्रियांना व पुरुषांना समान हक्क असल्यामुळे पूर्वी केवळ पुरुषांसाठी म्हणून समजले जाणारे व्यवसाय सुद्धा आता स्त्रिया निवडू शकतात.

आजकालच्या तरुण-तरुणींना विविध व्यवसायामधून एका व्यवसायाची निवड करावयाची असते. तरुण-तरुणींना अनेक व्यवसाय निवडता येण्यासारखे असल्यामुळे कोणता व्यवसाय निवडावा असा त्यांच्यापुढे प्रश्न उभा रहतो. त्यांना स्वतः क्षमतांबद्दल किंवा निरनिराळ्या व्यवसायांच्या आवश्यकतांबद्दल माहिती नसते. व्यवसायांच्या निवडी प्रमाणेच निवडलेल्या व्यवसायाशी समायोजन करणे हा व्यक्तिंपुढे प्रश्न असतो. म्हणून आपण व्यवसाय कसा निवडावा याचा विचार करत आहोत.

व्यवसाय कसा निवडावा:-

व्यवसायाची निवड हा तरुण-तरुणीं पुढील महत्वाचा प्रश्न आहे पुष्कळदा ही मंडळी आपल्या मित्र-मैत्रिणींचे अनुकरण करुन व्यवसाय निवडतात. काही जण आपल्या भविष्यात कोणता व्यवसाय आहे हे एखाद्या ज्योतिष्याला विचारुन तो सांगेल त्या प्रमाणे किंवा देवाला कौल लावून व्यवसाय निवडतात. परंतु व्यवसाय निवडीच्या या सर्व पद्धती चुकीच्या आहेत. प्रत्येक व्यक्तिच्या क्षमता.कल.आवड यांना अनुरुप व्यवसाय निवडला पाहीजे. मित्र मैत्रिणींच्या क्षमता व आपल्या क्षमता सारख्या नसतात. प्रत्येक व्यक्ति भिन्न असते पुष्कळदा आई-वडील आपल्या आवडीचा व्यवसाय मुलांवर लादतात. परंतु मुलांमध्ये त्या व्यवसायाला आवश्यक गुणधर्म नसल्याने मुले त्या व्यवसायात अयशस्वी होतात.

व्यवसाबाची निवड करतांना स्वतःला योग्य असा व्यवसाय निवडावा लागतो. प्लेटो या मानसशास्त्रज्ञाने म्हटले आहे की कोणत्याही दोन व्यक्ति सरख्या नसतात. प्रत्येकाला योग्य असा

व्यवसाय दिला पाहीजे. प्रत्येक व्यवसायासाठी भिन्न बौद्धिक पात्तळी, कल, कौशल्य, स्वभाव इत्यादीची आवश्यकता असते. ज्या व्यक्तिच्या ठिकाणी विशिष्ट व्यवसायाला अनुकूल गुणधर्म असतील व ज्या व्यवसायाबद्दल अभिरुची असेल ती व्यक्ति त्या व्यवसयाला अधिक योग्य होईल. याउलट जर व्यक्तिमध्ये व्यवसायाला आवश्यक असे गुणधर्म नसतील तर व्यवसायात अनेक अडचणी निर्माण होतात. व त्या व्यक्तिला व्यवसायात पैसा मिळाला तरी मानसिक समाधान मिळणार नाही. एकंदरीत व्यवसायाची निवड हा आयुष्यातील फार महत्वाचा प्रश्न आहे. व्यवसायाशी विषम समायोजन झाले तर पूर्ण जीवनाचे विषम समायोजन होते. अशा परिस्थितीत जर तरुण-तरुणींना मार्गदर्शन मिळाले नाही तर त्यांना व्यवसायाची योग्य निवड करताना अपयश येईल.

व्यावसायिक मार्गदर्शनाची पद्धती:-

आजकाल मानसशास्त्राच्या प्रगतीमुळे मार्गदर्शनाचे काम यशस्वी होत्त चालले आहे. विशेषतः औद्योगिकमानसशास्त्र, अपसामान्य मानसशास्त्र व मानसशास्त्रीय चाचण्या यांच्या विकासामुळे मार्गदर्शनाचे कार्य यशस्वी होत चालले आहे. ठिकठिकाणी व्यावसायिक मार्गदर्शन व सल्ला देणारी केंद्रे स्थापन केली जात आहेत. ह्यामुळे पद्धतशीर व शास्त्रीय रीतीने मार्गदर्शन मिळण्याची सोय झालेली आहे.मार्गदर्शनाच्य पायऱ्या खालील प्रमाणे आहेत.

१) व्यक्तिबद्दल सर्वसाधारण माहिती प्राप्त करणे :-

व्यक्तिची शालेय प्रगती, तब्येत ,तिच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती, मातीपित्याच्या आकांक्षा, व्यक्तिच्या क्षमतांबद्दूल व व्यक्तित्वाबद्दल अधिक विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठी व्यक्तिला मानसशास्त्रीय परीक्षा दिल्या जातात. व्यवसायाची निवड व्यक्तिच्या क्षमता,अभिरुची व कल यांना अनुरुप असणे आवश्यक आसल्यमुळे व्यक्तिचे शारीरिक व मानसिक गुणधर्म माहीत असणे आवश्यक आसते. यासाठी मानसशास्त्रात अनेक प्रमाणीत चाचण्या उपलब्ध आहेत. या चाचण्या सोडवून व्यक्तिचा कल किंवा विशेष योग्यता जाणून घेतली जाते.

२) व्यक्तिला सल्ला देणे :-

व्यक्तिची मानसाशास्त्रीय परीक्षा केल्यानंतर तो कोणत्या व्यवसायात प्रगती करु शकेल हे मार्गदर्शक सांगतो. या पद्धतीमुळे व्यक्तिपुढील निवडीचे क्षेत्र सीमित होते व निवड करण्याचे काम सोपे होते.

३)व्यवसाया बद्दल माहिती देणे.;-

मार्गदर्शकाने सुचविलेल्या व्यवसायामधून एक व्यवसाय तरुणाने निवडला की पुढचे काम म्हणजे त्या व्यवसायासंबंधी त्याला माहिती सांगणे. काही व्यवसायासाठी प्रथम चाचण्या घ्याव्या लागतात. विशेष प्रकारचे प्रशिक्षण घ्यावे लागत. अशा प्रकारची सगळी माहिती मार्गदर्शक सांगत असतो.

अशा तऱ्हेने जर वरील मुद्द्यांचा विचार करुन.प्रत्येकाने आपली आवड व आपली क्षमता विचारात घेऊन त्या प्रमाणे व्यवसाय निवडला तर ते निश्चितच व्यवसायात यशस्वी होतील. पर्यायाने देशाच्या आर्थिक विकासास हातभार लावतील यात शंका नाही.

## मला हवे !

अशी इमारत नको मला
गरीबांच्या हाडांच्या भिंती असतील त्या
श्रमिकांच्या मासाचं प्लॅस्टर असेल ते ...
मला हवी मानवाच्या उत्साहाने बांधलेली
झोपडी.
तिच्यात खरोखर आनंद....
अशी गाडी नको मला...
जनतेच्या उकळलेल्या पैशाची असेल ती
पेट्रोल म्हणुन कामगारांच खत असेल ते
मला हवे स्वतःचे मजबूत पाय
खडतर रस्ता पार करण्यासाठी....
अशी अपेक्षा नको मला
दुसऱ्याच्या सुखात अंत होईल
आणि समाधान मिळेल मला...
मला हवे सुख दुसऱ्याचे ते माझे ...

चव्हाण व्ही. बी.
टी.वाय.बी.ए

## "क्षण विरहाचा!"

कुणासही न समजणारी
अशी तू कळी
कधी उमलेल तुझी
निरागस मनाची पाकळी ?
दुःखाच्या काट्यावर राहून
सुखद दिसणारी
एकाकी असूनही
इतरांना आनंद देणारी.
असाच एक 'अनामिक ' येवूनी
अलगद होता तुला नेणार
माळ्याच्या नजरेतून चोरुन
सुखी होता तुला ठेवणार.
माळीही जपणार किती दिवस ?
अश्रूंचे थेंब तो ही पित होता,
तुझ्या विरहतेच्या येत्या क्षणाने
अश्रूंचे थेंब तो जमा करित होता.

राकेश एस. शिरसाठे
एम.कॉम.(सिनी.)

## सुख

कोण चंद्र? कोण तारा?
भ्रम आहे हा सारा।
गरीब - श्रीमंतीच्या धारा
असे माणसांचा पसारा ।।
श्रीमंतीत असे जरी सुख मात्र
आत्म्यास असे दुःखाचे गोत्र।
गरीबीत जरी असे दुःख
पण आत्म्यास असते सुख।।
सोनियाच्या पिंजऱ्यात पक्षी नसे सुखी
तसाच श्रीमंतीत माणूस असतो सदैव दुःखी।
म्हणून श्रीमंतांचं मरण असतं आत्म्याच
तर गरीबांना ते शरीराचं ।।
चविष्ठ असे त्याला मीठ-भाकरी
खावूनी नशिबाच्या नेहमी ठोकरी।
'विजू' म्हणतो होवूनी पहा अंतर्मुखी
दिसेल नेहमी गरीबीत 'सुख' ।।

विजय पां. महाजन
(वाघोडकर)
एम.ए.(राज्यशास्त्र)

हायकू

१

पाहुनी सुंदर नयन
मोहुनी गेले मन
अंधार प्रेमाचा गहन

२

मनात धरूनी आस
पकडिले घुबडास
व्यर्थ मनीचा ध्यास

- महेंद्र धांडे (टी.वाय.बी.ए)

## आठवणी

क्षणोक्षणींच्या सहवासाच्या
गुंफीते मी आठवणी
जगता येते आपणास मग
भटकलो कुठे आडवळणी
माणूस येतो माणूस जातो
मागे उरती आठवणी
मेल्यावरही जगत असतो
ठेवूनी मागे आठवणी ।
धनदौलत क्षणिक सोबतीची
जीवनसोबती आठवणी
सगळे लुटले जरी आपुले
सोबत करिती आठवणी ।
शरीर मानवाचे असते नश्वर
अमर तरी त्या आठवणी
म्हणोनी क्रांती करिती त्यांच्या
जागृत राहती आठवणी

खडके उज्वला इ.
टी.वाय.बीएस्सी.

# एक आठवण

बनभेरु प्रेमचंद सुगनचंद,
एम.ए.ज्युनि.(मराठी)

शांत बहरलेली रात्र। किती रूपे असतील या रात्रीची? कोणी आपल्यावर कर्ज झालेले आहे म्हणून रात्र रात्र कामात सदैव जागरणात घालवित असेल, कोणी रात्र रात्र रिक्षा चालवित असेल, भिकारी भीक मागून मागून रस्त्याच्या कडेला आपल्या निरर्थक जीवनाची उशी बनवुन झोपले असतील, कोणी जीवनाची साथ सोडून मृत्यु पावला असेल म्हणून त्याच्या देहाजवळ रडत असेल तर कोणी आपल्या प्रियकराच्या बाहुपाशात अडकून प्रेमरंगात विलीन झाले असतील. पण...पण... मी मात्र तळमळत होतो, कंठीत होतो... तो तिच्या आठवणींनी। किती?... किती दिवसांनी ती आज मला भेटली होती? ती भेटल्याचे सारे चित्र माझ्या डोळ्यासमोर फिरू लागले.

सगळ्यात विशेष म्हणजे स्वतःहून माझ्याशी बोलली सुध्दा होती. ज्या वेळेस ती माझ्याशी बोलायला आली, त्यावेळेस काय स्थिती झाली असेल माझी, नाही का? शांत बहरलेल्या रात्री भिंतीवर टांगलेले कॅलेंडर ज्याप्रमाणे हवेच्या झुळूकेने फडफडते, अगदी त्याचप्रमाणे माझे ह्रदय धडधडत होते। ज्यावेळेस ती माझ्याजवळ आली त्यावेळी मी तर एकदम स्तब्धच झालो। एका क्षणासाठी हालचाल करणारे सर्वजग एकदम थांबल्यासारखे भासत होते. हळूवारपणे माझ्याजवळ येत तिने त्या शांततेचा भंग केला,"प्रशांत" ।... नकळत माझ्या ही तोंडून शब्द बाहेर पडले,"प्राजक्ता"। "अं हं । प्राजक्ता नाही फक्त साहेब। तू मला नेहमी 'साहेब' म्हणून बोलवायचा ना, मग आज अचानक प्राजक्ता का म्हणून? " ती उद्गारली.

हो, ज्यावेळेस आम्ही दोघे बरोबर असत, त्यावेळेस मी तिला साहेब म्हणूनच बोलवत असे। मला हे ही कळत नव्हते की, आंम्हादोघांमध्ये कोणते नाते आहे? बस,'माणूसकीच्या जोड असलेल्या भावनेच्या' जगात आम्ही दोघे हिंडत होतो. आणि आज अचानक आमची भेट झाली होती. दुपारच्या भेटीचे चित्रण एकसारखे असे माझ्या डोळ्यासमोर चालूच होते. आज अचानक आमची भेट म्हणजे मला हे सर्व दैवीयोगासारखेच वाटत होते ! किती?.. किती नाजूक होती ती ? तिचे बोलणे हळुवार निर्मळ, प्रांजळ होते . कुठल्याही प्रकारचा खोटेपणा तिच्या बोलण्यात नव्हता. तच्या प्रत्येक शब्दात विश्वास होता. जशी ती प्रांजळ. निर्मळ होती, तशीच ती प्रीतीमय सुध्दा होती, स्वच्छंदी होती ! अजुन आठवतं आहे मला ती, आंम्हा दोघांमध्ये जेव्हा भांडण व्हायचं तेव्हा ती एकदम हसमुसल्यासारखी होऊन चेहऱ्यावर फक्त माफीचे भाव प्रगट करी आणि चेहरातर कोमेजून गेलेल्या परिजातकाच्या फुलासारखा होई.

पारिजातकाच्या फुलांचा वास किती छान असतो ! त्याचा रंग ही किती सुंदर असतो ! वर पांढरा तर खालच्या बाजुला त्यच्या जीवनाचा आधार म्हणून अबोली सदैव उभच आहे. पण, परिजातकाचे फुल कितीही सुंदर असले तरी, ते खुप नाजुक मात्र असते आपण त्याचा वास होण्याचा प्रयत्न करीत असतो. पण, नुसत्या तळहाताच्या उष्णतेने ती फुले

कोमेजून जात असतात. अगदी तशीच होती 'प्राजक्ता'. म्हणूनच की काय तिचे नाव 'प्राजक्ता ' होते.

तिच्या स्वभावाच्या बाबतीत म्हटले तर ती एकुण खुप चांगली होती. परंतु, एकदा का तिला राग आला म्हणजे कहि केल्या तचा राग कमी होईना, आठ आठ दिवस आम्ही दोघं बोलत नसत. राग म्हणजे कसा तिच्य नाकाच्या शेंड्यावर कायम असायचा ज्या प्रमाणे चंद्र ईतका शुभ्र असुन त्यात काळे डाग आहेत, तरी सुध्दा तो ईतका सुंदर दिसतो. तसेच लिंब ईतका कडू आहे तरी अनेक रोग दुर करण्याची त्या मध्ये शक्ती आहे .त्याच प्रमाणे चंदन ईतके सुवासिक आहे पण त्याच्या झाडावर ही विषारी सर्पवास्तव्य करी असतात. जर चंद्रला डाग नसते, लिंब कडू नसता आणि चंदनाच्या झाडावर सर्प नसते तर किती चांगले झाले असते अगदी त्याच प्रमाणे ही प्रजक्ता किती चांगली होती, सुशील होती पण, एकदा तिला राग आला की ती कोणाचं ऐकत नसे.

जशी ती माझ्यापासून शिक्षणासाठी ग.च्क. करण्यासाठी दूर गेली तशी बरोबर दोन वर्षांनी आज आमची भेट होत होती. मला वाटत होते की, ती मला विसरली असेल पण मी मात्र तिला रोज आठवत होतो हे मिने माझ्याजवळ स्वतःहुन कबुल ही केले होते तिच्य बोलण्यात काहीतरी मार्मिकता होती. मला सुध्दा तिचा रोज आठवण येत होती. म्हणून मीही तात्काळ कबुल केले. एवढेच नव्हे तर तात्काळ कबुल करुन सिध्द ही करुन मी दाखविले होते.

मी म्हणालो होतो," अहो साहेब ! बघा , आपण रोज दोघे बरोबर याच रस्त्याने कॉलेजला जायचो आणि यायचो ! हेच ते शहर, हीच ती वस्ती, तिचझाडे फक्त चहरो बदलले, वेळ बदलली, काळ बदलला पण, परिस्थीती अजून तशीच आहे. फरक आहे तो एवढाच कीं रोज आपण बरोबर असायचे आंणि आता मात्र मी एकटाच ! हो फक्त एकटाच असतो मी ! कोणीच नसतं माझ्याबरोबर. हे शहर, ही वस्ती, ही निसर्ग, हे रस्ते आता कसे निर्जीव वाटतात, लांब लांब वाटतात. आणि एक सारखं मल वाटत असतं की, ह्या सर्व गोष्टी माझ्याकडे पहात असून मला हसत असाव्यात आणि मला विचारीत असाव्यात की, 'काय, अहो महाशय! आपण आजही रोजच्या सारखेच एकटे ? आजही 'साहेब' नाही तुमच्या बरोबर ! पण...पण मी निरुत्तर असतो आणि मुकाट्याने आरला मार्ग काढीतच असतो. त्याच वेळी रस्त्याने एका पानबिडीच्या दुकानावर शांत वातावरणात, सुंदर गुलाबी थंडीत यशुदासने गाईलेले गाणे टेपरेकार्डवर चालू असते, 'तू..ईस तरह से मेरी जिंदगी में शामिल हो.' तेव्हा तुम्हीच सांगा अशा परिस्थीतीत तिची व माझी भेट म्हणजे दैवीयोग नव्हे तर काय म्हणावे याला ?'

हे सर्व आठवतांना जे कोडं मला पडलं पोतं ते कोडं मला कधीही उलगडलेलं नाही की, की.. आमचं नातं काय होत ? काय संबंध होता आम्हा दोघांमध्ये ! या समाजाने, या जगाने आम्हाला काय म्हणून संबोधले असेल ! पण मला त्याची चिंता नाही की फिकर नाही आणि कधी गरज ही भासली नाही. पण... पण खरच काय नातं असेल आम्हा दोघांमध्ये प्रेमाचं - मैत्रीचं की...माणुसकीचं ! देव जाणे !! पण, पण मित्रांनो मी तर या ऋणानुबंधाचा संबध फक्त ऱ्हृदयाशी ऱ्हृदयाचा, मनाशी मनाचा अणि मानवाशी- मानवाचा संबध म्हणूनच समजतो. कारण कुठल्याही प्रकारची खोटी साक्ष यात नसते, रायरंगीपणा नसतो.

पण एक मात्र येथे खरे मानावे लागेल की जगाने, लोकांनी या संबंधाला या जगाला की ज्या मध्ये आम्ही दोघं एका प्रांजळ मनाने रहात होतो त्य जगाला 'वेड्यांची दुनिया ' म्हटले आहे. पण, मला माझ्या वेड्यांची दुनियाच आवडते ! अगदी मनापासून आवडते !! ऱ्हृदयापासून आवडते !!!

## समस्यापूर्ती

१) भोजसभायां कलिदसद्वेष्टा एकः पण्डितः अभवत्। सः पण्डितः "कुंतीसुतो रावणकुंभकर्णो " अस्याः समस्यायाः
पूरणाय कालिदासं अकथयत् ।

कालिदासेन अनेन प्रकारेण समस्यापूर्ती कृता।
का पांडूपत्नी गृहभूषणं किम् । को शमशत्रुः किं अगस्त्यजन्म।
कः सुर्यपुत्रो विपरीतपृच्छा। कुंतीसुतो रावणकुंभकर्णो।
चकितै पण्डितः नृपभोजः च।

२)एकस्मिन दिने कविकालिदासः कविबाणः भूपभोजः एते त्रयः
उद्याने वार्तालापं कुर्वन्ति श्म। तदा नृपस्य वामकरस्य समीपे
आसन्नः बाणभट्टः दक्षिणभुजस्य समीपे आसन्न कालिदासं अदिक्षितुं अवदत् "नामहस्तेः दक्षिणहस्तात् श्रेष्ठः अस्ति।"
तथा च -
गृण्हात्येष रिपोः शिरः प्रजविनं कर्षत्ससौ वाजिनम्।
धृत्वा चर्म धनुः प्रयाती सततं संग्रम भूमौ अपि।
द्युतं चौर्य इतिक्रियेच शपथं कुर्यात न वामः करः।
एतद श्रृत्वा प्रत्युत्पन्नः कालिदासः राजानं अकथयत
दानात उद्यमतां विलोक्य विधिना
शौचाधिकारी कृतः।
कालिदासस्य वचनं श्रृत्वा ऱ्हष्टचेता नृपः बाणभट्टेन सह लज्जीतः।

३) नृपभोजः प्रविशति परिषचि पृच्छाति सर्वान् पण्डितान् "गौरी मुखं चुंबति वासुदेवः" अस्याः समस्यायाः उत्तरम। कालिदासंन विना न कोऽपि कविः समर्थः भवेत्।

कालिदासः अवदत्-
क लोकमाता किमु देहमुख्यम।
श्ते किमादौ कुरुते मनुष्यः।
किं दैत्य हंता वदैव क्रमेण।
गोरी मुखं चुंबति वासुदेवः।

**सौ.अरुधती अजित कुळकर्णी**
एम.एम.संस्कृत(ज्यू)

## संस्कृतस्य अभावः

लौकीकसंस्कृतस्य सहित्यं अपि विश्वविचाराणाम् नीऽम अस्ति।

लौकीकसंस्कृतेः अलंकाराणी गणितम् संगितम् ज्योतिषम् आयुर्वेदः धर्मशास्त्रम प्रभूती विषयक ग्रन्थाः अनेके सन्ति।

अतः अस्मभ्यं साहित्ये महाकाव्यानि, नाजकानि गतीकव्यानि ऐतिहासकाव्यानि नीतिकाव्यानि आप्नुवान्ति। संस्कृते एतिवृत्तस्यचर्चा, राजनीतेः चर्चा मनोविज्ञानस्य चर्चा वनस्पतिशास्त्रस्य चर्चा, मानवीयशास्त्रस्य चर्चा, अर्थशास्त्रस्य चर्चा भषाविज्ञानस्य चर्चा, दर्शनशास्त्रस्यचर्चा, रसायनशास्त्रस्य चर्चा, प्रस्तराविज्ञानस्य चर्चा, खगोलशास्त्रस्य चर्चा, भूगर्भशास्त्रस्य चर्चा एवं समाजशास्त्रस्य चर्चा निरपिता भवती।अस्मात परम संस्कृते कृषिकलायाः औद्योगिककलायाः प्रतिपादनम भवति। तेन हेतुना संस्कृतभाषा अद्य विश्वस्य साहित्ये सर्वेपरि अस्ति। अस्मात परम संस्कृतसाहित्य ज्ञानस्य एवं विज्ञानस्य परमनिधीः अस्ति। इत्थम संस्कृतसाहित्यम भाषायाः एवं शैल्याः दृष्ट्या अत्यन्तं सुंनदरम् अस्ति। इथम भाषायाः सरसा सुमधुरा, मृदुला सरला,अस्ति। अतएव संस्कृतम व केंवलम भारतस्य, अपितू अखिलभूमिण्डस्य भाषा आस्ति।

**अनिता विश्वास पाटील**
एफ.वाय.बी.ए.

# आरती बारावी मातेची

**किशोर चुडामण कोल्हे.**
एस.वाय.बी.एस्सी.



कॅमेऱ्यापुढे हसायचं, या सवयी ने ते
श्रध्दांजली वहायला आलेत हेच विसरले!
मेधा इनामदार एम.ए.मानसशास्त्र

जय देवी जय देवी बारावी माता।
लवकर लवकर घरी जाऊ दे आता।।धृ।।
पेपर कोरा होता तरी न बोलवे काही।
बोललो तरी तो हाकलून देई।।
प्रतिउत्तर देता कंडक्टर येई।
तीन वर्षांची विश्रांती देऊन जाई।।१।।
जयदेवी.....

अभ्यास करतांना थकले तनमन।
कारण वर्षभर केली 'गनमन'।।
विचारलं कोणी तर कारण ट्युशन।
सिनेमाला जाण्याची युक्ती पण छान।।२।।
जयदेवी.....

माता-पितरांना होती फार आशा।
केली पण त्यांची पूर्ण निराशा।।
दाखविल्या त्यांना तळहाताच्या रेषा।
उलटल्या कुंडलीतील ग्रहांच्या दिशा।।३।।
जयदेवी.....

वर्षभर दिला इतरांना त्रास।
कुणी म्हणे मूर्ख किंवा बदमाष।।
ऑक्टोबरमध्ये मिळविन सुयश।
आश्चर्याचा धक्का बसेल सर्वांना।।४।।
जयदेवी.....



युवा काव्य मैफील



विज्ञान मंच उदघाटन,
श्री. कुपेरकर (शिक्षणाधिकारी जि.प.) समवेत प्राचार्य



२० ऑगष्ट सद्भावना पंधरवाडा
राष्ट्रीय एकात्मतेची शपत घेतांना
विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग

# अखिल भारतीय मानसशास्त्र परिषद
## ३१ वे अधिवेशन



उदघाटन डॉ. बी.ए. पारीख, कुलगुरु, दक्षिण गुजराथ विद्यापीठ सुरत डॉ. जी.डी. बेंडाळे, डॉ. एन. के. ठाकरे, कुलगुरु उ.म.वि. डॉ. सुलतान अख्तर, प्राचार्य डी.एस. नेमाडे, उपप्राचार्य ए.बी. पाटील, डॉ. एस.एस. राणे




स्वागताध्यक्ष डॉ. जी.डी. बेंडाळे स्वागत करताना



स्मरणिका प्रकाशन डॉ. उल्हास पाटील

# राष्ट्रीय सेवा योजना



व्यसनमुक्ती अभियान उद्‌घाटन हस्ते प्राचार्य



श्रम रोपवाटीका



हिवाळी शिबीर - वृक्षसंगोपन विद्यापीठ परिसर, बांभोरी

# एन.सी.सी.



एन.सी.सी.
विद्यार्थीनी



एन.सी.सी.
विद्यार्थी



श्री. ए. के. मिश्रा
(डायरेक्टर, एन.सी.सी. महाराष्ट्र)
समवेत प्राचार्य

# राष्ट्रीय एकात्मता

महेंद्र धांडे
तृतीय वर्ष कला (अर्थशास्त्र)

हमारे देश को स्वतंत्र हुअे आज सैंतालस (४७) साल हो गये । हमारा देश विविधता मे एकता का प्रतिक हैं। यहाँ विभिन्न धर्म, जातीयों, तथा विभिन्न वंश, रंग और भाषाओ के लोग रहते हैं, कि, सम्पूर्ण भारत अनेक प्रकार की संस्कृतीयोंका भांडार नजर आता है । यहॉके लोगों में सामाजिक, आर्थिक, धार्मिक तथा सांस्कृतिक दृष्टीसे से कोई समानता नहीं है । इसलिए जातिभेद, धर्मभेद, प्रांतभेद, वंशभेद आदि कारणोंसे राष्ट्रहित विरोधी घटनाएँ हमेशा घटती रहती हैं। कुछ स्वार्थी लोग जानबूझकर जाति, धर्म, वर्ण भाषा के माध्यम से समाज में अलगाव की भावना को भडका रहे हैं । इससे भी चिन्ताजनक बात तो यह हैं कि, कुछ लोग स्वतंत्र राष्ट्र की माँग कर रहे हैं। फिलहाल राष्ट्रीय एकात्मता की ज्वलंत समस्या हमारे देश के सामने उपस्थित हैं । ऐसे समय सभी भारतीयाके मनमें राष्ट्रीयत्व की भावना का निर्माण होना और उसका विकसित होना नितांत आवश्यक हैं ।

कश्मिर से लेकर कन्याकुमारी तक और कच्छ से लेकर कलकत्ता तक फैले हूअे इस विशाल राष्ट्र में राष्ट्रीयत्वकी भावना को विकसित करना आसान काम नही हैं। परंतु यह काम असंभव भी नही हैं । उसके लिए राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक और सांस्कृतिक आदि क्षेत्रों में प्रखर राष्ट्रीयता के भावों को जगाना होगा । राष्ट्रीयता के भाव से ही भावनात्मक ऐक्य का निर्माण हो सकता हैं । अतः आवश्यक है की शासन लोगों मे राष्ट्रीय एकात्मता के भाव जगाने के लिए राष्ट्रीय स्तर पर ठोस कार्यक्रम हाथ में ले ।

बचपन में होनेवाले संस्कार मनुष्य के जीवन पर गहरा प्रभाव डालते हैं, इसलीए 'राष्ट्रीय एकात्मता' को ध्यान में रखकर प्राथमिक शिक्षाके पाठ्यक्रम का गठन होना जाहिए। विद्यार्थीदशा में ही छात्रोंको राष्ट्रीय ऐक्य और सामाजिक जिम्मेदारी के प्रति कर्तव्य की शिक्षा देनी चाहीए यदी एसा हूआ तो नागरिकों में राष्ट्रीय एकात्मता की भावना के बीज छोटी उम्र में बोये जायेंगे, तभी एकात्म भारत का वृक्ष फल फूलकर बडा होगा इसमें कोई संदेह नहीं ।

भावनात्मक ऐक्य और राष्ट्रीय एकात्मता के लिए समाज में एकदूसरे के जाति, धर्म और भाषा को लेकर जो पूर्वग्रहदूषित वातावरण हैं, उसे नष्ट करने का प्रयास हर आदमी करे । सामाजिक संस्थाओमे काम करनेवाले लोगों को चाहीए कि, वे राष्ट्रीय एकात्मता के कार्य में योगदान दें । ऐसी संस्थाएँ जाति, धर्म के तत्व पर आधिष्ठीत नहीं होना चाहीए । राष्ट्रीय एकात्मता के लिए विभिन्न कार्यक्रम आयोजित करके लोगों के सामने रखने चाहिए । राष्ट्रीय एकात्मता की दृष्टीसे साहित्य का निर्माण करने के लिए साहित्यिकोंको सरकार

प्रोत्साहन दे । चित्रपट, प्रसार का सबसे अच्छा माध्यम है । इसलिए एकात्म भारत के विषय पर अच्छे चित्रपट तैयार करने के लिए चित्रपट निर्माताओं को भी सरकार सहाय्य और प्रोत्साहन दे । प्रसार और प्रचार के सारे माध्यमों के द्वारा लोगोंमें एकता की भावना निर्माण करनें के लिए विशेष रुप से सरकार प्रयत्न करें । जहाँ पर आधुनिक प्रसार के साधन उपलब्ध नहीं है, ऐसे गाँवो में मनोरंजनात्मक नाटकों, तथा पथनाट्यों के द्वारा जनजागृती का काम करना चाहीए । भारत में लगबघ सत्तर प्रतिशत लोग गाँवोमें रहते हैं । इसलिए गाँव के लोग जिन्हे समझ सके ऐसे ही कार्यक्रम का आयोजन किंया जाए । पूरे भारत में एकात्मता की भावना विकसित होने की दृष्टी से, जनता और शासन दोनों को मिलकर प्रयास करनें चाहींए । 'हमारा देश धर्मनिरपोक्षतावादी है ' ऐसा जब हम कहते है, तब इसका मतलब यह है कि, हम सब एक विशेष धर्म से जूडे हैं, और इस धर्म क नाम है 'मानव धर्म' । यदि विभिन्न धर्मों के अनुयायी एक - दुसरे की धार्मिक भावनाओं पर प्रहार नही करेंगे तो देश की एकात्मता को कोई खतरा उत्पन्न नहीं हो सकता । धर्मनिरपेक्षतावाद धार्मिक - द्वेश को नष्ट करनें में मदद करता हैं । सभी का धर्म ' मानवता' ही होना चाहिए । सभी को समान सामाजिक न्याय मिले । यह हमारा उद्दीष्ट होना चाहीए । पूरे विश्व में ऐसा एक भी राष्ट्र नहीं है जिसमें भारत के समान बडी मात्रा मे आर्थिक विषमता हैं । हमारे देश में करोडो लोग दारिद्र्य , रोग, बेकारी, निरक्षरता, और निराशावाद से ग्रस्त हैं । फिर भी हम कहते हैं की 'मानवी जीवन बहूत मूल्यवान हैं '। राष्ट्रीय एकात्मता के लिए केंद्र और राज्य में मतभेद नहीं होने चाहीए । कोई भी राज्य आज भारत में आर्थिक दृष्टी से स्वयंपूर्ण नही है । राज्यो - राज्यों में संघर्ष होते ही रहते हैं । मगर यह प्रदेशिक स्पर्धा राष्ट्रीय एकात्मता और राष्ट्रीय विकास को साध्य करनें में बाधक नहीं होना चाहीए ।

शिक्षा सिर्फ विविध विषयों की जानकारी प्राप्त करनेंका साधन न हकर मानवी प्रवृत्तियों को सही दिशा दिखने का चसाधन हैं । पाठ्यक्रम में अच्छी और संस्कारक्षम किताबे होना जाहिए । बूरी किताबे युवकोंके मन को दूषित करती हैं। शिक्षा का मुख्य उद्देश राष्ट्र में विविधता में से ऐक्य की भावना साकर करना ही होना चाहीए ।

भाषिक राज्यों की निर्मिती के कारण भाषावाद दूर होने चके बदले अधिक कटू और जटील हो गया हैं । अलग- अलग प्रांतोमें से अलग अलग भाषाएँ सामने आयी हैं । भाषा के संबंध में उपस्थित सवाल की तरफ देखने का हमारा दृष्टीकोन मूलतः राष्ट्रीय एकता से परिपूर्ण होना चाहीए । हिंन्दी भाषा को पूरे भारत के लोग आसानी से समझते हैं । इसलिए हिन्दी को भारत की राष्ट्र भाषा होने का गौरव प्रप्त हैं । भारत को स्वतंत्र हकर सैंतालिस साल होने के बद भी आंतरराज्यीय व्यवहारों में, न्यायालयोंमें, विद्यापीठोमें, यहाँ तक की सरकरी कार्यालयोंमें भी हिन्दी का उपयोग नहीं किया जा रहा हैं । अगर पूरे भारत में सरकारी कार्यालयों में हिन्दी भाषा का उपयोग सख्ती से अनिवार्य कर दिया, तो भारत में भाषिक ऐक्य वृद्धिंगत होने में देर नही लगेगी ।अन्यथा भाषावाद बढता ही जाएगा।

हमारे देश की सुरक्षा सिर्फ हमारे लष्करी सामर्थ्य पर ही निर्भर नहीं हैं । वह तो लोगों की सामाजिक सलग्नता, ऐक्य भावना, राष्ट्र के प्रति प्रेम, आदि बातोंपर भी निर्भर हैं। इसलिए अपनें मन और ह्रदयों को एक नये साँचे में ढालना चाहीए। अपने जीवन को पंगु बनानेवाली दृष्ट सामाचिक प्रवृत्तियोंका हम सब लोग मिलकर प्रतिकार करें । राष्ट्रीय एकात्मता और राष्ट्रभाषा को विकसित करनें के लिए विशाल अंतःकरण , महान आदर्श, और सद्सद्विवेकबुध्दि कि आवश्यकता हैं । यदि हम चाहते हैं कि हमारे देश का भविष्य उज्वल हो तो हमारे भीतर समन्वयातक दृष्टी और परपस्पर प्रेम के भाव हो।

हमारे ह्रदय में राष्ट्रीय एकात्मता और राष्ट्रभाषा के लिए अपना सर्वस्व अर्पित करने की भावना का निर्माण होना आवश्यक है । तभी हम कह सकते हैं -

" सारे जहाँसे अच्छा,
हिन्दोस्ताँ हमारा !"

## प्यार

प्यार बहौत बडी चीज है,
जितनी बाँटो उतनी बढती है!
लेकीन इतनी नाचीज है,
के किसीकोही नसीब होती है!

## एक बात

मेरे मरने के बाद, मुझको न जलाना यारो
पहले ही मै बहोत जल चुका हूँ
बस मेरी एक कबर बना देना
'ब' गटासाठी दिवाळीच्या सुटीत २३-१०-९४ ते २९-१०-९४ दरम्यान विज्ञान शिबीर आयोजित करण्यात आले होते. याही गटाचे उद्‌घाटन श्री. कुपरेकर साहेब शिक्षणाधिकारी जि. प.जळगांव यांच्या हस्तेकरण्यात आले. सदर विद्यार्थी(३०) व विद्यार्थीनींच्या राहण्याची सुविधा महाविद्यालयाच्या वसतिगृहात करण्यात आली होती.

या विद्यार्थ्यांसाठी वरील विषयावर व्याख्यान , शैक्षणिक उद्‌बोधक चित्रपट, भौतिक रसायन शास्त्रातील प्रयोग करणे, प्रश्नोत्तरे, व औद्योगिक वसाहतीतील भारत पेट्रोलियम, व्ही.आय. पी. या कारखान्यास भेट, असा भरगच्च कार्यक्रम घेण्यात येवून समारोप कार्यक्रम मा.प्राचार्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

प्रा.पी.डी.भोळे.
समन्वयक विज्ञान मंच

## युवती सभा ( कनिष्ठ महाविद्यालय )

१९९४-९५ या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालयात १२वी कला शाखातून विद्यार्थीनींनमध्ये प्रथम येणारी व युवती सभेच्या सर्व कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेणारी कु. सोनाली वराडे च्या हस्ते युवती सभेचे उद्‌घाटन करण्यात आले. तेव्हा युवती सभा व विद्यार्थीनी याबद्दल आपले मत व्यक्त केले.

कु.सुहासिनी साखरे नागपूर यांनी स्त्रीयांवर होणारे अत्याचार, अन्याय, पोलिसी मदत, स्वसंरक्षण, पाल्य व पालक संवाद याबद्दल विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात युवती सभेतर्फे मोफत भरतकाम व जरीवर्कचे वर्ग घेण्यात आले. ११वी कलाशाखेची विद्यार्थीनी कु.सुचिता असोदेकर व कु. शुक्रा कुलकर्णी यांनीही भरतकाम विद्यार्थीनींना शिकविले. सदरहू या वर्गाचा लाभ अनेक विद्यार्थीनींनी घेतला.तसेच युवती सभेतर्फे विद्यार्थी-विद्यार्थीनींनी " तरसोद " या गावी निसर्गरम्य वातावरणात सहभोजनाचा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

युवती सभा व अदिवासी विकास व कला प्रेसारक मंडळ आणि, जि. यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. तसेच " वैदिक काल व स्त्री जीवन" या विषयावर प्रा.आर.बी.चौधरी यांनी आपले विचार व्यक्त केले.वैदिक काल म्हणजे काय? स्त्री-पुरूष समानता, स्त्रियांचे उपनयन , स्त्रियांचे यज्ञ, शिक्षण, स्वयंवर, कालानुरूप स्त्रियांचा बदललेला दर्जा या विषयी सखोल व अभ्यासपूर्ण माहीती त्यावेळी दिली.

प्रा.सौ.ललीता वाणी
अध्यक्ष,
सदस्यः-
प्रा.सौ.लता पाटील
प्रा.सौ.उषा सावंत
प्रा.कु.करूणा सपकाळे

## विज्ञान मंडळ

या वर्षी विज्ञान मंडळ स्थापन झाले. विविध कार्यक्रमांचा आराखडा तयार करून सौ.डॉ. रजनी नारखेडे शल्यविशारद यांच्या शुभहस्ते विज्ञान मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले.महाराष्ट्रातील प्लेगची साथ आपल्या शहरात रोखण्यासाठी कोणते प्रतिबंधात्मक उपाय करावे याविषयी त्यांनी विस्तृत व सखोल माहीती दिली. अध्यक्षस्थानी प्रा.व्ही.ए. आसोदेकर होते.प्रास्ताविक प्रा.पी.एल.चौधरी यांनी केले.सूत्रसंचलनप्रा.पी.एल.चौधरी यांनी केले. आभार प्रदर्शनप्रा.पी.डी.भोळे यांनी केले.

तसेच"प्रश्नमंजूषा" हा कार्यक्रम घेण्यात आला. स्पर्धात्मक परीक्षांच्या प्रमाणे विद्यार्थ्यांचे ४गट करून प्रत्येक गटाला प्रश्न संच देवून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

त्याचप्रमाणे भौतिकशास्त्र विभागात विद्यार्थ्यांना उद्‌बोधनपर, शैक्षणिक चित्रपट दाखवण्यात आले. व नंतर विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. याशिवाय जळगांवच्या औद्योगिक वसाहतीत कारखान्यास भेट देवून वस्तू निर्मीतीची पध्दती कशी असते. याची माहीती करून देण्यात आली.

प्रा.पी.एल.चौधरी
चेअरमन विज्ञान मंडळ
प्रा.बी.यु.पाटील
प्रा.ए.पी.चौधरी
प्रा.आर.ए.चौधरी

## कला मंडळ

या शैक्षणिक वर्षातील मु.जे.कनिष्ठ महाविद्यालयातील कला मंडळाचे उद्‌घाटन कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.एम.एल.पाटील यांच्या अध्यक्षते खाली श्री. दादा नेवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

उद्‌घाटन प्रसंगी दादा नेवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, चित्रपट आणि दूरदर्शनमुळे विद्यार्थ्यांनमध्ये अभ्यास करण्या ची प्रवृत्ती राहीली नाही. मराठीमाणसाने मातृभाषेवर प्रभुत्व मिळवून नंतर दुसऱ्या भाषेलाही महत्व दिले पाहीजे. मातृभाषेत श्री. संत ज्ञानेश्वरांपासून ते पु.ल.देशपांडे यांच्यापर्यंत फार मोठा खजिना आहे. तसेच माणसाने आपली संस्कृती,देश,भाषा,इतिहास याचाही अभिमान बाळगणे आवश्यक आहे.

दि.१२ जाने.रोजी प्रा.शा.न.पाटील यांचे "आचार्य प्र.के.अत्रे यांचे विनोद" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

तसेच शहर वाहतूक नियंत्रण शाखा जळगांव यांनी "वाहतूक सप्ताहा निमीत्ताने" चित्रकला स्पर्धा आयोजीत केली होती. या स्पर्धेत उच्च माध्यमिक या गटातून अमर पाटील आणि कु.मनिषा शिंपी(११वी कला) यांना प्रथम पारीतोषिक मिळाले, तर कु.छाया वसंत जोशी, कु.स्वाती देशपांडे(११वी वाणिज्य) ,

कु.वर्षा पाटील(११वी कला) यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. इतकेच नव्हे तर या कार्यक्रमात आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाने चित्रकला स्पर्धेत उत्कृष्ट कार्य केल्यावद्दल मानचिन्ह आणि मानपत्र सुध्दा पटकावले.

सर्व सहकारी प्राध्यापकांचे मन:पुर्वक आभार-

कार्यकारिणी:- प्रा.प्रभाकर भ. चौधरी

१) प्रा.पी. एच.चौधरी अध्यक्ष

२) प्रा.एस.एम.रडे

३) प्रा.एस.एन.पाटील

४) प्रा.व्ही.व्ही.बिऱ्हाडे

## मानसशास्त्र विभाग

मानसशास्त्र विभागाव्दारा दर वर्षी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. या वर्षाचे वैशिष्ठ म्हणजे अखिल भारतीय स्तरावरील इंडीयन अॅकेडमी ऑफ अप्लाइड सायकॉलॉजीचे ३१ वे अधिवेशन दि.१९ते२१ डिसेंबर९४ दरम्यान यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले.सदर अधिवेशना साठी देश भरातून १०५ अभ्यासकांनीभाग घेतला. व आपापले शोध सादर केले.अधिवेशनाचे उद्घाटन डॉ.बी.ए.पारीख कुलगुरू दक्षिण गुजराथ विद्यापीठ सुरत यांच्या हस्ते करण्यात आले.अध्यक्ष स्थान डॉ.एन.के.ठाकरे कुलगुरू उ.म.वि. यांनी केले. डॉ. सुलतान अख्तर यांनी अॅकेडमीचे अध्यक्षीय भाषण केले.याअधिवेशनाच्या निमीत्ताने खालील मान्यवरांनी मानसशास्त्र विभागास भेट देवून प्रशंसोदगार काढले. स्मरणीकेचे प्रकाशन डॉ.उल्हास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

१) डॉ.डी.एम.पेस्तोनजी,आय.एम.एम.(अहमदाबाद)

२) डॉ.के.व्ही.कलीव्यापन,मद्रास

३) डॉ.हलील अहमद,दिल्ली

४) डॉ.प्रमोदकुमार,विद्यानगर

५) डॉ. रवि गुंठे,जोधपूर

सदरहू अधिवेशन आयोजनासाठी प्राचार्य डी.एस.नेमाडे, उपप्राचार्य ए.बी.पाटील, यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले. जळगांव व धुळे दानशूर व्यक्तींनी आर्थिक सहाय्य करून मोलाची मदत केली.डॉ.उल्हास पाटील, जळगांव यांनी भरीव आर्थिक मदत केली.

डॉ.एस.एस.राणे

मानसशास्त्र विभाग.

## विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतीगृह

सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात मुला-मुलींच्या वसतीगृहात परंपरेप्रमाणे अनेक विधायक व सृजनशील उपक्रम घेण्यात आले.वसतीगृहाचे वैशिष्ठ्य म्हणजे विद्यार्थी व विद्यार्थीनींची राहण्याची स्वतंत्र उत्तम व्यवस्था शिवाय विद्यार्थी व विद्यार्थीनींनी क्लब पध्दतीने चालवलेली मेस होय.

विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सुप्त कलागुणांना विकसीत करण्यासाठी वर्षभरात अनेक कार्यक्रम राबविले गेले.

वर्षाच्या आरंभी मु.जे.वसतीगृहाच्या कला व सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन प्राचार्य श्री.द.स.नेमाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

१)कला व सांस्कृतिक मंडळातर्फे "लैंगिक शिक्षण व समस्या" या विषयावर डॉ.बी.पी.राजपूत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२) डॉ.उल्हास पाटील यांनी "एड्स-एक भस्मासूर" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

३) प्लेगचे भयावह वातावरण, प्लेग प्रतिबंधात्मक उपायाविषयी उल्हास पाटील यांनी सविस्तर माहीती देऊन विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर केली.

४) दि.२४डिसेंबर ९४ ला सानेगुरूजी जयंती उत्साहात

मु.जे. कनिष्ठ महाविद्यालय, जळगांव.

# जिमखाना अहवाल १९९४-९५

सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात तालुका पातळीवरील स्पर्धासाठी आपल्या महाविद्यालयाचे १४ संघ पाठविण्यात आले होते. सदरच्या स्पर्धामध्ये मुले व मुली मिळून ११९ खेळाडूंचा सहभाग झाला. सदर स्पर्धाचे व खेळाडूंचे यश-अपयश यांचा तपशील खालील प्रमाणे

सांघीक खेळांमध्ये-

| संघाचे नाव:- | | |
|---|---|---|
| १) लॉन टेनिस | मुले | प्राविण्य |
| २) पोहणे | मुले | विजयी. |
| ३) बॅडमिंटन | मुले | विजयी. |
| ४) टेबल-टेनिस | मुले | विजयी. |
| ५) टेबल-टेनिस | मुली | विजयी. |
| ६) हॅन्ड-बॉल | मुले | विजयी. |
| ७) कबड्डी | मुले | सहभाग. |
| ८) बासकेट-बॉल | मुले | उपविजयी. |
| ९) खो-खो | मुले | सहभाग. |
| १०) भारोत्तोलन | मुले | सहभाग. |
| ११) कुस्ती | मुले | सहभाग. |
| १२) व्हॉली-बॉल | मुले | उपविजयी. |
| १३) फुट-बॉल | मुले | उपविजयी. |
| १४) बुध्दीबळ | मुले | उपविजयी. |

वरील पैकी जे संघ विजयी झालेले आहेत. ते सर्व जिल्हा पातळीवर खेळावयास जातात. जिल्हा पातळीवरील यशापयशाचा तपशिल खालील प्रमाणे.

१) लॉन टेनिस:-

या स्पर्धा मु.जे.महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर घेण्यात आल्यात त्यात मु.जे.महाविद्यालयाला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले.

१) सुनिल अडवाणी व अमित आर. शहा या दोन खेळाडूंच्या कर्तृत्वाने त्यांची नाशिक येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धासाठी जळगांव विभागाच्या संघात निवड करण्यात आली.

२)पोहणे:-

१) कैलास नगरकर २) सुदीप राणे ३)पियुष सराफ ४) अमर चौधरी या खेळाडूंनी जिल्हा पातळीवर प्रथम येवून त्यांची नाशिक येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धासाठी निवड करण्यातआली.

झालेल्या विभागीय पोहणे या स्पर्धेमध्ये १) कैलास नगरकर २) सुदीप राणे हे प्रथम येवून या दोन्ही खेळाडूंची राज्य पातळीसाठी निवड करण्यात आली.

३) बॅडमिंटन :

या संघाने जिल्हा पातळीवर घवघवीत यश मिळवून दादोजी कोंडदेव स्टेडीयम ठाणे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धासाठी खेळावयास गेले.तेथे मात्र आपला प्रभाव पाडू न शकल्यामुळे पराजय पत्करावा लागला.

४) टेबल-टेनिस: मुले -

झालेल्या जिल्हा पातळीवरील स्पर्धामध्ये सहजगत्या यश मिळविणाऱ्या संघाला विभागीय पातळीवर कडवी झुंज देवूनही विजयश्री खेचता आली नाही.

५) टेबल-टेनिस :- मुली -

जिल्हा पातळीवरील स्पर्धामध्ये या संघाला विजेते पद प्राप्त झाले मात्र विभागीय पातळीवर यश मिळविता आले नाही, मात्र कु.गंधा प्रकाश दप्तरी या खेळाडूच्या नेत्रदिपक व आक्रम खेळीमुळे तिची होणाऱ्या राज्यपातळीवरील चाचणीसाठी निवड करण्यात आली.व राज्य पातळीवर खेळण्याचा मान मिळाला.

वर्षभराच्या कामकाजामध्ये प्राचार्य डी.एस.नेमाडे, उपप्राचार्य पी. एल.कोल्हे, उपप्राचार्य व्ही.जे.चौधरी. उपप्राचार्य ए.बी.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राध्यापक ,मित्रवर्ग, व इतर क्रिडा रसीक यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

क्रीडा प्रमुख
प्रा. पी.डी.तळेले
एम्.ए.एम्.पी.एड.

## जैन करंडक एकांकीका स्पर्धा

सालाबाद प्रमाणे जैन करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकीका स्पर्धा दि. २८ जाने. १९९५ रोजी जे.डी.सी.सी बँकेच्या सभागृहात आयोजीत करण्यात आली . या प्रसंगी मोठ्या संख्येने प्राध्यापक, विद्यार्थी व शहरातील नागरीक, प्रेक्षक उपस्थीत होते.

स्पर्धेचे उद्‌घाटन डॉ. शंकर पुणतांबेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिध्द उद्योगपती श्री. दलूभाऊ जैन यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. सदर स्पर्धेत मु.जे.महाविद्यालय, जळगांव ;नूतन मराठा महाविद्यालय, जळगांव ; उत्तर महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय ; धनाजीनाना महाविद्यालय फैजपूर ; विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे ; एस.एस.व्ही.पी.कॉलेज धुळे ; पालेशा कॉलेज धुळे; पालेशा मॅनेजमेंट इंस्टीट्यूट धुळे या महाविद्यालयातील दहा संघांनी भाग घेतला.

या स्पर्धेत मु.जे. महाविद्यालयातील संघाने सादर केलेल्या 'खेळखेळीयाचा' या एकांकीकेस व्दितीय पारीतोषिक मिळाले. शिवाय अनिरूध्द सकळकळे यांना व्दितीय क्रमांकाचे वैयक्तिक अभिनयाचे पारितोषिकही मिळाले . सदर स्पर्धेत मु.जे.महाविद्यालयातील संघाने 'द्रष्टा' ही हिंदी एकांकीका ही सादर केली होती.

स्पर्धेच्या आयोजनासाठी जैन फौंडेशन जळगांव यांच्या कडून सुमारे पंधरा हजार रू ची अनुदानराशी प्राप्त झाली होती. या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या परीक्षणासाठी मा. श्री. विजय रणदिवे, आकाशवाणी जळगांव, प्रा.डॉ. प्रभाकर जोशी, प्रताप कॉलेज अमळनेर आणि प्रा.डॉ. ओमप्रकाश शर्मा भडगांव यांना आमंत्रित करण्यात आले होते.

स्पर्धेच्या यशस्वी संयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर वर्ग यांनी खूप परीश्रम घेतले होते.

प्रा.डॉ. तेजपाल चौधरी

## एन.सी.सी.

१९९४-९४ या वर्षी आपल्या महाविद्यालयातील २६६ विद्यार्थी व ५४ विद्यार्थीनींनी एन.सी.सी. चे लष्करी प्रशिक्षण पुर्ण केले. वर्षभरात छात्रसैनिकांनी वृक्षारोपण रक्तदान, प्रौढ शिक्षण,कुटुंब कल्याण, साफसफाई, सद्‌भावना रॅली,सायकल-एक्स्पीडेशन इत्यादी कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थीनींनी उत्स्फुर्तपणे सहभागी झाले होते. तसेच अमरावती येथे pre R.D. वpre B.L.C. सिलेक्शनसाठी SUO विलास बोंडे, SUO संजय चौधरी, SUO मनोहर वाघ,SUO विनोद भावसार, UO पंकज मालवी, UO विजय नेरकर, UO दिलीप चौधरी इ.व विद्यार्थीनींनमध्ये UO वैशाली नेरकर, खंदार, नाईक, भोळे,भावसार, बुदानी व S.G.T.श्वेता समदानी इ. छात्रसैनिक सहभागी झाले होते.तसेच शिवाजी ट्रेकिंग कोल्हापूर या कॅम्प करिता UO पंकज मालवी व CPL गणेश नारखेडे यांची निवड झाली होती. तसेच या वर्षी आर्मी अॅटॅचमेंटच्या कॅम्पमध्ये प्राजक्त प्रचंड, भास्कर साळुंखे, श्रीकांत पुंडे, रघुवीर पाटील, पद्‌माकर पाटील, भुपेंद्र पाटील, मनीष भावसार, संदिप तडवी, मिलिंद भोळे, हेमंत ढाके, जगदिश गंगावणे इ. कॅडेट सहभागी झाले होते.

तसेच महत्वाची बाब म्हणजे आपल्या महाविद्यालयातीलSUO मनोहर वाघ व UO वैशाली नेरकर या दोन छात्रसैनिकांनीR.D.कॅम्प करीता निवड होवून SUOमनोहर वाघ २६ जानेवारी १९९५ च्या R.D.परेडमधील राजपथ संचलनासाठी तसेच P.M. रॅली मध्ये व UO वैशाली नेरकर दिल्लीच्याR.D. परेड मधे गार्ड ऑफ ऑनरव कंपनी कमांडर म्हणून निवडण्यात आली होती.दर वर्षाप्रमाणेच विद्यार्थ्यांचे १९९४-९५ चे वार्षिक प्रशिक्षण शिबीर पाल येथे होते.तसेच विद्यार्थीनींचे शिबीर अमरावती येथे आयोजित करण्यात आलेले होते.शिबीरात मुलामधे १८ महाराष्ट्र बटालीयनचे नेतृत्व कॅम्प सिनीयर संजय चौधरी यांनी केले. तेथे वेगवेगळ्या स्पर्धमध्ये आपल्या महाविद्यालयातीलSUO संजय चौधरी, UO पंकज मालवी, UO किशोर पारधे, UO दिलीप चौधरी CPL राहूल वानखेडे, CPLप्रविण चव्हाण, CPL सतिष मोरे, CPL अंबादास ठाकूर, CDT लिओनार्ड फटलर इ. छात्रसैनिकांनी विशेष प्राविण्य दाखवून संघीक विजेतेपद आपल्या महाविद्यालयाला मिळवून दिले. तसेच मुलींचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर अमरावती येथे होते. तेथे विद्यार्थीनींचे नेतृत्व UO वैशाली कुळकर्णी हिने केले. तेथे वेगवेगळ्या स्पर्धांमधे श्वेता समदानी, स्वराली राजदेरकर, वैशाली कुळकर्णी यांना पुरस्कार मिळून या वर्षाचे सांघिक विजेतेपदही मु.जें महाविद्याल याला मिळाले. विद्यार्थीनींचा N.I.C. कॅम्प जुन्नर येथे संपन्न झाला. त्यात खंदार, नाईक, मंजुषा आयाती, कोतवाल, भावना चौधरी यांनी संस्कृतीची देवाण-घेवाण स्पर्धा कार्यक्रम केला. कानसवाडी येथे जावून विद्यार्थीनींनी ग्रामस्थांना साफसफाई, शिक्षण, छोटे कुटुंब, स्त्रियांचे अधिकार इ. महत्व पटवून दिले. गावाचे निरीक्षण करून तेथील लोकांचे प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

वर्षभरातील स्पर्धमध्ये SUO संजय चौधरी, UO पंकज मालवी, UO संदेश सुरळकर UO दिलीप चौधरी, CPL सतिष मोरे, CDTअंबादास ठाकूर CPL दिनेश आईदासानी, CDT जितेंद्र परदेशी व विद्यार्थीनींन मध्ये UOवैशाली कुळकर्णी,S.G.T. श्वेता समदानी, S.G.T. वैशाली भोळे, CPL प्रिती कोतवाल, CPL मंजूषा आयाती, CDT मीना परदेशी यांना २६जानेवारी रोजी प्राचार्य डी.एस. नेमाडे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.



'धुळे-जळगाव जिल्हा पदार्थ विज्ञान इलेक्ट्रॉनिक्स शिक्षक संघ' वार्षिक मेळावा प्रसंगी मा. कुलगुरु डॉ. एन.के. ठाकरे यांचे स्वागत करतांना प्राचार्य डी.एस.नेमाडे



स्थानिक चौकशी समिती (पदव्युत्तर) कला शाखेचे अध्यक्ष प्रा. बी. आर. जोशी यांचा सत्कार करतांना मा. प्राचार्य



स्थानिक चौकशी समिती (पदव्युत्तर) विज्ञान शाखेचे अध्यक्ष डॉ. के.बी. पाटील यांचा सत्कार करतांना प्राचार्य

साजरी करण्यात आली.वसतीगृहाच्या अनेक विद्यार्थ्यांनी खान्देशभूषण सानेगुरूजींच्या जीवनावर उत्स्फूर्तपणे प्रकाश टाकला.

५) सौ. कल्पना भुरे यांचे "स्त्री व्यक्तीमत्व विकास" या विषयावर विद्यार्थीनींनसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

६) विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर वस्तीगृहाच्या परंपरेप्रमाणे प्राचार्य श्री.द.स.नेमाडे यांच्या हस्ते वस्तीगृहातील विद्यार्थ्यांतर्फे मेसमधील कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. त्या दिवशी सहभोजनाचा कार्यक्रम झाला.

दि.२६ जाने.९५ ला मेहरूणच्या जे.के. पार्कच्या नयनरम्य वातावरणात सहभोजन व विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात साजरा केला. ह्या कार्यक्रमाची सुरवात "ए मेरे वतन के लोगो" ह्या देशभक्तीपर गीताने झाली. नंतर गीतगायनाचा कार्यक्रम झाला.या कार्यक्रमात मिमिक्री व वन मिनीट कार्यक्रमांचा समावेश होता. शेला पागोट्यांच्या कार्यक्रमाने सर्व उपस्थितांना आकर्षित केले.

वर्षभरात मेसमॅनेजर श्री.के.एम.कोपरकर व बी.पी.खंदारे ह्यांनीमेसचे कामकाज अत्यंत नियोजितपणे हाताळले. महाविद्यालयाचे प्राचार्य व उपप्राचार्य यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थी व कर्मचारी यांनीही वर्षभराच्या कामकाजात उत्स्फूर्तपणे भाग घेतला. सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींनी वस्तीगृहाची मुल्ये व परंपरा जतन करून बंधुभावाचे व खेळीमेळीचे वातावरण ठेवले. त्यामुळे ते अभिनंदनास पात्र आहेत.

प्रा.डॉ.एस.एस.राणे रेक्टर-विद्यार्थी वसतीगृह
प्रा.सौ. डॉ.एम.एम.जावळे रेक्टर-विद्यार्थीनी वसतीगृह

## राष्ट्रीय सेवा योजना अहवाल
## वार्षिक अहवाल १९९४-९५

या शैक्षणिक वर्षाच्या उपक्रमाची सुरवात दि. १७ जुलै रोजी सकाळी ८ वाजता मा.प्राचार्य डी.एस. नेमाडे यांच्या हस्ते लॉ.कॉलेजच्या परिसरात प्रासोपिस वृक्षाच्या लागवडीने करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद् बोधन व उपक्रमाविषयी मा.प्राचार्य नेमाडे, उपप्राचार्य ए.बी.पाटील, यांनी विद्यार्थीनींना माहिती दिली.महाविद्यालयाच्या विविध उपक्रमात व सेवेत रा.से.योजनेच्या विद्यार्थ्यांकडून प्राचार्यांनी आपल्या अपेक्षा कथन केल्या.

श्रम रोपवाटीका उपक्रम :- सामाजीक वनीकरण विभाग जळगांव व मु.जे.महाविद्यालय यांच्या सहकार्याने रा.से.योजनेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींनी श्रमदानातून ५०००० रोपाची निर्मीती केली. प्रासोपिस, गुलमोहर, निलगीरी, चिंच, सिताफळ, बोर, सागरगोटा, शेवगा, पेट्रोकार्म, बकाम इ. झाडाची रोपे तयार करण्यासाठीची सर्व कामे श्रमदानातून करण्यात आली.रोपवाटीकेतील रोपांची लागवड विद्यापीठ परिसर, दत्तकगांव कानसवाडे येथे करण्यात आली. फळझाडे शेकऱ्यांना मोफत पुरविण्यात आली.

वृक्षसंगोपन उपक्रम :- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरात १५०० रोपांची श्रमदानातून खड्डे खोदून विद्यापीठ अभियंता श्री.सी.टी.पाटील यांच्या प्रत्यक्षिता व्दारे व प्रा.डॉ.ढेकणे, प्रा.डी.एच.महाजन यांच्या हस्ते गुलमोहोर, कडूलिंब, प्रासोपिस, बकाम, चिंच इ. झाडांची लागवड करण्यात आली. प्रा. महाजन यांनी मुला-मुलींना विद्यापीठ परिसर विकास व रा.से.योजना या विषयी मार्गदर्शन केले. मा.आण्णासाहेब बेंडाळे यांच्या वाढदिवसानिमित्त दि.१८-८-९४ रोजी आण्णासाहेब व महाराष्ट्र बँकेचे अधिकारी श्री.कराडकर

# एन.सी.सी.



कु. वैशाली नेरकर
आर. डी. परेड दिल्ली



मनोहर वाघ
आर.डी. परेड दिल्ली



सोनल खंदार
एन.आय.सी. कँप, पुणे



प्रिती नाईक
एन.आय.सी. कँप, पुणे



श्वेता समदानी
बेस्ट फायरर बी.एस.सी. कँप



संगिता कलकोंडा
सी परिक्षा उत्तीर्ण



रोहित शर्मा
सिनी. अंडर ऑफीसर
सी परीक्षा उत्तीर्ण



रविन्द्र ठाकुर
सिनी. अंडर ऑफीसर
सी परीक्षा उत्तीर्ण



संजय चौधरी
बेस्ट सिनी. अंडर ऑफीसर



विलास बोंडे
सिनी. अंडर ऑफीसर



पंकज मालवी
ट्रेकिंग कँपचे नेतृत्व

# मेडीकल व इंजिनिअरींगला प्रवेश



ज्ञानेश पाटील
मेडीकल



तुषार नेहेते
मेडीकल



चेतन ढाके
मेडीकल



नितीन जैन
मेडीकल



मनिषा शिंपी
मेडीकल



झिनल चौधरी
मेडीकल



सोनाली तळेले
मेडीकल



प्रिती वायकोळे
मेडीकल



स्मिता शिरसाळे
मेडीकल



निशिकांत वानखेडे
मेडीकल



श्रीकांत उपासनी
मेडीकल



सचिन जैन
इंजिनियरींग (बोर्डात आठवा)

तसेच १९९४-९५ या वर्षाचा व बीम सर्टिफीकेट परीक्षेचा निकाल १०० लागला असुन सर्टिफीकेट परीक्षेत संगिता कलकोंडा 'A' ग्रेड तसेच रोहीत शर्मा, रविंद्र ठाकूर, गणेश पाटील, वैशाली बाविस्कर, हेमांगी पाध्ये, वंदना देवपुरे इ. छात्रसैनिक 'B' ग्रेड मध्ये पास झाले आहेत.

महत्वाची बाब म्हणजे यावर्षी पोलीस ग्राउंड वरील २६ जानेवारीच्या संचलनासाठी आपल्या महाविद्यालयातील N.C.C. प्लटून बेस्ट प्लटून काढण्यात आला होता. व या प्लटूनचे नेतृत्व SUO संजय चौधरी याने केले होते. तसेच जळगांव ते अजिंठा सायकल एक्स्पीडीशन मध्ये आपल्या महाविद्यालयातील २५ छात्रसैनिक व कॅप्टन एस.एम.रडे, लेफ्टनंट आर.आर. भालसिंग यात सहभागी झाले होते.

मेजर - सौ.मालती जावळे
कॅप्टन - प्रा.एस.एम.रडे
लेफ्टनंट - प्रा.आर.आर.भालसिंग

## ग्रंथालय वार्ता

सुसज्ज आणि अद्ययावत ग्रंथालय हेच खऱ्या अर्थाने ज्ञान मंदिर होय. आदर्श शिक्षण संस्थेला अशा समृध्द ग्रंथालयाचा अभिमान असतो. असे ग्रंथालय आमच्या महाविद्यालयाला लाभले आहे.दरवर्षी ग्रंथालयात विविध विषयावरील पुस्तकांची भर पडत असते. १९९४-९५ या वर्षात विविध विषयावरील ९५६ ग्रंथ खरेदी केले. विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मिळालेली पी.जी.डी. ग्रँट या योजनार्तगत यातून काही पुस्तके खरेदी करण्यात आली. त्यामुळे आधीच्या विपूल समृध्द ग्रंथसंभारात आणखी मोलाची भर पडली.आज मितीला ग्रंथालयातील ग्रंथसंख्या १६७४५ झालेली आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, बहि:स्थ विद्यार्थी, संशोधन कार्य करणारे विद्यार्थी अभ्यासक आदींना आपल्या ग्रंथालयाचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असतो.

यावर्षी ग्रंथालयात झेरॉक्स मशिन घेतल्यामुळे विद्यार्थी, प्राध्यापक, व संशोधन कार्य करणारे यांना संदर्भ सेवा चांगल्या प्रकारे देण्याची सोय झाली.

ग्रंथालयातील अभ्यासिका सकाळी ७-३०ते संध्याकाळी ५-३० पर्यंत व संध्याकाळी ७ते रात्री १० वाजेपर्यंत अशी सतत विद्याथ्यांसाठी उपलब्ध असते.

ग्रंथालयाचे कामकाज सुविहीतपणे वर्षभर चालू असते. प्राचार्य डी.एस.नेमाडे ,उपप्राचार्य पी.एल. कोल्हे, उपप्राचार्य व्हीजे चौधरी,उपप्राचार्य ए.बी पाटील लायब्ररी इनचार्ज प्रा.एस.एम.छापेकर, ग्रंथालय समितीतील सदस्य, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी वर्ग व अन्य विभागातील कर्मचारी वर्ग या सर्वांचे मन:पूर्वक सहकार्य लाभले.या बद्दल त्यांचे हार्दीक आभार

प्रा.प्र.दे.बऱ्हाटे
ग्रंथपाल



जिमखाना डे चे उद्‌घाटन करताना प्राचार्य



जिमखाना डे बक्षिस देतांना प्राचार्य समवेत जिमखाना समिती



मायक्रोबॉयोलॉजी विषयाच्या कमिशनच्या वेळी प्रा. चिंचोलकर व प्रा. हनबरहट्टी सोबत प्राचार्य नेमाडे

साहेब यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या मुख्य रस्त्यावर वृक्षारोपण करण्यात आले. लॉ.कॉलेज परिसर दत्तक गांव कानसवाडे परिसरात वृक्षारोपण व वृक्ष संगोपन उपक्रम हाती घेण्यात आला.

कॉलेज व परिसरातील विषारी गाजर गवत निर्मूलन उपक्रमात रा.से.योजनेतील मुलांनी गाजर गवत नष्ट करण्याचे प्रयत्न केलेत. दत्तक गांव कानसवाडे येथे मारूती देऊळ समाज मंदिर परिसर व गावाच्या परिसरातील गाजर गवत नष्ट करण्यासाठी सरपंच विकास भाऊ सोनवणे, श्री.गोपाळ सोनवणे, श्री.भास्कर सोनवणे या ग्रामस्थांनी या उपक्रमात सहभागी होवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्लेग जनजागरण कार्यक्रम :- महाराष्ट्र व गुजराथ राज्यात आलेल्या प्लेगच्या साथीचा प्रसार जळगांव परिसरात होऊ नये म्हणून रा.से.योजनेतर्फे अनेक उपक्रम हाती घेण्यात आले. महाविद्यालयातील क्लास, प्रयोगशाळा, वसतिगृह, पटांगण, मु.जे.महाविद्यालयाचा परिसर व दत्तक ग्राम कानसवाडी येथे प्लेग निवारण उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी डी.टी.टी./बी.एच.सी.बेगॉन स्प्रे यांची फवारणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना प्लेग निवारण व उपाय याविषयी पोष्टर्स व सूचना लावण्यात आल्या. महाविद्यालयातील सर्व मुलांसाठी डॉ.उल्हास पाटील, डॉ.रजनी नारखेडे यांनी स्लाईडच्या आधारे माहिती दिली.

दि.३ ऑक्टो. रोजी कॉलेज सभोतालच्या पोस्टल,भूषण, विद्यूत, शिव, प्रभात, गुरूकुल, शामसुंदर या कॉलनीमध्ये रा.से योजनेतील मुलांनी कॉलनीतील लोकांना पोस्टर्स,निवेदन यांच्या आधारे माहिती दिली. त्यासाठी सायकल रॅलीचे आयोजनकरण्यात आले. कॉलनीतील नागरीकांनी या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला. रॅलीची सांगता दुपारी ४वाजता महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आली.रॅलीच्या यशस्वीतेसाठी संदीप चौधरी, नितीन बडगुजर, महेन्द्र धांडे, प्रमोद भालेराव, अनिरूध्द सकळकळे यांनी विशेष प्रयत्न केले.

दि.४ ऑक्टो. रोजी दत्तक गांव कानसवाडे येथे सरपंच, ग्रामस्थ यांच्या मार्गदर्शनासाठी गांवातील रस्ते, सांडपाणी व्यवस्था व सभोवतालच्या सार्वजनिक भागाची साफसफाई करण्यात आली.तसेच प्राचार्य नेमाडे यांनी प्लेग रोग व निवारण या विषयी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. गावात ग्रामपंचायततर्फे झालेल्या बी.एच.सी. पावडरची फवारणी करण्यात आली. या उपक्रमात गावातील महिला वर्ग विशेष सहभागी झालेला होता.

व्यसनमुक्ती अभियान :- राष्ट्रीय सेवा योजनेतील दहा ग्रुप लिडरने जिल्ह्यातील ग्रामीण भागात व्सन मुक्ती जनजागरण अभियानासाठी दहा दिवस सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरवात २१-११-९४ रोजी मा.प्राचार्य नेमाडे व ॲड.जयप्रकाश बाविस्कर यांच्या हस्ते करण्यात आली. या दहा दिवसात मुलांनी पथनाट्य, भारूड, गीतगायन, भाषण, पोस्टर्स इ. माध्यमांचा वापर करून जिल्ह्यातील विविध भागात व्यसनमुक्ती जनजागरण अभियान उपक्रम पार पाडला. व्यसनमुक्ती सायकल रॅलीसाठी जिल्ह्यातील समाजसेवक, गावाचे सरपंच, पंचायत समितीचे सदस्य व ग्रामस्थांचे सहकार्य व सहभाग लाभला.या उपक्रमात महेंद्र धांडे, किशोर बडगुजर, सुरेश पाटील, दुर्गादास कोल्हे, मनोज तळेले, किशोर कोल्हे, प्रमोद भालेराव, मुकेश सोनवणे, व उमेश कापडे हे विद्यार्थी सहभागी झालेत.

या उपक्रमासाठी आर.एच.विधाते व किशोर भोसले.यांचे मार्गदर्शन लाभले.

विशेष हिवाळी शिबीर :- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिसरात दहा दिवसाचे श्रम संस्कार व व्यक्तीमत्व विकास शिबीर आयोजित करण्यात आले.शिबीराच्या कालावधीत विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील खड्डा मुरूमाने भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले. मागील वर्षी या वर्षात मु.जे महाविद्यालय रा.से.योजना इतर सेवाभावी संस्थांनी लागवड केलेल्या १५०० रोपांची निगा व त्यांना प्रत्येकाला दोन बादल्या पाणी टाकण्याचा मोठा उपक्रम हाती घेण्यात आला. त्याकामी विद्यापीठ अभियंता श्री.सी.टी.पाटील, प्रा.डॉ.ढेकणे व विद्यापीठातील कर्मचारी वर्गाचे विशेष सहकार्य लाभले.

शिबीराच्या कालावधीत पुर्नप्रस्थापीत टाकरखेडा या गावच्या समस्यांन विषयी प्रश्नमंजुषा यांच्या आधारे सर्वेक्षण करण्यात आले.टाकरखेडा गावात असलेल्या प्राथमिक स्वरूपाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प मनोज तळेले, किशोर कोल्हे, किशोर बडगुजर, नितीन बडगुजर, गणेश पाटील यांनी केला.रासायनिक खत कारखान्यामुळे झालेल्या प्रदुषणाचा परिणाम या भागाच्या शेतीवर झालेला आहे.

शिबीराच्या कालावधीत मा.कुलगुरू ठाकरे, मा.प्राचार्य नेमाडे, प्रा. महेश जोशी, प्रा.डी.एच.महाजन, प्रा.गोखले, प्रा.राजे, प्रा.पी.टी.चौधरी, श्री.चौधरी साहेब सामाजिक वनीकरण, श्री.मु.रा.चौधरी वनलिभाग, श्री.सी.टी.पाटील विद्यापीठ अभियंता, उपप्राचार्य ए.बी. पाटील,श्री.पी.एल.कोल्हे यांच्या भेटी व विद्यार्थींना मार्गदर्शन मोलाचे वाटले.

स्त्रियांसाठी राखीव जागा योग्य कि अयोग्य, आंतरजातीय विवाह, पर्यावरण संतुलन व युवक, वृक्षसंगोपन व रा.से.योजना, एड्स एक भयंकर रोग, आजचा युव दिशाहिन आहेत का ?इ. विषयावर चर्चा घेण्यात आल्या.

दि. १डिसेंबर १९९४ रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त महाविद्यालयात एड्स या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या चित्रांचे प्रदर्शन भूगोल विभागात भरवण्यात आले. त्या कार्यक्रमात संदीप चौधरी, गणेश पाटील, किशोर कोल्हे, महेंद्र धांडे यांनी विशेष परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनाच्या कलादालनात एड्स निवारणाविषयी चित्रे, घोषवाक्य, व्यंगचित्र व भित्तीपत्रके प्रेक्षणिय होती.

उद्‌बोधनपर उपक्रम :- रा.से.योजनेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी नियमीत उपक्रमात व शिबीराच्या कालावधीत विविध विषयावर तज्ञ व्यक्तींची भाषण आयोजित करण्यात आली. प्राचार्य नेमाडे, प्रा.शामकांत कुलकर्णी, प्रा.एस.डी.सिरसिकर, माजी खासदार भाईसाहेब महाजन, श्री.एस.आर.चौधरी व एन.डी.चौधरी सामाजिक वनिकरण श्री.मु.रा.चौधरी वनक्षेत्रपाल धुळे, श्री.बी.एन.पाटील, जिल्हा उघोग केंद्र, प्रा.पी.टी.चौधरी, डॉ.भागवत महाजन, डॉ.नारखेडे यांची भाषणे आयोजित करण्यात आली.

विद्यापीठ एड्स निवारण उपक्रम :- सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एड्स या महाभयंकर आजारापासून जागृत करण्यासाठी एड्स जागरण उपक्रम हाती घेण्यात आला.एड्स उपक्रमाचे उद्‌घाटन मा.डॉ. आण्णासाहेब बेंडाळे व डॉ.उल्हास पाटील यांच्या भाषणाने संपन्न झाले.

डॉ. आण्णासाहेब बेंडाळे व डॉ.उल्हास पाटील यांनी स्लाईडच्या आधारे विद्यार्थांना एड्स रोगाविषयी माहीती दिली.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनसाठी एड्स विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. चित्रकला स्पर्धात प्रथम-संदीप चौधरी, व्दितीय-महेंद्र धांडे, तृतीय-किशोर कोल्हे व उत्तेजनार्थ कु.गंगा वासेवाय यांना प्रमाणपत्र देण्यात आले.१डिसे. या

जागतिक एड्स दिनी भूगोल विभागात चित्रकला, भित्तिपत्रक, घोषवाक्य यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.उपप्राचार्य ए.बी.पाटील यांनीप्रदर्शनास भेट देवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. भारत सरकार क्षेत्रीय प्रसार विभाग व मु.जे.महाविद्यालयाच्या विद्यमाने जळगाव शहरातील "एड्स एक भस्मासूर" या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात्त आल्या. त्यात प्रथम क्रमांक महेंद्र धांडे मु.जे.महाविद्यालय, व्दितीय क्रमांक कु.जोशी बेंडाळे कॉलेज व तृतीय क्रमांक विशाल चित्रे नूतन मराठा कॉलेज यांना डॉ.आण्णासाहेब यांच्याहस्ते व डॉ.भागवत महाजन, श्री.सिराज तडवी यांच्या उपस्थित बक्षिस वितरण करण्यात आले.

प्रशिक्षण उपक्रम :- महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एड्स या आजाराविषयी माहिती मिळण्यासाठी प्रा.डॉ.ए.एस.भोळे, प्रा.श्रीमती के.पी.नंदनवार यांना अहमदनगर व गोवा या ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले.२१ व २२ फेब्रुवारी ९५ या कालावधीत जळगाव जिल्ह्यातील ६० विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्तरीय एड्स प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षणात आमचे विद्यार्थी, बेंडाळे महाविद्यालय, नूतन मराठा कॉलेज, उत्तर महाराष्ट्र कॉलेज मधील विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभागी झाले होते. शिबीराच्या कालावधीत प्रा.बी.पी.पाटील-नूतन मराठा कॉलेज, प्रा.ए.एस.भोळे -एम.जे.कॉलेज, प्रा.सौ.बिरला- कोटेचा महाविद्यालय भुसावळ, प्रा.डॉ.एस.जे.भामरे-जी.टी.पी.कॉलेज नंदूरबार, डॉ.ढेकणे-नूतन मराठा कॉलेज जळगाव, डॉ.भागवत महाजन- जिल्हा रूग्णालय जळगाव यांची भाषणे, चित्रफिती व प्रत्यक्षिक आयोजित करण्यात आली. प्रशिक्षीणार्थीनाएड्स विषयावरील दोन लघुपट दाखविण्यात आली.य वेळेस एम.जे.कॉलेज जळगाव येथे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले. या प्रशिक्षणाच्या कालावधीत प्रा.एस.आर.बडगुजर संयोजक विद्यार्थी कल्याण मंडळ यांनी मुलांना मार्गदर्शन केले व शिबीराचा समारोप करण्यात आला.

विशेष कार्यक्रम :- महाविद्यालयाच्या परिसरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनसाठी महाविद्यालय पातळीवरील विविध उपक्रम घेण्यात आले.महाविद्यालयातील मुलांकडून प्रश्नमंजुषेच्या आधारे एड्स या विषयी माहिती गोळा करण्यात आली.महाविद्यालयातील सर्वसाधारणपणे सर्वक्षण केलेल्या पैकी ५३ टक्के मुलांना एड्स विषयी फार थोडी माहिती होती. सरकारी रूग्णालय व सरकारी यंत्रणेकडून मिळालेल्या व विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्रांचे प्रदर्शन जिमखाना विभागात विद्यार्थ्यां साठी खुले ठेवण्यात आले. त्याच दिवशी "सुबह होने तक" हा लघुपट दाखविण्यात आला.

महाविद्यालयातील मुर्लीना एड्स विषयावरील पथनाट्य कॉलेज गेट व परिसरात ठिकठिकाणी आमंत्रित केले.विद्यार्थ्यांना एड्स विषयी माहिती व्हावी म्हणून हॅंडबिल तयार करून वाटण्यात आले. तसेच डॉ.भागवत महाजन, डॉ.उल्हास पाटील यांचा भाषणे आयोजित करण्यात आली.एड्स संबधित पोस्टर्स तयार करून महाविद्यालयाच्या परिसरात लावण्यात आली.विद्यार्थ्यांन मध्ये एड्स विषयी चर्चासत्र घेण्यात आले."एड्स व युवक" याचर्चेत प्रा.कु.के.पी.नंदनवार प्रा.भारंबे यांना भाग घेतला.महाविद्यालयातील मुलांसाठी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पथनाट्याचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षिसे डॉ.आण्णासाहेब बेंडाळे यांचे हस्ते देण्यात आले.जिल्हास्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला सात कॉलेजमधून निबंध व चित्र स्पर्धेसाठी उपलब्ध झाली. उपक्रमांचे मुल्यमापन म्हणून महाविद्यालयातील मुलांकडून प्रश्नमंजुषा भरून घेण्यात आल्या. महाविद्यालयात एड्स विषयीघेतलेल्या विविध उपक्रमा मुळे ७१ टक्के मुलांना एड्स रोगाविषयी चांगले ज्ञान मिळाले.

सद्भावना पंधरवाडा :- आपल्या लाडक्या माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जन्म दिनापासून १५ दिवस सद्भावना पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले.प्राचार्यांनी मुलांना सद्भावनेची शपथ दिली.माजी खासदार भाईसाहेब महाजन, प्रां शामकांत कुलकर्णी यांची भाषणे आयोजित करण्यात आली.मागील वर्षी लावलेल्या "सद्भावना वन" विद्यापीठाच्या परिसरात वृक्ष संगोपनासाठी रा.से.योजनेतील विद्यार्थी गेले.झाडांना आळे करणे, पाणी घालणे,इ. कामे करण्यात आली.
आळे करणे, पाणी घालणे,इ. कामे करण्यात आली.

रा.से.योजना दिन :- राष्ट्रीय सेवा योजना दिन या वर्षी दत्तक गांव कानसवाडे येथे साजरा करण्यात आला.सरपंच, ग्रामपंच सदस्यव ग्रामस्थ यांचे या उपक्रमातील सहभाग उल्लेखनीय होता.कानसवाडे येथे विद्यार्थ्यांनी स्वयंर चित व्यसनमुक्ती, राष्ट्रीय एकात्मता,एड्स, सामाजिक जाणीव या वरील पथनाट्य, पोवाडे, भावगीते सादर करण्यात आली. रात्री परत येतांना झालेल्या गारपीटीमुळे हा दिवस विशेष स्मरणिय राहीला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक उपक्रमात विद्यापीठ कर्मचारी, शहरातील डॉक्टर्स, समाजसेवक,कानसवाडे येथील सरपंच व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले.त्याबद्दल त्यांचे आभार.

कार्यक्रम अधिकारी

१)प्रा.एन.व्ही.भारंबे २)प्रा.डॉ.एस.भोळे

३) प्रा.कु.के.पी.नंदनवार ४) प्रा.डॉ.एस.एस.राणे

मु.जे.कनिष्ठ महाविद्यालय , जळगांव

## वाणिज्य मंडळ - १९९४ -९५

मु.जे. कनिष्ठ महाविद्यालयात सन १९९४-९५ या वर्षाकरिता वाणिज्य मंडळाची स्थापना करण्यात आली. प्रा.शरदश्चंद्र छापेकर यांचे हस्ते वाणिज्य मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. प्रा. छापेकर यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात विद्यार्थ्यांना वाणिज्य शिक्षणाचे महत्व आणि व्यक्तिमत्व विकास तसेच स्पर्धा परिक्षांचे महत्व या संदर्भात बहुमोल असे मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात वाणिज्य मंडळामार्फत प्रा.पी.जी.अभ्यंकर यांचे भारतीय शेअर बाजार व्यवसाय या विषयाच्या संदर्भात भाषण आयोजित करण्यात आले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणाव्दारा विद्यार्थ्यांना शेअर बाजाराची रचना व कार्यपध्दती आणि महत्व यासंबंधीची सविस्तर माहिती सहज सोप्या पध्दतीने सांगीतली.वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना बहुमोल असे मार्गदर्शन त्यांनी केले.

वाणिज्य मंडळाच्या कार्यक्रमांसाठी वेळोवेळी वाणिज्य मंडळाचे सदस्य आणि इतर प्राध्यापक वर्ग यांनी सहकार्य केले त्याबद्दल धन्यवाद.

प्रा. डॉ.ई.बी.माळी चेअरमन

प्रा.बी.एम.चौधरी सदस्य

प्रा.एस.ए.चौधरी "

प्रा.एस.ओ.उभाळे "

प्रा.एन.डी.चौधरी "

# प्राध्यापकांचे विशेष कार्य

XXXI "National Conference of The Indian Acadaemy of Applied psychology held at M.J.College Jalgaon"

Paper represented by :-

1. Dr. S. S. Rane

Title - "Alcoholic Addiction Among The Tribla And Urban People."

2.Prof. Magar J. G.

Prof. Labhane C. P.

Title - "Heredity And Drug Addiction With Respect To Alcholism "- A Review

3. Prof. M.M.Thombare

Title - "Jalgaon Sex Scandal And It's Repulcation on Society : A socio psychological Approach ".

4.Prof. Sonalkar S.M.

Title - Work Motivation- " In a Liberalised Indian Economy ".

Dr.R.T.Mahajan

Zoology

PAPER PRESENTED AND PUBLISHED

1) Some biochemical responses of the haemolymph of the carb Paratelphusa jacquemontii exposed to oil cake of Madhuca indica (G, mel ) INDIAN JOURNAL OF ENVIRONMENT AND TOXICOLOGY vol 4 (1) , 25 -28, 1994

2) Review on Fish toxicants of plant origin INDIAN JOURNAL OF ENVIRONMENT AND TOXICOLOGY vol 4 ( 1 ) 7 -18, 1994 Issn 0971 - 2127

3) Biochemical constituents of haemolymph of card of paratelphusa jacquemontii ( Ruthdun ) journal of Animal morphology and physiology vol, 42 No.182 1995

4) *A Hand Book on Laboratory Investigation*

*B Jain publishers, Firt edition, 1994 IsBN 81. 7021. 498 - x, New Delhi.*

*5) Studies on toxigily of plant extract Cestrum nocturnum (Linn ) - a new biocide A paper presented at 15th annualsession of the Academy of Environmental Biology , Agriculture University , Trivandram Nov 7-9, 1994*

*2] Prof (Mrs ) U.S.Manudhane - A Book on "Mammulian physilogy" for S.Y.Bsc. (NMU) Published by Oxford Press*

*3] प्रा. डॉ.किसन पाटील (मराठी विभाग ) दिनांक ४ आणि ५ डिसेंबर १९९४. मराठी प्राध्यापक परिषदेत उ.म.वि.प्रतिनीधी म्हणून सहभाग व " लोक परंपरेतील वृक्षपुजा - पर्यावरण जाणीव" या विषयावर शोध निबंध सादर*

*बालभारती मराठी ७वी पुस्तक समिक्षक (पुणे )*

*४) प्रा. बोरसे एन.एस. (अर्थशास्त्र विभाग ) एम.फील पदवी प्राप्त अमरावती विद्यापीठ विषय - नगाव येथील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्यन मार्गदर्शक डॉ.एन.एम.भाकरे (अकोला )*

*५) प्रा. बी.एल.कांबळे (भूगोल विभाग ) सेट परीक्षा - १९९४ उत्तीर्ण*

*६) प्रा.सौ.एस.सी.चौधरी ( भूगोल विभाग ) एम. फील.उत्तीर्ण (पुणे विद्यापीठ)*

*७) प्रा. आर.आर.भालसिंग (भूगोल विभाग ) एम.फील उत्तीर्ण (पुणे विद्यापीठ)*

# सन १९९४-९५ या वर्षासाठी विविध शिष्यवृत्ती मिळविणारे मानकरी

| अ.क्र. | पारीतोषिकाचे/ शिष्यवृत्तीचे नांव | तपशील | रू. | शिष्यवृत्ती/पारितोषिक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०१ | खेर गंभीरमल पारितोषिक | सर्वोत्कृष्ट विद्यार्थी | २७५ | कु. कुलकर्णी वैशाली अरूण |
| ०२ | पी.व्ही. रत्नपारखी पारितोषिक | प्रथम वर्ष कला आणि विज्ञान या दोन्ही शाखातून महाविद्यालयातून सर्व प्रथम विद्यार्थी | २८६ | पांडे राजश्री सुधीर |
| ०३ | डॉ.के.व्ही. पराडकर पारितोषिक | १२ वी विज्ञान या परिक्षेत जीवशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ५५ | चौधरी मकरंद सुरेश |
| ०४ | फाऊंडर मेंबर नानासाहेब दावलभक्त पारितोषिक | १२ वी विज्ञान परिक्षेत जीव-शास्त्र(बी ग्रुप) घेऊन सर्वाधिक गुण मिळविणारा व वैद्यकिय शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास | १२० | चौधरी मकरंद सुरेश |
| ०५ | डी.यु.वाणी पारितोषिक | १२ वी विज्ञान या परिक्षेत गणित या विषयांत सर्वाधीक गुण मिळविणारा विद्यार्थी | ५५ | करमरकर धनंजय दत्तात्रय |
| ०६ | डी.आर.नाडकर्णी पारितोषिक | १२ वी विज्ञान या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | ५५ | जैन सचिन हुकमीचंद |
| ०७ | तापीराम भगवान चौधरी आणि रमाबाई चौधरी (थोरगव्हाण) पारितोषिक | १२ वी विज्ञान या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | ५५ | जैन सचिन हुकमीचंद |

## सन १९९४-९५ या वर्षासाठी विविध शिष्यवृत्ती मिळविणारे मानकरी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०८ | वि.वा गंधे आणि सत्यभामा गंधे पारितोषिक सर्वाधिक | तृतीय वर्ष कला(मराठी स्पे.) या परिक्षेत महाविद्यालयातून गुण मिळविणारा विद्यार्थी | ३११ | कु.वाणी विद्या गणपत |
| ०९ | प्रा.म.ना.अदवंत सत्यभामा गंधे पारितोषिक | तृतीय वर्ष कला(मराठी स्पे.) या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ७७ | कु.वाणी विद्या गणपत |
| १० | नर्मदाबाई नवलराम पाटील पारितोषिक | तृतीय वर्ष कला(मराठी स्पे.) या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक(अॅग्रीगेट) गुण मिळविणारा विद्यार्थी | २२० | कु.वाणी विद्या गणपत |
| ११ | रामभाऊ प्रभुदेसाई पारितोषिक | तृतीय वर्ष कला(मराठी प्रधान) व्दितीय व तृतीय वर्षातील मराठी या विषयात(अॅग्रीगेट) गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | कु.वाणी विद्या गणपत |
| १२ | बारजीभे शिष्यवृत्ती | १२ वी कला परिक्षेत इंग्रजी या विषयांत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | कोतकर प्रफुल्ल प्रदिप |
| १३ | सौ.शांताबाई पाटील शिष्यवृत्ती | उच्च माध्य.(१२ वी) कला परिक्षेत सर्वप्रथम येणारा आणि याच महाविद्यालयात प्रथम वर्ष कला या वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी | १२५ | वराडे सोनाली दिनकर |
| १४ | तापीराम भगवान चौधरी आणि रमाबाई चौधरी (थोरगव्हाण) पारितोषिक | १२ वी कला परिक्षेत महाविद्यालयातून सर्व विद्यार्थीनीत सर्व प्रथम येणारी विद्यार्थीनी | ५५ | वराडे सोनाली दिनकर |

## सन १९९४-९५ या वर्षासाठी विविध शिष्यवृत्ती मिळविणारे मानकरी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | सौ.लिला महादेव अदवंत पारितोषिक | उच्च माध्य.(१२ वी) कला या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | कोतकर प्रफुल्ल प्रदिप |
| १६ | सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | महाविद्यालयातून ११ वी कला या वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी व इ. १० वी च्या परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा | १२५ | राजे मानसी मोहन |
| १७ | सौ. शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | १२ वी वाणिज्य या परिक्षेत महाविद्यालयात सर्वाधिक गुण मिळविणारा व प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गात याच महाविद्यालयात प्रवेश घेणारा विद्यार्थी | १२५ | पुंडे आनंद प्रभाकर |
| १८ | पाटील - पोतनीस पारितोषिक | १२ वी ते पदव्युत्तर वर्गामधील उत्तम चरित्र, वर्तणूक व चांगली शैक्षणिक पात्रता असणारा(अपेक्षित पण आवश्यक नाही) महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना कॉलेज मेस मध्ये स्वःच्या मदतीसाठी कामकरणारा विद्यार्थी | ११० | बावीस्कर अरूण रामसिंग |
| १९ | विमल पिता भोजू चौधरी पारितोषिक | तृतीय वर्ष विज्ञान(प्रधान रसायनशास्त्र) या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारी विद्यार्थीनी | १२५ | कु.वाणी गितांजली स्नेहकुमार |
| २० | महादेव काशिनाथ थत्ते पारितोषिक | तृतीय वर्ष विज्ञान(केमिस्ट्री प्रिन्सिपल) या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी(विदाऊट बॅकलॉग) | ११० | पाटील हंसराज |
| २१ | सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) | उच्च माध्य.(१२ वी विज्ञान) या परिक्षेत महाविद्यालयात सर्वाधिक गुण मिळविणारा व प्रथम वर्ष विज्ञान | १२५ | मोहकर अनिल आत्माराम |

# सन १९९४-९५ या वर्षासाठी विविध शिष्यवृत्ती मिळविणारे मानकरी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | प्रा. अं.ग. चिपळूणकर पारितोषिक | तृतीय वर्ष कला(इंग्रजी) या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा व याच महाविद्यालयात एम.ए(इंग्रजी) वर्गात प्रवेश घेणारा विद्यार्थी | ११० | सकळकळे अनिरूध्द अशोक |
| २३ | सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | या महाविद्यालयात ११वी विज्ञान या वर्गात प्रवेश घेणाऱ्या व शालांत परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | १२५ | चौधरी अभय वसंत |
| २४ | मनुभाई देसाई पारितोषिक | या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांमध्ये शालांत परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | चौधरी अभय वसंत |
| २५ | सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | या महाविद्यालयात ११वी वाणिज्य या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील शालांतपरिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | १२५ | शिंत्रे निरंजन चंद्रशेखर |
| २६ | सौ.शांताबाई पाटील (हैद्राबाद) शिष्यवृत्ती | तृतीय वर्ष वाणिज्य या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | १२५ | पांडे गोपाळ चंद्रभान |
| २७ | कै.बाबुराव लेले पारितोषिक | तृतीय वर्ष कला या परिक्षेत इंग्रजी(आवश्यक) या विषयांत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | कु.झारे जयश्री परशुराम |
| २८ | सौ. लिला महादेव अदवंत पारितोषिक | प्रथम वर्ष कला या परिक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | ठाकूर हरीप्रकाशसिंग कन्हैयालाल |
| २९ | शरद डी.प्रधान पारितोषिक | तृतीय वर्ष विज्ञान संख्याशास्त्र (प्रधान) या परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | ११० | कु.कोतवाल किर्ती शालीग्राम |

सन १९९४-९५ या वर्षासाठी विविध शिष्यवृत्ती मिळविणारे मानकरी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | डॉ.शं.रा. पुणतांबेकर पारितोषिक | तृतीय वर्ष कला या परिक्षेत हिंदी(प्रधान) विषय धरून सर्वाधिक गुण मिळविणारा (ॲग्री.मार्कस) विद्यार्थी | २२० | पाटील दिलीप पंडीत |
| ३१ | प्रा.मो.स.भावे पारितोषिक | प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गातून वार्षिक परिक्षेत अर्थशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | १०१ | सकळकळे हृषिकेश अशोक |
| ३२ | प्रा.मो.स.भावे पारितोषिक | तृतीय वर्ष कला या वर्गातून अर्थशास्त्र हा विषय विशेष विषय घेऊन (व्दितीय व तृतीय वर्षातील अर्थशास्त्राचे एकूण पेपर) सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | १०१ | केणे सुधीर पंजाबराव |
| ३३ | प्रा.मो.स.भावे पारितोषिक | एम.ए.अर्थशास्त्र(संपूर्ण स्तर) या वर्गातून सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी | २०१ | निकम अविनाश रामलाल |
| ३४ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | एम.ए.वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | ५०१ | राणे सुरेशकुमार रामचंद्र |
| ३५ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | एम.ए.वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी | ५०१ | पाटील जयश्री कमलाकर |
| ३६ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | एम.एस्सी.वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | ५०१ | चौधरी प्रशांत मनोहर |
| ३७ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | एम.एस्सी.वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी | ५०१ | कु.वाघ वैशाली वसंत |
| ३८ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | एम.कॉम.वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | ५०१ | भोळे राजेंद्र निवृत्ती |

# सन १९९४-९५ या वर्षासाठी विविध शिष्यवृत्ती मिळविणारे मानकरी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३९ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | एम.कॉम.वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी | ५० | कु.जोशी निलम शामकांत |
| ४० | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | बी.ए.वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | २५१ | चौधरी सुनील नारायण |
| ४१ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | एम.कॉम.वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी | २५१ | झारे जयश्री परशुराम |
| ४२ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | बी.एस्सी.वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | २५१ | हजारे शशिकांत चंद्रकांत |
| ४३ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | बी.एस्सी.वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी | २५१ | कु.कोतवाल किर्ती शालीग्राम |
| ४४ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | बी.कॉम.वर्गात सर्वप्रथम येणारा विद्यार्थी | २५१ | पांडे गोपाळ चंद्रभान |
| ४५ | घनःश्याम काशिराम पाटील(आमोदे) पारितोषिक | बी.कॉम.वर्गात सर्वप्रथम येणारी विद्यार्थीनी | २५१ | कु.देशपांडे किर्ती लक्ष्मीकांत |
| ४६ | सौ.स्मिता व प्रा.अरविंद ग. कर्णिक | महाविद्यालयात टी.वाय.बीएस्सी. प्राणिशास्त्र या विषयात पहिला येणारा विद्यार्थी/विद्यार्थीनी | १०० | कु.परदेशी स्वाती |
| ४७ | कै.शरदचंद्र दामोदर पाटील पारितोषिक | तृतीय वर्ष बी.एस्सी. वनस्पतीशास्त्र (प्रमुख) या विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी/विद्यार्थीनीस | २०० | हजारे शशीकांत चंद्रकांत |

मुद्रक - **मयुरेश प्रिंटर्स**, ८२, नवीपेठ, जळगांव फोन - २८२७७
टाईपसेटर्स - **मास्टरप्रिंट, व्यंकटेश कॉम्प्युटर्स, जळगांव.**
प्रकाशक - **प्राचार्य डी. एस. नेमाडे**
**मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव**
फोन- कॉलेज ऑफिस - २४२८१, प्राचार्य ऑफिस - २७३६३
प्राचार्य निवास - २४३१०